Regd-No. N150

# वऱ्हाडसमाचार.

Berar-Samachar.

वर्ष ५० ] आकोला---सोमवार तारीख ७ माहे आगष्ट सन १९१६ इ० [ अंक ३१

# हिंदुस्थान सरकार.

—:*:-:*:-:*:—

## सन १९१६-१७ चे कनव्हर्शन लोन

## [ मोबदल्याचें कर्ज. ]

### पोस्ट आफिस विभाग.

**ह्या कर्जाची फेड भर किंमतीनें सन १९३० नंतर आणि सन १९३७ चे आंत करण्यांत येईल.**

**व्याज दरसाल दरशेंकडा ४ टक्के दरानें दर सहा महिन्यांनीं ह्मणजे एप्रिलचे व ऑक्टोबरचे १ ल्या तारखेस देण्यांत येईल.**

**शेंकडा ३ अगर ३॥ टक्के दरानें पूर्वीं दिलेल्या कर्जाच्या रोख्यांच्या मोबदला ह्या नवीन कर्जाचे रोखे घेण्याचा अर्जदारास हक्क राहील.**

अर्ज द्यावयाचे ते १०० रुपयांसाठीं अगर शंभरांनीं बरोबर भाग तुटेल अशा ५००० रुपयांहून जास्त नाहीं इतक्या कोणत्याही रकमेसाठीं द्यावेत, व ते तारीख १४ जून सन १९१६ ते ता. २९ सप्टेंबर सन १९१६ पर्यंत ( ह्या दोन्ही तारखा धरून ) कोणत्याही दिवशीं सेव्हिंग्ज बँकेचें काम करणाऱ्या कोणत्याही पोस्ट आफिसांत घेण्यांत येतील. अर्ज कोणाही मनुष्यास करतां येतो, मग तो सेव्हिंग्ज बँकेचा ठेवीदार असो वा नसो.

जितक्या कर्जाकरितां अर्ज असेल तितकी पुरी रकम अर्जाबरोबर अमानत ठेविली पाहिजे, आणि त्या रकमेचा अर्जदारास कर्जरोखा देण्यांत येईल. अमानत रकम ठेवणें ती रोख ठेवावी अगर सेव्हिंग्ज बँकेमध्यें असलेल्या आपल्या खात्यांतून लागेल ती रकम काढून तिची पूर्ण किंवा अंशतः भरपाई करावी.

पोस्ट आफिस मार्फत दिलेल्या नवीन कर्जाचा कर्जरोखा जर पोस्ट आफिस अधिकाऱ्यांचें ताब्यांत ठेवला असला तर त्या रोख्यावर मिळणाऱ्या व्याजावर प्राप्तीचा कर आकारण्यांत येणार नाहीं.

नवीन कर्ज जितक्या रकमेचें देऊं केलें असेल त्या रकमे इतक्याच हिंदुस्थान सरकारच्या दर शेकडा ३॥ टक्के व्याजाच्या रुपी सिक्यूरिटीज् त्यांच्या दर्शनी किंमतीच्या शेंकडा ९६ या दरानें आणि दरशेंकडा ३ टक्के व्याजाच्या रुपी सिक्यूरिटीज् त्यांच्या दर्शनी किंमतीच्या शेकडा ८२॥ या दरानें देऊन त्यांचे मोबदला हें नवीन कर्ज देण्याचा हक्क अर्जदारांस मिळेल व तो हक्क दुसऱ्या कोणास बेचन करून देतां येईल.

मोबदला करण्याचा हक्क धारण करणाऱ्या इसमांचे मोबदला करण्यासाठीं अर्ज ता. १६ आक्टोबर सन १९१६ पासून ता १६ जानेवारी सन १९१७ पर्यंत ( दोन्ही तारखा धरून ) घेण्यांत येतील. मोबदला करण्यांत येणाऱ्या सिक्युरिटींवर, त्या मोबदला करण्याचे वेळीं, ता ३० सप्टेंबर सन १९१६ पर्यंत व्याज देण्यांत येईल आणि त्यांच्या ऐवजीं दिलेल्या नवीन कर्जावर ता. १ आक्टोबर सन १९१६ पासून व्याज सुरू होईल.

या संबंधानें तपशीलवार माहितीच्या जाहिरातीच्या प्रती आणि अर्जांचे नमुने सेव्हिंग्ज बँकेचें काम करणाऱ्या कोणत्याही पोस्ट आफिसांत मिळतील.

इच्छा असल्यास सोबत जोडलेला नमुना उपयोगांत आणावा.

---

**हिंदुस्थान सरकारचें सन १९१६-१७ चे शेंकडा ४ टक्के व्याजाचें कन्व्हर्शन लोन ( मोबदल्याचे कर्ज ) साठीं पोस्ट आफिसमार्फत करावयाच्या अर्जाचा नमुना.**

(सेव्हिंग्ज बँकेचें काम करणाऱ्या कोणत्याही पोस्ट आफिसांत ता. २९ सप्टेंबर सन १९१६ पावेतों हा अर्ज दाखल करावा. वाटल्यास हा नमुना कापून काढून उपयोगांत आणावा. )

मी —————————————— अक्षर वाचतां येईल असें स्वच्छ लिहावें.

या अन्वयें अर्ज करतो कीं ता. ८ जून सन १९१६ चे गॅझिट ऑफ इंडिया, एक्स्ट्राआर्डिनरी, मध्यें जाहिर करण्यांत आलेल्या सन १९१६-१७ च्या शेंकडा ४ टक्के व्याजाच्या कन्व्हर्शन लोनपैकीं ———— रुपये कर्ज मजपासून घ्यावें.

ज्या रकमेचें कर्ज देण्याकरितां मी अर्ज केला आहे त्या रकमेच्या भरपाईसाठीं

(१) मी या सोबत { रोख रुपये ———— / चेकनें रुपये ———— } सादर करित आहें.

(२) या सोबत मी आपलें पासबुक पाठवीत आहे आणि सेव्हिंग्ज बँकमध्यें माझे खातीं जमा असलेल्या रकमेंतून रुपये ———— काढन घेण्याचा मी अधिकार देत आहे.

(रोख रकम किती दिली, चेकनें किती व सेव्हिंग्ज बँकमध्यें असलेल्या ठेवींतून काढून कांहीं रकम दिली असल्यास तो किती त्या रकमा त्यांकारितां रिकाम्या सोडलेल्या जागेंत वेगवेगळ्या नमुद कराव्यात. जो मजकूर अनवश्यक असेल तो खोडून टाकावा.)

————

एकूण रुपये........

(अ) माझी विनंती आहे कीं कर्जाचा जो हिस्सा मजपासून घेण्याचें मंजूर होईल त्याबद्दलचा कर्जरोखा अकौंटंट जनरल पोस्ट्स अँड टेलेग्राफ्स यांचे जवळ माझेतर्फे ठेवावा आणि त्याबद्दल मिळणारें व्याज

(१) ———— पोस्ट आफिसमध्यें माझे नांवानें सुरू असलेलें सेव्हिंग्ज बँक खातें नंबर ———— यांत जमा करावें. ( अर्जदाराचें खातें सेव्हिंग्ज बँकमध्यें आधीचेंच नसेल तर पारिग्राफ (१) खोडून टाकावा. )

(२) ———— पोस्ट आफिसांत माझे नांवानें सेव्हिंग्ज बँकेचें खातें सुरू करून त्यांत जमा करावें.

(ब) माझी अशी विनंति आहे कीं कर्जाचा जो हिस्सा मजपासून घेण्याचें मंजूर होईल त्याबद्दल खालीं लिहिलेल्या प्रकारच्या प्रामिसरी नोटा मला द्याव्या आणि व्याज ———— ———— ट्रेझरीमधून मला मिळावें असा त्यांवर शेरा लिहावा.

((अ) किंवा (ब) ह्या दोहोंतून एक पारिग्राफ भरून दुसरा खोडून टाकावा.)

मी अशी विनंति करतो कीं सन १९१६–१७ चे शेंकडा ४ टक्के दराचे कन्व्हर्शन लोनपैकीं ज्या रकमेचें कर्ज देण्यासाठीं मी अर्ज केला आहे त्या रकमेइतक्या शेंकडा ३॥ अगर ३ टक्के दराच्या हिंदुस्थान सरकारच्या रुपी सिक्यूरिटी मोबदला करण्याचा अधिकार देणारें वारंटही मला द्यावें.

नांव ————————————

पत्ता ————————————

तारीख ————

पोस्ट आफिसांत दाखल केल्याची तारीख ———— रजिस्टर नंबर ————

( ही तारीख ज्या पोस्ट मास्तरानें अर्ज घेतला त्यानें नमुद करावयाची ) ( हा नंबर हेड पोस्ट मास्तरानें घालावयाचा ).

नो. नं. २४१ हेड आफिसचा छाप.

'वऱ्हाडसमाचार प्रेस' आकोला.

## वर्गणीचे दर

आकोल्यांतील लोकांस........१ रुपया
बाहेरगांवीं ट हां. ........ २ रुपये
वर्गणी आगाऊच घेण्याची वहिवाट आहे.

## नोटीशीचे दर

दर ओळीस दीड आणा.
हेडिंगच्या दोन ओळी धरल्या जातील.
नोटीस सुवाच्य असली पाहिजे.

सूचनाः- गुरुवारच्या आंत येणाऱ्या नोटीसा त्याच आठवड्यांत घेतल्या जातील. यापुढें येणाऱ्या नोटीसास स्पेशल चार्ज पडेल.


# नोटीस.

**हिंदुस्थानच्या बादशहाच्या फौजेमध्यें चाकरी करण्याचे नियम.**

-:❀:❀:❀:-

## ब्राम्हण लोकांकरितां

—:❀:०:❀:०:❀:—

सरकारच्या मनांतून एक ब्राह्मण लोकांची डबल कंपनी (१ जमादार, ४ नाईक आणि २०० शिपाई) ११६ मराठा इन्फन्ट्री करितां तयार करावयाची आहे. या पैकीं निम्मे लोक मध्यप्रांत आणि वऱ्हाड व बाकीचे निम्मे इलाख्यातून भरती करावयाचे आहेत.

वऱ्हाडांतील रहिवाशांनीं नांवें नोंदण्याचे अर्ज जिल्हा अधिकारी ह्मणजे डिपुटी कमिशनर यांजकडे करावेत, अगर इलिचपूर, खामगांव व वाशीम सब डिव्हिजन मधील लोकांनीं आपआपल्या सबडिव्हिजनल आफीसरकडे करावेत.

रिक्रूटनीं लढाई चालू असेपर्यंत अगर इच्छा असल्यास पुढें ही नोकरींत राहण्याकरितां नांवें नोंदावींत. ते शिकून पूर्ण तयार झाल्याशिवाय त्यांना लढाईवर पाठविलें जाणार नाहीं. ज्या लोकांनीं लढाई चालू असतांना लष्करी खात्यांत नोकरी केली असेल त्या लोकांना पुढें सरकारी नोकरींत शिरते वेळेस जो काळ लष्करी खात्यांत गेला असेल तो काळ वयाच्या मुदतींतून वजा करण्याचें सरकारांनीं ठरविलें आहे.

रिक्रूटची उंची कमीतकमी ५ फुट ४ इंच, छाती ३१ इंच (आवस्तृत) आणि ३३ इंच (विस्तृत) असावी. वय १६ आणि २६ या दरम्यान असावें व त्यास कोणतेही शारीरिक व्यंग नसावें व तो सशक्त, बळकट व बुद्धीवान असावा.

शिपायास ११ रु. पगार मिळून महागाई भत्ता धान्याच्या भावाप्रमाणें मिळतो. हल्लीं हा भत्ता दक्षिणेंत ५ रु ८ आ. आहे. ह्मणजे शिपायास एकंदर वेतन १६ रु. ८ आ. मिळते या शिवाय दर वर्षी कपड्याकरितां व बुटाकरितां १२ रु. मिळून शिवाय नोकरींत शिरते वेळेस ६० रु. किंमतीपर्यंत लढाईचा सरंजाम मिळतो. ११६ मराठा लोकांची पलटण हल्लीं वायव्य सरहद्दीवर बलु येथें आहे.

नो नं २४२


# चांदीचींभांडीं

नाशिक येथें तयार केलेलीं सर्व प्रकारचीं सुबक व वाटदार भांडीं आमचेकडे विक्रीस तयार असतात भाव माफक व्ही. पी. नें अगर रोखीनें पाठवू. मालाचे खरेपणाबद्दल ग्यारंटी देऊ

**पुरुषोत्तम रामचंद्र वैशंपायन**
**रविवार पेठ नाशिक सिटी.**
नो. नं. ४

## सुबोधमाला.

**सद्यःस्थितीस अनुसरून प्रगतीपर, ज्ञानप्रद, व मनोरंजक मासिक पुस्तक.**

नामांकित लेखकांचे विचार परिप्लुत निबंध, बोधपर गोष्टी, अनुकरणीय चरित्रें हृदयंगम कविता, चालू कादंबरी वगैरेनीं युक्त पृष्ठें दरमहा ३६. वार्षिक वर्गणी बाहेरगांवीं ट. ख सह १॥≈ उमरावतीस रु. १॥ उमरावतीचे एजंट रा. सदाशिवराव देशमुख. जानेवारी १९१६ पासून सुरूं झालें आहे. एजंट पाहिजेत

**संपादक**— काशीराव बापुजी देशमुख
**अंबागेट उमरावती.**
नो. नं. २२३

## अमेरिकन सोन्याचे कधींच काळे न पडणारे दागिने.

चंद्रहार किं. रु. ३।४ गोठ जोडीची किं. रु. १॥ २, २॥. पाटल्या जोडीची किं. रु. १॥, २, २॥. सरी किं. रु. ३, ४, ५. वज्रटीका रेशमांत गुंफलेली किं. रु. ३, ४. ठुशी रेशमांत गुंफलेली किं. रु. ५, ६. नथ उत्तम मोत्यांनीं बांधलेली किं. रु. ३, ४, ५. शिंप्याचें मोतीं लहान मोठें वाटेल तसें. सरीची किं. रु. १॥, २, ३, ४. अंगठी किं. रु. १, १॥. सले अष्टपैलु जोडीची किं. रु. १॥. बांगड्या जोडीची किं रु. १॥,२,२॥. कोणत्याही प्रकारचा मापाचा दागिना मिळेल.

पत्ताः— **मगनलाल के. आणि कंपनी,**
गिरगांव मुंबई.
नो. नं. २२४

## अस्सल अंगुरी.
# हिंग

रु. ४ शेर, पवित्र केशर रु. १८३ आणि १८७ तो. खालिस कस्तुरी रु२५ तो. शुद्ध शिलाजीत ८९ तो. सुर्मा ममीरा रु. ३ तो. स्याहजीरा रु. २ शेर, मुरब्बा बादाम रु. १ शेर

**काश्मीर स्टोर्स श्रीनगर** नं० ५

## जाहिरात

**मुंबई ब्यांकेची सेव्हिंग ब्यांक.**

ह्या बँकेंत खालीं दिलेल्या अटीवर ठेवी घेतां येतात.

कोणत्याही वर्षाचे १ ले जानेवारी आणि ३१ डिसेंबर याच्या दरम्यान दोन हजार रुपये पर्यंत पैसा ठेविला जाईल.

ठेवी दोन अथवा अधिक इसमांच्या नांवावर ठेवतां येतील आणि तो पैसा त्यापैकीं एकास अथवा जास्त इसमास अगर त्यापैकीं मयताचे मागें राहील त्यांस काढतां येईल.

व्याज दर साल दर शेकडा तीन रुपयाप्रमाणें दिलें जाईल. व्याजाची आकारणी प्रत्येक महिन्याची जी कनिष्ठ शिल्लक असेल तिजवर केली जाईल. मात्र दहा हजारावरील शिल्लक रकमेस व्याज नाहीं. नियमांच्या प्रती बँकेंत अर्ज केला असतां मिळतील.

मुंबई ब्यांक आकोला २१९१०९ } S. Clements, एजंट
नो. नं १

## हिंदुस्थानावर आरिष्ट.

हिंदुस्थानांतील रहिवाशांच्या पाठीस ज्वर व हिंवताप यांचें आरिष्ट सदोदित लागलें आहे. पण त्याचा प्रतिकार करण्यास बाटलीवाला यांचें हिंवतापाचें औषध व गोळ्या ह्या रामबाण आहेत. ताप किंवा शीतज्वर येणारसें वाटतांच हें औषध घ्यावें. किं. १ रु.

**बाटलीवाला यांच्या निस्तेज लोकांसाठीं शक्तिकारक गोळ्या**

हें औषध घेतल्यानें भागवटा, मेंदूचे श्रम, पौरुषनाश, अशक्तता व क्षयरोगाचें मान त्याप्रमाणें अजीर्ण इ. इ. विकार ताबडतोब दूर होतात किं रु. १८०.

**बाटलीवाला यांचें दंतमंजन.**

हें दंतमंजन मायफळाशीं कांहीं इंग्रजी औषधांचा वैद्यकीय रीतीनें मिलाफ करून बनविलें आहे. किं. ८४

**बाटलीवाल्याचें गजकर्णावर मलम.**

यानें गजकर्ण, कुनळी, खरूज यांचा विकार एका दिवसात नाहींसा होतो. किं. ८४

हीं औषधें सर्व औषधी विकणाऱ्या दुकानावर व डॉ. एच. एल. बाटलीवाला जे. पी. मु. वरली लेबोरेटरी दादर, मुंबई यांजकडे मिळतात.

DR. H. L. Batliwala. Sons & Co Ltd
N. N. 3 Dadar Bombay.

## श्री दत्तात्रय अलंकारालय कोल्हापूर

आमचे कारखान्यांत स्वतःचे देखरेखेखालीं, मुद्दाम तयार केलेले उत्तम सोन्याचे सुबक दागिने— मंगळसुत्र मान, ठुशाजोड, गुलाबाचीफुलें, बिल्वदळी टीका, मुदा अग्रफुलें साखळ्या व घागऱ्याचीं वगैरे सर्व जातीचा माल—तसेच चांदीच्या मासोळ्या, चाळ, उपकर्णी, तारें, वाट्या, गडवे, इत्यादि माफक दरानें मिळतील आह्मी सर्व सोनें, न्याशनलचें शंभर नंबरी वापरीत असतों. व डागाचा उपयोगही नियमितच केलेला असतो. यामुळें जिन्नस पांढरे पडण्याची अगर वाईट दिसण्याची भीति बाळगण्याचें मुळींच कारण नाहीं. आमचे जिन्नसाची लाख काढून वजन तोलून पाहावें. जिन्नसाकाची खात्री करून देण्यास आह्मी तयार आहों. व्यापाऱ्यास कामिशन मिळेल. ऑर्डरी प्रमाणें माल तयार करून देऊं, चांदी सोन्याचे खरेपणाबद्दल आह्मी जबाबदार आहों. माल रोखीनें अगर व्ही. पी. नें पाठविला जातो ऑर्डरी बरोबर एक रुपया आगाऊ पाठविला पाहिजे.

श्रीदत्तात्रय अलंकारालय—कोल्हापूर
नो नं ६

# वैद्य वि. ल. थत्ते,

यांच्याच औषधानें

# जन्माची मूळव्याध जाते.

शेकडों औषधें घेऊन निराश झालेल्या रोग्यानीं वैद्य वि. ल. थत्ते यांचें औषध अवश्य घ्यावेंच. यानें मोड नाहींसे होतात. रक्त पडणें बंद होते. शौचास साफ होते.

**किंमत एका डब्यास तीन रु.**
**सोल एजन्ट,**
**नारायण माधवराव खरे,**
२९३ सदाशिव, पेठ, पुणें शहर.
नो. नं. २६४

## विक्रीस तयार

आमचे छापखान्यांत दरखास्तीचे, वकील पत्राचे, परत भरण्याचे, लिस्टफार्म पर्चांचे व नकलेकरितां करावयाच्या अर्जाचे नमूने छापून तयार आहेत. ते आमचे छापखान्यांत कोणत्याही वेळीं विकत मिळतील.

**वऱ्हाडसमाचार कार्यालय, सदाशिवाश्रम, आकोला** } मॅनेजर

## खात्रीचा तयार केलेला.

**ताजा अनंत मूळ.**

नंबर १ ला ३॥ रु. शेर नं. २ रा २॥ रु. शेर ८ दिवसाची पूर्व मागणी केल्यास तांबूस मुळ्यांचा ताजा कुटून अच्छेराच्या वजनानें डब्यांत भरून पाठविला जाईल. गूण व घेण्याची रीत डब्यावर

पत्ता
रामचंद्र सदाशिव मार्कंडे उद्धवजी
मोहल्ला नागपूर शहर सर्कल नं ६

## सावंतवाडी येथील.

**दशावतारी गंजिफा**— उत्तम पान व टिकाऊ पक्का रंग किंमत ·।।।·, १, १।, १।।, २, २।। ते ९ रु. प. **बुद्धीबळ जोड लांकडी**— किंमत ·।।।· १, १।।, २ ते ४ रु. प. **सोंगट्या जोड**— किंमत ·।·, ·।।·, ·।।।·, १, १।।, रु. प. **खडावा जोड**— शिसवी व शिवणीचे वगैरे सामान वाऊक व किरकोळ आमचेकडे विकत मिळेल. मोठा क्या. मा. फूकट

**डी. आर. अळवणी, स्टेट सावंतवाडी.**

नो. नं. २७२

---

### नोटीस

लक्ष्मी जवजे नारायण एव्हारे राहणार वाशीम

इजला:—

खालीं सही करणार इजकडून नोटिस देण्यांत येते कीं, तूं माझी साक्षांत धाकटी भाऊं असून तुझा नवरा मयत झाल्यास सरासरी सहा महिने झाले त्याचे इष्टेटीचे वारसदार तूं व मी असून आपणा उभयतास मूल बाळ कांहींच नाहीं. सदर्हू इष्टेटीचे वारस कोर्टांत दोघीही ठरल्या गेल्या आहेत वाटण्या अद्याप झाल्या नाहींत सर्व इस्टेट तुझ्या ताब्यांत असून मला हिस्सा तुझ्या मनांत देण्याचे नसून स्थावर व जंगम माल तूं अफरातफर व विक्री करण्याचे चालविल्याचे दिसतें. या करितां सदर्हू जिनगी तुला विकण्यास अधिकार नाहीं. यावर तूं न ऐकिल्यास तुजवर कोर्टांत रीतीप्रमाणें दावा करून नुकसानी भरून घेतली जाईल. टीप— त्याचप्रमाणें सर्वत्र लोकांस ही कळविण्यांत येते कीं, सदरील बाईपासून तिचे ताब्यांतील स्थावर व जंगम माल माझ्या मताशिवाय कोणीही घेऊं नये. धेतल्यास तो माल कोर्टमार्फत पुन्हा वापस घेतल्या जाईल. कळावें. ता. १७-८-१६ इ.

सही

सहीची निशानी आंगठा पार्वती जवजे शंकर एव्हारे राहणार वाशीम

दस्तुर जनार्दन कृष्ण शेवाळे

नो. नं. २७३

---

### नोटीस

चि. सौ. कचरी मर्द मारुती बारी राहणार खरबडी ता. मल्कापूर पो. मोताळे व आंबी मर्द किसन बारी हल्लीं मुक्काम पोष्ट जयपूर ता. मल्कापूर

यांस:—

नोटिस देणार लक्ष्मण जानजी बारी व काशी मर्द तुकाराम बारी राहणार जयपूर यांजकडून नोटिस देण्यांत येते कीं, आह्मी दोघांनीं ता. १२-२-१३ इ. रोजीं तुमच्या दोघींच्या नांवें मृत्यूपत्र करून नोंदलें आहे. आह्मी आमचा चारितार्थ उत्तम प्रकारें चालावा व आपले पासुन वृद्धापकाळांत सर्व तऱ्हेनें सुख व्हावें या आशेनें मृत्यूपत्र करून ठेविलें होतें. पण तसें न होतां उलट तुह्मी मला त्रास देऊन जिनगीची अफरातफर करण्याची इच्छा करीत आहांत. करितां या नोटिशीनें मी जाहीर करितों कीं, सदर्हू मृत्यूपत्र रद्द करण्यांत आलें आहे. आह्मीं मेल्यावर ही त्या जिनगीवर आपला दोघींचा ही हक्क नाहीं. हें आपणास कळण्याकारितां या जाहीर नोटिशीनें आपणास कळविले आहे. कळावें. ता. २२-७-१६ इसवी

सही

लक्ष्मण जानजी बारी पोष्ट जयपूर नि॥ आंगठा

काशी मर्द तुकाराम बारी पो. जयपूर नि॥ आंगठा

नो. नं. २७४

---

### नोटीस

रा. रा. पांडुजी व॥ कुसनाजी लोहार मु. मुसळवाडी पोष्ट जऊळके ता. वाशीम

यांस:—

राधाबाई मर्द पांडुजी लोहार हल्लीं वस्ती कापडशिंगी पोष्ट मोप आकोला. नोटिस देण्यांत येते कीं, तुह्मी माझे लग्नाचे नवरे असून ३ वर्षांपासून माझी ने आण न करतां त्याग केला. ह्या मुदतींत पदरमोड करून मी एक वर्ष घातले. व २ वर्ष सावकाराचे कर्ज काढून स्वतःचा व मुलीचा निर्वाह केला. तरी ते कर्ज सव्याज फेडून मला आपले घरीं नांदण्यास न्यावें, मी येण्यास तयार आहे. आपणास मी पुष्कळ पत्रें व अखेर १ पोष्टमार्फत नोटिस केली, ती तुह्मी घेतली नाहीं. जर तुह्मी असें न कराल तर १ महिनाभर वाट पाहून नंतर मी दुसरा घरठाव करीन. मग तुमचा मजवर नवरेपणाचा हक्क चालणार नाहीं, तुमची कोणतीही तक्रार चालणार नाहीं. ही नोटिस मी स्वतःचे संमतीनें दिली. द बाळकृष्ण गोपाळ पांडे

सही

राधाबाई मर्द पांडूजी लोहार नि॥ बांगडी

नो. नं. २७५

---

### नोटीस.

गवसखां व॥ नामदारखां मुसलमान खतीब राहणार जळगांव

यांसः—

खालीं सही करणारा कडून नोटीस देण्यांत येते कीं आह्मी तुह्मास कुलमुखत्यार नेमिले व कुलमुखत्यारपत्र जळगांव सबरजिष्ट्रार कचेरींत बुक नं. ४ अ. नं. $\frac{१}{१९१६}$ यास नोंदले असें. या पुढें आह्माला मुखत्याराची जरूर राहिली नाहीं वरून तुमचे मुखत्यारपत्र आह्मी आज तारखेपासून रद्द केलें आहे. आतां तुह्मी आमचे तर्फे कुलमुखत्यार ह्मणून आमचे कोणतेंच प्रकारचें काम करूं नये केल्यास तुह्मी स्वतः जबाबदार आहांत. तसेंच सर्व लोकांस कळविण्यांत येते कीं सदर्हु गवसखाचे मुखत्यारपत्र आह्मी रद्द केलें आहे तरी कोणीही त्यांच्याशीं आमचे मुखत्यारा ह्मणून कोणताच व्यवहार करूं नये केल्यास आह्मी व आमची जिनगी जबाबदार नाहीं. कळावे. तारीख २७-७-१६ इ. द. गोविंद बळवंत जोसी पिं० रा० जळगांव

सही

( उर्दूत ) गुलामदस्तगीर व॥ शेख हैदर रा० जळगांव द० खुद

नो. नं. २७६

---

### नोटीस

नोटीस बेशमी नामू व॥ इष्णाजी बहाकर कुणबी रा० भोड ता० आकोल पो० उगवा

यांसः—

खालीं सही करणार या नोटिशीनें कळवितो कीं तुह्मी आपले मौजे भोड ता० आकोला येथील शेतसर्वे नं. $\frac{३}{१}$ एकर ३ गुंठे १९ आकार रुपये ६ चे मला विकले. त्याचा सवदा तारीख १२-७-१६ रोजीं रा. भाऊराव वकटे यांचे घरी होऊन तुह्मी १० रुपये इसार ही घेतला. खरेदीखत ता. २६-७ १६ रोजीं ठरलें. व त्या दिवशीं मी वाट पाहून थकलो पण तुमचा पत्ता नाहीं. व तेव्हां पासून तुह्मी सारखी टाळाटाळी चालविली आहे. आणि लोकांच्या जवळ वाटेल तशा गोष्टी सांगतां तरी तुह्मास या नोटीशीनें कळवितो कीं तुह्मी ही नोटीस पावतांच ८ दिवसांत पंचा समक्ष ठरल्याप्रमाणें रुपये नऊशे पैकीं ८९० आठशे नव्वद घेऊन मला शेत खरेदी करून द्यावें. याप्रमाणें मुदतींत न केल्यास रिती प्रमाणें सरकार मार्फत दाद मला मागावी लागेल. व मग त्या बद्दल लागणारा खर्च आणि या नोटीशीचा खर्च तुह्मास द्यावा लागेल कळावे ता. १-८ १६

सही

काशीराव लक्ष्मणराव दे. द. खु. रा. भोड

नो. नं. २७७

---

### नोटीस

नोटीस बेशमी चंचल भार्थी गुरु खुशाल भार्थी साहु दुकान कजबे नांदुरा तालुका मलकापूर जी० बुलडाणा

यांसः—

नोटीस देणारा गणू व॥ विठोबा तायडे कुनबी रा० कजबे नांदूरा ता॥ मल्कापूर जि० बुलडाणा याजकडून नोटीस देण्यांत येते कीं मी तुह्मास माझे शेत कजबे नांदूरा येथील शेत सर्वे नंबर १९६ पोटहिस्सा नंबर ४ व शेत सर्वे नंबर ६८ पोटहिस्सा नंबर १ एकर ११८१ गुंठा असे दोन्ही सेत मी तुह्मास चारशे ४०० रुपयांस ता० १९-४-१५ इ. रोजीं गहाण दिलें त्या पैकीं सेत सर्वे नंबर ६८ पोटहिस्सा नंबर १ चें शेत मी तारीख २१-७-१५ इ० रोजीं रक्कम रुपये १८२५ आठराशे पंचवीसास नारायणसा आत्मारामसा सराफ राहणार नांदूरा याजला विकले आहे. यांतच तुमचे वरील रुपये गहाणाबद्दल तुह्मास देण्याकरितां त्यांनीं आपले आंगींलाऊन घेतले आहे व ते रुपये तुह्मास देण्याकरितां मी व बाबु मारोती तेली व कान्हु व॥ रामु देशमुख आणि तुकाराम व॥ बळवंतराव देशमुख राहणार कजबे नांदूरा असे रक्कम घेऊन तुमचे दुकानावर आलो असतां तुह्मी व तुमचा गुमास्ता दत्तू सिंपी असें बोलले कीं आह्मी रक्कम घेत नाहीं. वरून आह्मी रक्कम घेऊन परत आलो व ती रक्कम व्याजासुद्धां एकंदर रुपये नारायणसा आत्मारामसा सराफ याचे पाशी धरवर ठेविली आहे. वरून नोटीशीनें कळविण्यांत येते कीं तुमची रक्कम मी जे दिवशीं ह्मणजे खरेदी दिली त्याच तारखेस घेऊन आलो होतो व तुह्मी घेतली नाहीं त्या तारखे पासूनचे तुमचे व्याज बंद झाले आहे तरी आतां ही नोटीस पावल्यापासून दोन दिवसाचे आंत तुमची रक्कम वरील मुदतीचे व्याजासह घेऊन जावे. न नेल्यास मी त्याचा जबाबदार नाहीं. करितां नोटीशीनें कळविले आहे ता॥ १-८-१६ द० वासुदेव मल्हार नांदूरा

सही

१ गणु व॥ विठोबा कुनबी तायडे रा. नांदूरा निशानी हातचा आंगठा

नो. नं. २७८

---

### नोटिशीचें उत्तर

नोटीस बेशमी शेख करीम व॥ मा यासीन जात मुसलमान रा० कजबे वडनेर गंगाई ता० दर्यापूर जि० उमरावती

यांसः—

खालीं सही करणार याजकडून नोटिशीचा जबाब देण्यांत येतो कीं, तूं मजला ता० २४-७-१६ इ० ची पोष्ट मार्फत नोटीस दिली ती ता० २७-७-१६ इ० ला पावली. सदर्हु नोटीशींत तू असें लिहिले आहे कीं कजबे मजकूर येथील शेत सर्वे नंबर ४६४ यांतील दोन आणे आठ पैचा $\frac{८}{२८८}$ हिस्सा दक्षिणे कडून वाटलेला आहे तो मी तुह्मास खरेदी दिला त्या खरेदी दिलेल्या शेताबद्दल भरण्याची रक्कम मला तुह्मी पुरी दिली नाहीं. ह्मणून शेतावरही तुमचा कबजा नाहीं. परंतु तूं माझा विश्वासघात केला आहेस. कारण तूं खरेदी दिलेल्या शेतांतील हिस्सा दक्षिणे कडून न देतां उत्तरे कडून खरेदी दिला आहेस. व शेतातील हिस्सा वाटलेला नसून सामील आहे. ह्मणून तूं आपले भाऊ मां सरवर मा अशरफ व॥ मां यासीन यांचे मदतीनें खरेदी दिलेले शेतावर तुह्मी मला कबजा करूं दिला नाहीं. करितां तू खरेदी दिलेल्या शेताचे कबजाकरितां वि॥ सबजज साहेब कोर्ट दर्यापूर यांचे समोर मी दावा केला आहे. त्याबद्दल चौकशी करणार सरकार मालक आहेत. तसेंच तू नोटीशींत कळविले आहेस कीं, मला खरेदीची पुरी रक्कम मिळाली नाहीं. परंतु तू खरेदीतील भरणा रक्कम रुपये १३०० अक्षरी तेरासे

वि॥ नोंदणार अंमदार साहेब यांचे समक्ष व रेकार्डीचे नोंदणीचे वेळीं वि॥ नायब तहसीलदार साहेब यांचे समक्ष वरील खरेदिचा भरणा कबूल केला आहेस, या खरेदींतील भरण्या शिवाय तुझेवर गुलामकादर वा॥ मौजूमिय्या मुसलमान रा० वडनेरगंगाई यानें वि॥ मुनसीफ साहेब कोर्ट दर्यापूर यांचे फैलावरील दि० मु० नं० ६३ इ० / १४ चा मिळविला. त्यांत त्यानें सहहू शेतांतील समाईकांत असलेला दोन आणे आठ पैचा ८२८८ तुझा हिस्सा अव्वल जप्तींत जप्त केला होता; ते ही तू मला खरेदी देते वेळीं सांगीतलें नाहीं, ह्मणून त्या हुकूमनाम्या पैकीं राहिलेली रक्कम रुपये दोनशे पासस्ट चौदा आणे तीन पै २६९८१४८३ खरेदींतील भरण्या शिवाय मी ता० दर्यापूर कोर्टांत भरले आहेत, ते रुपये ही नोटीस पावल्यातारखेपासून १९ दिवसाचे आंत मला देऊन माझे सहीची पावती घ्यावी. तसें तू न केल्यास सदहू कोर्टांत भरलेल्या रकमे बदल आणखी दुसरा दावा केल्या जाईल. व सदहू दाव्याचा कोर्ट खर्च सुद्धां तुला द्यावा लागेल हा जबाब तारीख २८-७-१६ इ०

सही
बाबन वा॥ सोनाजी वैश्य सोनार
रा० वडनेर गंगाई याची नि॥
आंगठा असे

नो० नं० २७९

---

## पत्रव्यवहार.

### माळी शिक्षण परिषद.

**बैठक ७ वी.**

माळी शिक्षण परिषदेची ७ वी बैठक जिल्हा नाशिक, मुक्काम मालेगांव येथें शांतीभुवन नाटकगृहांत शनिवार ता. १२ व रविवार ता. १३ आगष्ट सन १९१६ इ. या दोन दिवशीं दोन प्रहरीं १२ ते ६ वाजेपर्यंत श्रीयुत **तुकारामजी नामदेव गिरमे** यांचे अध्यक्षतेखालीं होणार आहे. माळी लोकांची वस्ती मालेगांव, कळवण, सटाणें वगैरे तालुक्यांतून बरीच असल्यामुळें ह्या बैठकीस बरीच पुढारी मंडळी हजर राहण्याचा संभव आहे. तरी ह्या परिषदेच्या सर्व हितचिंतकांनीं ह्या सभेस सदहू दिवशीं येऊन सभेचा कार्यक्रम यशस्वी रीतीनें पार पाडण्याची कृपा करावी.

ग्रांटरोड, मुंबई. ता. २९-७-१६.

आपला नम्र.
**धोंडीबा पांडुजी बनकर.**
जनरल सेक्रेटरी
माळी शिक्षण परिषद.

नो. नं. २८०

---

वऱ्हाडसमाचार
मिति श्रावण शुद्ध ८ शके १८३८

## विद्यादान.

लाला लजपतराय हे अमेरिकेंत प्रवास करीत आहेत. तेथील संयुक्त संस्थानासंबंधानें त्यांनीं नुकताच ग्रंथ प्रकाशित केला आहे. हिंदी दृष्टीनें युनायटेड स्टेट्सचें हें चित्र काढलेलें आहे. या पुस्तकाच्या वाचनानें तिकडील समाजरचना चांगली कळेल इतकेंच नाहीं तर तुलनात्मक विचारानें आपल्या देशाच्या उत्कर्षाचे ही उपाय आपोआप सुचण्यासारखे आहेत. तिकडील सरकारनें विद्यादानाचें केवढें तरी दांडगें काम चालवलें आहे, याची थोडी बहुत कल्पना या पुस्तकांत संकलित केलेल्या कांहीं आंकड्यावरून होण्यासारखी आहे. विद्यादानाचें पवित्र कर्तव्य जें राष्ट्र ज्या मानानें बजावील तें राष्ट्र त्या मानानें चिरकाल सुखानें नांदेल. बालवर्धन हें जसें आईबापांचें कर्तव्य आहे त्याहून ही अधिक श्रेयस्कर कर्तव्य बालशिक्षणासंबंधानें सरकारचें आहे. या कर्तव्यांत चूक झाली तर राष्ट्राचा पाया तितका डळमळला असें समजावें असें इतिहास सांगत आहे. युनायटेड स्टेटस्कडे विद्येचा प्रसार कसा आहे तो पहा १९१३ सालीं तेथील लोकवस्ती ९७०००००० होती. या प्रजेपैकीं शाळेंत जाण्याचें वय ५ वर्षापासून १८ वर्षें पर्यंतचें धरलें तर सरासरी २५९००००० विद्यार्थी दशेंतलीं मुलें निघतील. त्या पैकीं १८९००००० मुलें प्रत्यक्ष शाळांतून शिकत आहेत. आपली ब्रिटिश इंडियाची स्थिती वरील स्थितीशीं ताडून पाहू. ब्रिटिश इंडियांतील लोकसंख्या ३० कोटी धरली तरी जवळ जवळ युनायटेड स्टेटस्च्या तिप्पट येते. पण शाळेंत जाणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या मात्र तिकडच्या विद्यार्थ्यांच्या तिपटीपेक्षां अधिक असण्याऐवजीं इकडच्या विद्यार्थ्यांच्या २॥ पटीनें विद्यार्थी तेथें शिकत आहेत! हा व्यस्त व्युत्क्रम कोण विसरेल बरें. हल्लींच्या विद्यादानाच्या प्रसाराच्या मापानें मोजतां युनायटेड स्टेटसमधील १९१३ ची विद्यादानाची स्थिती प्राप्त होण्याला आणखी १२५ वर्षें लागतील असें आंकडे मोडीचें गणीत सांगतें.

विद्याखात्याच्या खर्चाचे आंकडेही तत्वबोधक आहेत. कॉलेज शिक्षणाचा व औद्योगिक व धंद्याच्या शिक्षणाचा आणि तसेंच खाजगी संस्थांनीं चालविलेल्या शिक्षणाचा खर्च अगदीं लक्षांत घेतला नाहीं; तरी देखील १९१३ सालीं १६० कोट रुपये अमेरिकन संस्थानानें खर्च केलेला आहे. हाच खर्च हिंदुस्थानांत अवघा १९१३ सालीं १० कोट रुपये झालेला आहे. आणि या आकड्यांत फीचे, सार्वजनीक देणग्यांचे व सर्व प्रकारच्या विद्या संस्थांचे खर्चाचे आंकडे एकत्र करून हा १० कोटीचा आंकडा झालेला आहे. अमेरिकेचा खर्च हिंदुस्थानांत त्या प्रमाणानें करू गेल्यास १ हजार कोट रुपये निदान अगदीं किमानपक्षीं ५०० कोट रुपये तरी सरकारी खजीन्यांतून विद्याखात्याकडे लागावयाला पाहिजेत. वरील दोन्ही गोष्टी लाला लजपतराय यांच्या डोळ्यापुढें उभ्या राहिल्या तेव्हां त्यांच्या लेखणींतून असा उद्गार निघतो कीं माझ्या अंतःकरणांत जी गोष्ट पूर्णपणें बिंबली आहे ती ही कीं जें मूल पुरुष किंवा स्त्री या राष्ट्रांत जन्म पावतें त्याच्या शिक्षणाची सर्व जोखीम सरकारनें आपल्या माथीं घेतली आहे. खानगी संस्था व व्यक्ति यांचें सहाय्य आनंदानें येथें स्वीकारतात पण त्या कारणानें सरकार आपल्या कर्तव्यापासून व जबाबदारी पासून यत्किंचितही ढळत नाहीं. ........ सरकार व समाज यांचा पूर्ण विश्वास असा आहे कीं आपल्या राष्ट्रांतील मुलें हींच सर्वोत्तम व अत्यंत मौल्यवान दौलत होय. आणि या धनदौलतीचा यथायोग्य समाचार ठेवणें ह्मणजेच राष्ट्राचें खरें वैभव होय.

---

## प्रांतिक संकट

### ( विद्यादानाची योजना )

सर रेजिनाल्ड क्रेडॉक हे या प्रांताचे बढतीवर जाण्यापूर्वीं मुख्य होते. तेव्हा त्यांनीं छिंदवाडा येथें सरकारी धोरण प्रसिद्ध केलें आहे. त्यांतील आशय असा कीं सरकार जिल्ह्यानिहाय नमुन्याच्या ह्मणून शाळा स्थापित करितील; पण लोकांच्या शिक्षणविषयक गरजा वाढत वाढत जातील, तसतसें विद्याप्रसाराचें उर्वरित कार्य लोकांनीं आपल्या अंगावर घ्यावें. सारांश एवढाच कीं सरकारी थैली येवढी व इतकी मोकळी राहील. आणि त्या पुढील कार्यभाग लोकांच्या थैलींतून झाला पाहिजे. लोकांना विद्यादानाच्या पवित्र कर्तव्याविषयीं जागृत करण्याचा हा सरकारचा उपाय असेल; पण तो आमच्या मतानें चुकलेला आहे. आणि या चुकीचा परिणाम असा होत चालला आहे कीं विद्यादानाकडे लोकांची गती जितक्या वेगानें वहावयाला पाहिजे तितक्या वेगानें लोक पुढें आपली थैली घेऊन उभे रहात नाहींत. आणि सरकार तर आपल्या शाळा किरत्यासारख्या नमुनेवाईक करण्याच्या शहाला पेटून पुष्कळ विद्यार्थ्यांना आपल्या शाला गृहांतून मज्जाव करण्याचा हुकूम सोडीत आहे. मुलें विद्यागृहावांचून फिरतात आणि त्यांच्या मनाला या वयांत कोणतें वळण लागेल याचें धोरण वडीलधाऱ्या मंडळीस व सरकारास ही सध्यां नीटपणें दिसत नाहीं असें ह्मणावें लागतें. सरकारी यंत्र असें चालतें कीं तेथें आमच्या प्रांतिक सरकारास हो नाहीं ह्मणण्याला अवकाशच नाहीं. आणि सरकारचें धोरण बदलण्याला फार कालावधी लागतो. तेव्हां प्रस्तुतच्या या विद्यादानाच्या संकटांतून निघण्याला लोकांनीं व सरकारांनीं मिळून निराळा उपाय काढल्याशिवाय गत्यंतर नाहीं. सरकारी ही तांबडी रेघा आहे, आणि हिच्या अलीकडे कि पलीकडे जातां येत नाहीं असा कोणताही नियम समाजाच्या शास्त्राला लागू पडत नाहीं. तेव्हां आह्मी वरील अमेरिकेचें ध्येय सरकारा पुढें मांडीत आहों. आणि लोकही त्या ध्येयाजवळ जवळ मार्ग क्रमण्यास सरकाराचे साह्यकारी होण्याला कधीं ही कचरणार नाहींत. हल्लीं विद्येच्या प्रकाशानें हिंदी ब्राह्मणवर्ग ( यज्ञोपवीती नव्हे तर सदृश कर्मकारित्वानें ) इतका कार्यक्षम व विद्या शिकविण्याला योग्यसा झालेला आहे कीं सरकारी विद्याखातेंच बंद झालें तरी चालेल. त्या खात्याचा सर्व कार्यभाग शिरीं घेण्यायेवढा हा वर्ग चांगला समर्थ आहे. फक्त सरकारनें त्याच्या खर्चाचीच व्यवस्था केली पाहिजे.

---

## दाव्यांचा प्रवास.

### (मेहेकरहून बुलढाणा)

मेहकरास आम खबर आहे कीं मेहेकरच्या मुनसफ कोर्टांत दिवाणी दाव्यांची गर्दी आहे व त्यामुळें निकालाला विलंब न लागावा ह्मणून लोकांची गैरसोय दूर करण्याच्या दृष्टीनें ७० दिवाणी दावे बुलढाणा कोर्टाकडे धाडण्याचा हुकूम होत आहे. त्यामुळें एका पक्षकारांच्या हितचिंतकानें एक पत्रव्यवहार धाडला आहे. त्यांतील मुख्य विचार असा कीं बुलडाण्याच्या डोंगराकडे प्रवास करू घातलेल्या या ७० दाव्यांतील पक्षकारांस व साक्षीदारांस मेहकरापेक्षां बुलढाण्याची सफर अधिक त्रासाची, लांबच्या पल्याची व अधिक खर्चाची होणार आहे. नुसत्या पक्षकारांचा जाण्या येण्या निमित्त हजार दोन हजार रुपयांचा अधिक फन्ना उडेल. त्या शिवाय मेहकरच्या वकिलांना पैसे देऊनही बुलढाण्याच्या वकिलांना पुनः वकिली द्यावी लागेल. या शिवाय साक्षिदारांनिमित्त जो ज्यादा खर्च लागेल तो निराळाच. तेव्हां पश्चिम वऱ्हाडचे डिस्ट्रिक्ट आणि सेशन जज रावबहादूर विनायक मोरेश्वर केळकर या गोष्टीचा पुनः विचार करितील (आगे) हितचिंतकानें सुचविल्याप्रमाणें) बुलढाण्यास कमी काम असलेले न्यायाधीश मेहकर कोर्टावर महिन्यांतून १२ १५ दिवस फिरतीवर पाठविण्यांत येतील तर थोड्या खर्चांत लोकांचा बहुत फायदा होण्यासारखा आहे. मुंबई इलाख्यांत कांहीं न्यायाधीश असे फिरतीवर राहून २ कोर्टांचें काम करीत असतात, व युक्तीच्या दृष्टीनेंही ही योजना मान्य होण्यासारखी आहे. तेव्हां रावबहादूर केळकर मेहकर तालुक्यांतील मंडळीस या बाबतींत योग्य ती दाद देतील असा आह्मास पूर्ण भरंवसा आहे.

---

## बालचमू.

इंग्लंडांत **बालचमू** ही एक मोठी वर्णनीय संस्था आहे. ही संस्था ह्मणजे लष्करी शिक्षणाचें किंबहुना सुशिक्षणाचें पहिलें मंदीरच होय. यवतमाळचे लोकप्रिय डिपटी कामिशनर राजश्री चॅपमन साहेब यांस ही संस्था इतकी आवडते कीं जेथें जेथें ते जातात तेथें तेथें बालचमूची संस्था काढण्यास ते चुकत नाहींत. विद्यार्थ्यांचें

जग हें त्यांचें मोठें आवडतें जग आहे. विद्यार्थ्यांच्या संबंधाचा प्रश्न केव्हांही निघाला कीं ते त्यामध्यें आपलें तन मन व धन हीं सर्व अर्पण करतात. त्यांची मोठी कल्याणदृष्टी आहे. आणि ह्मणूनच ते थोडे दिवस कमिशनर होते तेव्हां त्यांनीं या बालचमूच्या संस्थेचा आकोल्यास ही प्रारंभ केला आहे. विलायतेंतल्या बालचमूला जसे अधिकार, हक्क व लष्करी शिक्षण मिळतें, तशा त्या गोष्टी इकडे अद्याप कायद्यानें प्रचलित होवूं शकत नाहींत. ह्मणून त्यांनीं आपल्या संस्थेला सद्विद्यार्थी-संघ असें अर्थद्योतक नांव दिलेलें आहे. या संवाद्य अद्याप आमच्या जिल्ह्यांत ह्मणण्यासारखें नांवरूप आलेलें नाहीं; पण शनैः शनैः हा संघ मार्ग क्रमत आहे असें वाटतें. विद्यार्थ्यांचे खेळ, पोहणें, कसरत व इतर सामने यांच्या मनलेपर्यंतच सध्याची प्रगती होणार आहे. राजश्री चापमन आपला जिल्हा सोडून कोठें जात नाहींत ह्मणून त्यांचे हे संघ इतरत्र नीटसे फैलावत नाहींत; पण आह्माला ठाऊक आहे कीं त्यांच्या मनोराज्यांतलें "बालचमू" हें मोठें दिव्य-स्वप्न आहे. आणि त्याला मूर्तिमंत रूप आणण्याला त्यांना योग्य सवलती मिळतील तर खात्रीनें ते ही आपली संस्था यशस्वी व कीर्तिकारक करतील; इतकेंच नाहीं तर सांप्रतच्या महायुद्धाच्या गोष्टी जेव्हां मुलें ऐकतात व नीरस व आव्यापाराच्या ह्मणून सोडून देतात तेव्हां तेव्हां राजश्री चॅपमन हे आपल्या बालचमूंना युद्धांतले महावीर या चमूमधूनच निघणार आहेत, आणि साम्राज्याची खरी भावी शक्ती या बालचमूमधूनच उदयास येणारी आहे असें उत्कृष्टपणें निदर्शनास आणून देतील. आणि क्षात्रधर्माचें तेज, शालीनता व ओजस्विता हीं आमच्या तरूण पिढीस किंबहुना आमच्या या राष्ट्राच्या आधारस्तंभांस मनोमय पूर्णपणें कळून चुकतील. आमचें प्रांतिक सरकार सध्यां सैन्यांत भरती करून घेण्याचा मान हिंदी लोकांस नानाप्रकारें देऊं इच्छीत आहे, त्या मानापेक्षां आह्माला हा मान मोठा वाटेल कीं त्यांनीं आमच्या बाल विद्यार्थ्यांस ब्रिटिश प्रजाजनाचें हक्क स्वातंत्र्य पूर्णपणें लाभण्यासाठीं हें पहिलें बालामृत देण्याचा संकल्प करावा. अराजकपणाचाही सर्वत्र या रितीनें बीमोड होईलच होईल. इंग्लंडांत जर बालचमूनें अराजकपणा उत्पन्न होत नाहीं, तर या इंडियन भूमीवर त्याला कधींच थारा मिळणार नाहीं असा आमचा पूर्ण भरंवसा आहे.

---

# पुष्पांजली.

(आकोल्याच्या लोक समुदायाची मनोवृत्ती)

सांप्रतच्या महायुद्धांत साम्राज्याचें अंग ह्मणून हिंदी राष्ट्राकडे जो कार्यभाग येत आहे, तो प्रत्यक्ष क्रियेपेक्षां विचार मूर्तीतला विशेष आहे. पण त्यामुळें आमच्या कार्याचें महत्व किंवा पवित्रपणा हीं कांहीं कमी नाहींत. कवी आपल्या काव्यानें राष्ट्र बनविती, चित्रकार आपल्या हृदयंगम चित्रानें राष्ट्राला पुढील मार्ग दर्शविती, किंवा गंधर्व आपल्या आलापानें राष्ट्राचें दैवी गाणें गात असतो, तद्वत आह्मी हिंदी लोकांनीं गेल्या ४ थ्या आगष्टला नव्या ब्रिटिश (आर्य) साम्राज्याचे देवे गाऊन जी मंत्रपुष्पांजली ईश्वर चरणीं अर्पण केली आहे ती आमच्या राज्यकर्त्यांचा सत्य संकल्पाच्या व मनोरथांच्या सिद्धीची प्रसादचिन्हेंच होत. विचारांचे प्रोत्साहन विश्वकर्म्याच्या रचनेहून ही बलवत्तर आहे. आणि याच दृष्टीनें आह्मी आमच्या हृदयांतला हार्दिक संदेश आमच्या स्थानिक सरकार मार्फत रणांगणांतील आमच्या ब्रिटिश, फ्रेंच व रशियन योध्यांस व तसेंच आमच्या देशी सैनिकास पाठवीत आहों.

गेल्या शुक्रवारीं सायंकाळीं येथील श्रीराम थिएटरांत व त्याच्या सभोंवार मिळून ४-५ हजार लोकांचा समूह जमला होता. जिकडे तिकडे एकाच विचाराची स्फूर्ति लोकांचीं मनें प्रकाशित करीत होती. अशा समयाच्या ओघांत आमचे डिपटि कमिशनर राजश्री जठार यांनीं प्रेमळपणानें सुचविल्या-अन्वयें नामदार रावबहादुर केशव गोविंद दामले यांनीं अध्यक्षस्थान स्वीकारलें. त्या वेळीं वक्त्यांच्या तोंडचे शब्द कानावर येण्यापूर्वींच ज्याच्या त्याच्या प्रसन्न मुद्रेनें विचार अधिक स्पष्टतेनें कळत होते. लोकसमूह मोठा त्यामुळें वक्त्यांची शब्दशक्ती काम करीत नव्हती; पण विचारांच्या क्रांतीच्या रूपरेषा फार स्पष्टपणें उमटल्या होत्या. इंग्रजी, मराठी व उर्दू अशीं भाषणें झालीं. त्यांतील एक उत्तमोत्तम भाषण आह्मी या जाहीर-सभेची नीटशी कल्पना येण्यासाठीं मुद्दाम देत आहों. राव बहादूर विष्णु मोरेश्वर महाजनी या सुप्रसंगाला उद्देशून बोलले. तें त्यांचें भाषण वाचलें ह्मणजे पुष्कळसे लढाईचें भविष्य वर्तविण्यास वाचकवर्ग साहजीकच तयार होईल. ते ह्मणाले कीः—

आज आपण येथें कशा करितां जमलों आहों? व सर्व हिंदुस्थानभर सर्व धर्मांच्या देवळांत आज कां लोक जमले आहेत?

देवाची प्रार्थना करावी ह्मणून. पण प्रार्थना काय करायाची?

आज दोन वर्षें सतत— दिवस नाहीं रात्र नाहीं,— भूमि, आकाश, समुद्रपृष्ठभाग, समुद्राचें पोट— यांवर, आंत चालणारें घनघोर युद्ध संपावें ह्मणून!—

युद्धांत लाखों माणसांची आहुति पडत आहे, नगरें, त्यांतील मंदिरें उध्वस्त होत आहेत, दारूगोळ्यांचा फन्ना उडत आहे, मुलूखचे मुलूख वैराण बेचिराग होत आहेत, याच्या वार्ता कोणाच्या कानीं आल्या नाहींत? कोणाचें हृदय फाटून गेलें नाहीं?— तरी पानावर पान ठेवून तह होऊन हें युद्ध संपावें अशी आपली इच्छा असूं नये.

असा तह— आज जी स्थिति आहे ती कायम ठेवून— कबूल करून— संयुक्तराष्ट्रें युद्ध संपवायास राजी असतील तर जर्मनी एका पायावर तयार आहे.

पण तसा तह करणें योग्य होईल काय? नाहीं— कां?

लक्षावधि लोकांनीं आपले प्राण धारातिर्थी अर्पण केले, त्याचा हाच मोबदला का? ज्या लघुराष्ट्रानें वचन भंग होऊं नये ह्मणून आपल्या अंगावर प्रबल राष्ट्राचा मारा घेऊन— आपलीं नगरें, सुंदर मंदिरें तोफांच्या अग्नि प्रलयांत नष्ट होऊं देऊन— त्या प्रबल राष्ट्राच्या प्रचंड सैन्याला थोपवून फ्रान्स व इंग्लंड यांना तातपुरती तरी जमवाजमव करण्याची सवड दिली, त्या बेलजमचें स्वातंत्र्य पुनः स्थापित न होतांच नष्ट होऊं द्यावें काय? व असें होऊं देऊन राक्षसी सत्तेच्या अप्रतिहत बलाला शरण जाऊन बळ व न्याय हीं एकच आहेत असे मत सर्व पृथ्वीवर प्रचलित होऊं द्यावें काय? मग कल्पक्षयच झाला ह्मणावें.

नाहीं नाहीं. या जगांत अद्याप न्याय कायम आहे, वचनाची मातब्बरी आहे, राष्ट्र लघु असो मोठें असो, त्यास अबाधितपणें आपलें स्वातंत्र्य भोगण्याचा, व इतर राष्ट्रांस अपाय न करितां आपआपल्या धोरणानें प्रगति करण्याचा ईश्वरी हक्क आहे.

त्या हक्कास प्रबल राष्ट्रासही धोका आणण्याचें सामर्थ्य राहूं नये याबद्दल इतर राष्ट्रांनीं चिकाटी धरणें न्याय्य आहे व ती ईश्वरास रूजू होईल; या तत्वांचा विजय व्हावा ह्मणून हें युद्ध करावें लागलें आहे, व तो विजय झाल्यावांचून तें संपतां कामा नये अशी ईश्वर प्रार्थना आपण करावी. प्रथम प्रथम जर्मनी व आस्ट्रिया यांची सरशीच झाली. आज दोन वर्षांत बहुतेक बेलजम व फ्रान्सचा ईशान्य कोपरा व पोलंड शत्रूच्या हस्तगत झालें पुढें ब्रिटन, फ्रान्स, व रशिया व इटली यांना जर्मन व आस्ट्रियन सैन्यें थोपवून धरण्यापलीकडे कांहीं काम करितां आलें नाहीं. पण अलीकडे दोन तीन महिन्यांत त्यांची सरशी होऊं लागली आहे जटलंड जवळ जर्मनीच्या आरमारास ब्रिटिश आरमाराकडून चांगला मार मिळून त्याला पळ काढावा लागला आहे. तात्पर्य ते कील कालव्याच्या दुर्गम बंदरांत निर्वीर्य होऊन पडलें आहे. ब्रिटिश व फ्रेंच सैन्य फ्लांडर्स व सोम नदीच्या कांठच्या प्रदेशांत जर्मन सैन्यांस हळू हळू मागें रेटीत आहेत. इटलीच्या पूर्वेस आस्ट्रियाचे सैन्य हटत आहे. पण रशियाची कर्तबगारी फारच वाखाणण्या जोगी! दारूगोळ्यांच्या कमतरतेनें त्याला एक वर्षापूर्वी माघार घ्यावी लागली, तरी ती धिमेपणानें घेऊन, सैन्यांचा मोड त्यानें होऊं दिला नाहीं. व आतां ब्रिटनच्या कारखान्यांतून दारूगोळ्यांचा भरपूर पुरवठा झाल्यानें त्यानें एक सारखी जर्मन आस्ट्रियांच्या सैन्यांची लगटच केली आहे. जवळ जवळ साठ मैल त्यांना हटवीत नेलें आहे. सैन्यांतील अधिकारी, पायदळ, दारूगोळा, तोफा तो हस्तगत करितच चालला आहे. अर्धा लाख शत्रूचें सैन्य या युद्धांत त्यानें चित केलें आहे. तसेंच आर्मिनिया प्रांत काबीज करून तिकडून तुर्कांचीं सैन्यें उधळून लाविलीं आहेत. ब्रिटिश फौजेनें मेसोपोटेमियांत स्वारी करून बसरा घेतलें; पण बगदाद घेण्याचा त्यांचा व्यूह फसून कट अमारा येथें त्यांचें १०००० सैन्य अन्न पाण्याची सामुग्री नद्यांतून वर न येऊं शकल्यानें शत्रूनें काबीज केलें. त्यांत आपल्या लोकप्रिय डि. क. चे बंधु आहेत! युरोपांत गेल्या वर्षी ब्रिटिश व फ्रेंच सैन्यांस डार्डानेल्स व गालिपोली येथें शत्रूच्या दुर्गम व अमेय व्यूहरचने पुढें हार खावी लागली, पण आतां सालोनिकांत ठाणें बसल्यानें जर्मनीचा नवीन दोस्त बल्गेरिया यांस शह बसून त्यानें उद्ध्वस्त केलेल्या सर्बियाच्या सैन्यांस थारा मिळून तें डोकें वर करीत आहे. आफ्रिकेंतील जर्मनीच्या ताब्यांत असलेल्या मुलखाचा बराच भाग दक्षिण आफ्रिकेचे मंत्री जनरल स्मटस यांनीं काबीज केला आहे. व सर्व प्रांत लवकरच सर होईल अशी उमेद आहे. पासिफिक महासागरांतील जर्मनीच्या ताब्यांतील छोटीं छोटीं बेटें ब्रिटनचे साथीदार जपान यानें पूर्वी काबीज केलीं आहेत.

आतां ब्रिटनमध्यें दारू गोळ्यांचा पुरवठा झपाट्यानें होत आहे. द्रव्यबळाची वाण नाहींच. एतावता मनुष्यबळ, यंत्रबळ, द्रव्यबळ विपुल आहे. लार्ड किचनर अपघातानें समुद्रांत बुडून मेले. त्यांचें प्रबोधक वीर्य, संघटना शक्ति, धोरण हीं अप्रतिम होतीं. परंतु त्यांच्या जागीं आलेले मि. लायड जॉर्ज हे कांहीं कमी नाहींत. हे अष्टपैलू मंत्री आहेत. ज्या फडांत शिरतील, त्याला यश दिल्यावांचून राहायाचे नाहींत. ब्रिटिश आरमारानें समुद्रावरील वर्चस्व कायम ठेविलें आहे. आकाश यानांत ही फ्रेंचांची सरशी होऊं लागली आहे. ब्रिटिश सैन्यांतील एक एक सैनिक वीराप्रमाणें लढत आहे. त्यांचे व फ्रेंचांचे सेनानी एका दिलानें व्यूह रचीत चालले आहेत. तेव्हां या युद्धांत विजयश्री संयुक्त राष्ट्रांस माळ घालील अशीं सुचिन्हें दिसत आहेत.

### जर्मनीची खोटी बुद्धि

अप्रतिहत सैन्यबळानें युद्धकलेंत निपुण झालेल्या वीरांच्या व कलाविदांच्या साहाय्यानें संग्रहीत केलेल्या सर्व प्रकारच्या साधन बलानें शेजारचीं राष्ट्रें अंकित करावीं व आपलें वर्चस्व प्रथम सर्व युरोपभर नंतर एशियामध्यें व आफ्रिकेमध्यें स्थापावें. व पुढें कोटपर्यंत मजल त्यांच्या मतानें पाहिली होती कोणाला ठाऊक? ती बुद्धि नाहींशी करावी, निदान तिचें साधनबल एक पिढीपर्यंत तरी डोकें वर करणार नाहीं अशा प्रकारचा युद्धाचा शेवट झाला पाहिजे. अशी संयुक्त राष्ट्रांची इच्छा आहे. व ती सफल होईल अशीं सुचिन्हें दिसत आहेत.

युद्धाचे घोर परिणाम स्पष्ट दिसतातच. पण त्याचे सुपरिणाम ही आपण विसरतां कामा नये. व यांकडे आपण लक्ष द्या. सर्व हिंदुस्थानभर सरकाराला साहाय्य करण्याची स्फूर्ति एक समयावच्छेदें कोणीं उत्पन्न केली? या युद्धानें—ही निःसीम राजनिष्ठा वरपांगी नाहीं, खोल आहे, हें लार्ड हार्डिंज यांस दिसून येतांच त्यांनीं येथील बहुतेक सैन्य ब्रिटिश सैन्याच्या मदतीस पाठवायाचा हिय्या—कोणाच्या मतें धाडस केलें. बहुतेक सर्व सैन्य परराष्ट्रांत गेले तरी इकडे शांतता! फ्लांडर्स, इजिप्त, गालिपोली, डार्डानेल्स, मेसोपोटेमिया, येथें गोऱ्या ब्रिटिश सैनिकांच्या खांद्यास खांदा देऊन इकडल्या काळ्या सैनिकांना रणांगणांत कर्तबगारी दाखविण्याची संधी कोणी दिली? या युद्धानें— ही राजनिष्ठा ही कर्तबगारी पाहून—सरकारच्या मनांतही येऊं लागलें कीं हिंदुस्थानला आजवर वागविलें तसें पुढें वागविणें बरोबर नाहीं.

हिंदुस्थाननें आत्मयज्ञानें बोलानें नव्हे, कृतीनें ब्रिटिश साम्राज्याचें आपण एक जिवंत अंग आहों, हें सिद्ध करून दाखविलें, तेव्हां तें ही साम्राज्याचा एक घटक अवयव आहे- इतर वसाहतींची सल्ला मसलत साम्राज्याच्या कारभारांत घेणें जसें अवश्य व इष्ट आहे, तशीच हिंदुस्थानची सल्ला मसलत त्या कारभारांत घेणें इष्ट व अवश्य आहे असें वाटूं लागलें आहे. व अशा अर्थाचे उद्गारही कोणा कोणाच्या तोंडून निघाले आहेत. हे ऐकून आपलें मांस मूठभर वाढलें असें वाटत नाहीं काय? आपण केवळ दासांचे राष्ट्र नव्हों— आत्म प्रत्ययावर आपल्या पायांवर उभें राहण्यास लवकर तयार होऊं, अशी भावना आपणास झाली नाहीं काय? या भावनेचीं गोड फळें ईश्वराच्या दयेनें व सरकारच्या उदार दृष्टीनें आपणास मिळालीं तर आपण कोणास दुवा देऊं?—या युद्धाला.

आमच्या हिंदुस्थानांतील प्राचीन ऋषींनीं व मुसलमान सुफींनीं व जैनांनीं व बौद्धांनीं कोणत्या वृत्तीची प्रशंसा केली आहे हें लक्षांत आणा. त्यांनीं तामसी व राजसी वृत्तींचा निषेध करून सात्विक वृत्तीवर कटाक्ष ठेविला. त्या वृत्तीची सरसी होण्याचा हा प्रसंग आहे. पाश्चात्य सुधारणेचें सर्व लक्ष विलास वृद्धीवर आहे. खावें, प्यावें, चैन भोगावी असा तिचा उद्देश आहे, ह्मणून तिचा आपल्या इकडील सात्विकवृत्ती समंजस लोक निषेध करीत असत. पण या युद्धानें तिकडे काय चमत्कार केला पहा! आंगचा आळस, निद्रा, प्रमाद झाडून सर्व जण पुरुष, बायका व मुलें ही हाक मारल्या बरोबर आलें ह्मणून कोणी रणसंग्रामावर, कोणी युद्धसाधन तयार करण्याच्या कारखान्यांत, विलासप्रिय स्त्रिया ही रुग्णांची शुश्रुशा ठेवणाऱ्या इस्पितळांत जात आहेत, पुरुषांनीं सोडलेलीं कामें त्यांना नवल वाटेल इतक्या चतुराईनें बायका करीत आहेत! या विलीन असलेल्या शौर्याचें, उत्साहाचें, चतुराईचें उद्घाटन करण्याचें व एकंदरींत सात्विक वृत्तीचें परिपोषण करण्याचें श्रेय कोणास दिलें पाहिजे? या युद्धाला. ह्मणून आपण सर्व मनोभावानें ईश्वराची प्रार्थना करूं या कीं त्यानें संयुक्त राष्ट्रांस या युद्धांत अशा तऱ्हेचे यश यावें कीं तेणें करून न्यायाची सरशी चोहोंकडे व्हावी, राक्षसी बलाचा नायनाट व्हावा, सर्व लहान मोठ्या राष्ट्रांना सुखानें स्वातंत्र्याचा उपभोग घेतां येऊन आपली प्रगती स्वच्छंदानें करितां यावी. ज्या राष्ट्राच्या उदार छत्राखालीं आपण सुखानें नांदत आहों, त्याचें अभीष्ट चिंतूं या त्यास सर्वपरी सहाय्य करण्यास तयार होऊं या. त्याचें हित तेंच आपलें हित असा आपला समज होऊं द्या ह्मणजे हिंदुस्थानचें हित तें आपलें हित असा ब्रिटिश राष्ट्राचा समज होणार नाहीं काय? सर्वांची मनें एक झाल्यावर ईश्वर सर्व घडवून आणील. आपणांस मनाप्रमाणें या युद्धांत संयुक्त राष्ट्रांस पूर्ण यश देऊन न्यायाचा विजय करील अशी आशा करणें वावगें नाहीं. ईश्वर न्यायी आहे, दयाळू आहे. शांतिः शांतिः शांतिः

## मेच्नी कोव्ह.

ज्या लोकांस शास्त्रीय विषयांचा अभ्यास करण्याचा नाद आहे, किंवा ज्यांस शास्त्रीय विषयांची थोडी अभिरुची आहे अशांस मेच्नी कोव्ह यांचें नांव अपरिचित नाहीं. अलीकडे अलीकडे त्यांचें नांव डार्विन इतकें विश्रुत होत चाललें होतें. हे प्रथमतः झुआलजी व नंतर यंत्रशास्त्राचे प्रोफेसर झाले. वयाचे ४५ वे वर्षी ह्मणजे सन १८९० सालीं प्यॅस्टूर यांचे हाताखालीं त्यांच्या विद्यालयांत शिकण्यासाठीं ते पॅरिसमध्यें दाखल झाले. त्या ठिकाणीं त्यांनीं पुष्कळ लहानमोठे ग्रंथ प्रसिद्ध केले व त्यांस मोठमोठालीं बक्षिसें ही मिळालीं. त्यांच्या सर्व निबंधांत आयुराभिवृद्धी हा ग्रंथ साधारण जनतेस सुद्धां आवडेल असा आहे; दुधाला आम्ल करून त्यांतून Lactic Acid काढतात हे सर्व अल्पल्पास ही माहीत आहे. दुधाचा पाचकपणा व त्या पेक्षांही विशेषतः ताकाचा पाचकपणा या असीडामुळें विशेष आहे हें ही सर्वांस माहीत आहे, परंतु **मेच्नी कोव्हनें** सर्वांस कळेल अशा विशद रितीनें जगापुढें हें मांडून दाखविलें कीं जर आपणास अकालिक वृद्धावस्था आली तर प्रायः आपल्या आतड्यामध्यें असणाऱ्या क्रमींचा पाचन क्रियेवर मोठा परिणाम घडत असतो. आतड्यांत एक प्रकारची न्हासक्रिया सुरु होते. पुष्कळ आजारांत विरजलेलें दूध दिलें असतां किंवा अन्नाबरोबर ताक दही खाल्लें असतां आतड्यांतील क्रमी नाहींशा होतात. आणि पचनक्रिया उद्दीप्त होते. मेचनी कोव्हनें जो शोध लावला तो बल्गेरिया, ईजिप्त आणि विशेषतः हिंदुस्थान या देशास फार पुरातन काळापासून अवगत होता. परंतु दहिताकाची मीमांसा हिंदुस्थान देश विसरून गेला होता. दहीताकांत Lactic Acid असतें आणि त्याचे योगानें आतड्यांना जोर मिळतो हें लक्षांत येण्यास वेळ लागला नाहीं. परंतु त्याची पद्धतवार मांडणी मेच्नी कोव्हनें केली. जर एकाद्या मनुष्यास दीर्घायु प्राप्त झालें तर वृद्ध पण जोमदार मनुष्यमात्र मरण हा मनुष्याचा स्वाभाविक धर्म आहे हें त्यांस बाणून ज्या प्रमाणें तो थकल्यावर निद्रेची आराधना करितो, तितक्याच उल्हासानें जीर्ण देह झाल्यावर मरणाची अपेक्षा करीत राहील. हल्लीं नैसर्गीक दीर्घायुष्य प्राप्त होण्यापूर्वीच मनुष्य मृत्युस्थानीं पडतो. ती अवस्था टाळण्यास व मरणाची भीती नष्ट होण्यास मेच्नी कोव्हचा निबंध, त्याचें मनन आणि त्याचें परिशीलन फार जरूर आहे. मेचनी कोव्हनें आपला विषय प्रतिपादन करण्याकरितां आणि त्यांनीं काढलेले सिद्धांत ठरविण्याकरितां जो युक्तिवाद केला आहे तो सर्वांस समजण्यासारखा आहे. सदढ स्थितींत ह्मातारपण कसें प्राप्त करून घ्यावें हें त्याच्या ग्रंथावरून समजतें. अल्पज्ञ जनसमूह देखील त्याच्या वाचनानें त्याच्या ह्मणण्यास संमति देतो. त्याचें ह्मणणें खरें आहे असा प्रत्येकास प्रत्यय येतो. त्यानें अनेक नानाविध प्रकारचे शोध लाविले आहेत. मानवीस्वभाव (१९०३) दूषित रोग (१९०६) मनुष्याचें दीर्घायुष्य (१९०७) हे तीन ग्रंथ क्रमोद्‌वाही आहेत. व हे तीन्ही वाचले असतां आपणास आपल्या स्वतःच्या शरीररक्षणाचें बरेच साधन आपण आपले स्वाधीन करून घेतल्या सारखें होईल. बहुतेक लोकाग्रणी नेत्यांप्रमाणें आपल्यापुढें एक व्यवहारसदृश ध्येय पुढें ठेवून तत्प्राप्त्यर्थ उद्योग केला असतां मनुष्य आपलें स्वतःचें आयुष्य दुसऱ्यास किती उपयुक्त करून देवूं शकतो हें ह्या शास्त्रज्ञाच्या चरित्रावरून आणि ग्रंथांवरून कळून येतें.

## सर एडवर्ड ग्रे.

इंग्लंडच्या इतिहासांत एकसारखे फॉरेन सेक्रेटरीचें काम १० वर्षांपेक्षां अधिक दिवस केले असे काय ते लॉर्ड पॉमरस्टन्, लॉर्ड कासलरेघ आणि लॉर्ड सालिसबरी असे तीनच मंत्री आढळतात. आजपर्यंत परराष्ट्र खात्यांत प्रधानाचें काम ही जागा निर्माण झाल्यापासून ह्मणजे सन १७८२ पासून एकंदर २८ गृहस्थांनीं केलें. परंतु १० वर्षांहून अधिक काम केलेले काय ते तीनच प्रधान सापडतात. चवथे सर एडवर्ड ग्रे हे होत. ११ डिसेंबर १९०५ पासून हे एकसारखे या प्रधानगिरीवर आहेत. प्रधान मंडळांतील एखाद्यास बडे लॉर्डाची पदवी देऊन अपर हाऊसमध्यें न्यायवयाचे असल्यास व्हायकाउंटची पदवी मिळते. जान मोर्ले साहेबांसारख्या आपल्या विद्वत्तेनें सर्व जगांस थक्क करून सोडणाऱ्या विद्वानास देखील व्हायकाउंटची पदवी मिळाली ग्लॅडस्टनसाहेब ७७ वर्षांचे झाले. त्यांनीं ३ वेळां मुख्य प्रधानाचें काम केलें, तेव्हां त्यांस मेहनतीच्या आणि दगदगीच्या कामांतून सोडवून विश्रांतीचा अर्ल् करण्याचें राणी सरकारचे मनांत आले. त्यांनीं तो मान नाकारला व नेहमीच्या रिवाजास सोडून सर एडवर्ड ग्रे यांस एकदम अर्ल्‌ची पदवी देण्यांत आली आहे. या १० वर्षांत इंग्लंडचे परराष्ट्रीय धोरण फारच नाजूक आणि गुंतागुंतीचें झालें होतें. अशा वेळीं बाष्कळ चळवळी करून किंवा देशास असंबद्ध प्रलापप्रचूर भाषणें करून अन्य लोकांची सुलभप्रीती संपादन करून न घेतां इंग्लंडची मान्यता वाढेल अशाच धोरणानें सर एडवर्ड ग्रे यांनीं इंग्लंडची मान्यता आणि इभ्रत वाढवून अश्रुतपूर्व स्नेह संपादन करवून इंग्लंडाचे सर्व जगांत वर्चस्व कायम केलें. अशा प्रधानास बादशहासाहेब मोठ्या गौरवानें त्यांचे वयाचे ५९ वे वर्षी अर्ल् करून लार्डाचे सभेंत नेत आहेत ही गोष्ट अनेक प्रकारें देशभक्तांनीं ज्वलज्जहाल, जहाल, मवाळ आदि पर्याय विशिष्ट लोकांनीं ध्यानांत ठेविली पाहिजे. देशकार्य धुरंधर कोणते ही स्थितींत असला तरी त्यास लोकोत्कर्ष करून देतां येतो. व आधींच अवजड असणाऱ्या श्रृंखलेस अंशतः तरी हलके करून देतां येते. अर्ल् ग्रे यांजवळ एखादा छापखाना व तद्वारें लोकांच्या पुढें नियमित दिवशीं फेकून देण्यासाठीं एकादें वर्तमानपत्र नव्हतें पण वर्तमानपत्रापेक्षां मोठा अधिकार होता ह्मणून त्यांस आपलें ध्येय संपादण्यास बरीच संधीही मिळत असे हें ही कबूल केलें पाहिजे.

# वऱ्हाडवृत्त.

**हवामान**—या सप्तकांत वर्षाश्री विलक्षण होती. बुधवारीं रात्रौ तर मेघ व विद्युत यांचें महायुद्ध झालें व त्या वेळची ती गर्जना, लखलखाट व कडकडाट एवढे विकट कीं सर्वजण झोंपेतून जागे झाले. आणि लागलींच पर्जन्यही फार वेगयुक्त झाला. क्षणभर सृष्टी आनंदानें तांडव करीत आहेशी दिसली. एकंदर पाऊस २४ इंचावर असून आतां मेघांनीं आपले बाण आवरावे ह्मणून प्रार्थना चालू आहे. प्लेगाच्या दराऱ्याशिवाय दुसरी रोगराई नाहीं.

**धन्यवादः**— लेहार तालुके बाळापूर येथील रा. रा. शेख पापा देशमुख यांनीं आपल्या गांवच्या शालागृहासाठीं १००० रु. दिले, त्या बद्दल सरकारी ग्याझेटांत त्यांचा गौरव केला आहे.

**वास्तु समारंभः**— उमरावती येथील मुसलमानी सरकारी हायस्कूलांच्या नव्या सुंदर इमारतीचा वास्तु आलिशान नामदार सर बेंजामीन यांच्या यशस्वी हातानें गेल्या शनिवारीं साजरा करण्यांत आला. विद्याविषयक कार्यांविषयीं सर बेंजामीन इतके सोत्कंठ असतात कीं ते अशा समयाला मोठ्या प्रेमानें व आनंदानें येतात हें आह्मी विसरणार नाहीं. या भेटी निमित्त उमरावतीस कांहीं नव्या किताबवाल्या मंडळीस त्यांच्या त्यांच्या किताबाचें सुवर्ण लेखही देण्यांत आले आहेत. त्या मध्यें आमच्या नगरचे रावसाहेब रामभाऊ महाजनी हे ही एक आहेत.

वाघोली येथील नाववाले कंत्राटदार उतारूंना त्रास देतात व भलतासा उतारा मागतात अशी तक्रार आली आहे; तिकडे मेहेरबान तहसिल्दार साहेब लक्ष पुरवतील.

रा. रा. एस्. क्लेमेन्टस् एजंट, आकोला ब्यांक, यांची बदली भडोच येथें झाल्यावरून, ते आठ दिवसापूर्वी येथून गेले आणि गेल्या शुक्रवारीं त्यास एका एकीं [illegible] झाली! हे गृहस्थ स्वभावानें विनोदी व कामांत दक्ष असत.

**प्लेगाचे उंदीरः**— येथील हायस्कूलच्या इमारतींत व नॉर्मलस्कूलच्या इमारतींत हे उंदीर सांपडले ह्मणून या शाळा दहा दिवस बंद करण्यांत आल्या आहेत. पेठेंतील कित्येक घरीं हे उंदीर गरगर फिरून निश्चेष्ट पडतांना दृष्टीस पडले. स्थान त्यागाच्या तयारीला लोक लागले आहेत. तेव्हां या पावसाळ्याच्या कटकटींतही वातावरणातले विद्युत प्रवाह, निरामय हवा व ओजस्वी सूर्यप्रकाश हीं सृष्टीशी त्यांस रममाण करून सोडतील.

हें पत्र आकोला येथें कैलासवासी खंडेराव बाळाजी फडके यांच्या वऱ्हाडसमाचार छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं सदाशिवाश्रमांत छापून प्रसिद्ध केलें.

Regd-No. N150

# वऱ्हाडसमाचार.

Berar-Samachar.

वर्ष ५० ] आकोला—सोमवार तारीख १४ माहे आगष्ट सन १९१६ इ० [ अंक ३२

# हिंदुस्थान सरकार.

—:*:-:*:-:*:—

## सन १९१६-१७ चे कनव्हर्शन लोन

## [ मोबदल्याचें कर्ज. ]

### पोस्ट आफिस विभाग.

**ह्या कर्जाची फेड भर किंमतीनें सन १९३० नंतर आणि सन १९३७ चे आंत करण्यांत येईल.**

**व्याज दरसाल दरशेकडा ४ टक्के दरानें दर सहा महिन्यांनीं ह्मणजे एप्रिलचे व ऑक्टोबरचे १ ल्या तारखेस देण्यांत येईल.**

**शेंकडा ३ अगर ३॥ टक्के दरानें पूर्वीं दिलेल्या कर्जाच्या रोख्यांच्या मोबदला ह्या नवीन कर्जाचे रोखे घेण्याचा अर्जदारास हक्क राहील.**

अर्ज द्यावयाचे ते १०० रुपयांसाठीं अगर शंभरांनीं बरोबर भाग तुटेल अशा ५००० रुपयांहून जास्त नाहीं इतक्या कोणत्याही रकमेसाठीं द्यावेत, व ते तारीख १४ जून सन १९१६ ते ता. २९ सप्टेंबर सन १९१६ पर्यंत ( ह्या दोन्ही तारखा धरून ) कोणत्याही दिवशीं सेव्हिंग्ज बँकेचें काम करणाऱ्या कोणत्याही पोस्ट आफिसांत घेण्यांत येतील. अर्ज कोणाही मनुष्यास करतां येतो, मग तो सेव्हिंग्ज बँकेचा ठेवीदार असो वा नसो.

जितक्या कर्जाकरितां अर्ज असेल तितकी पुरी रकम अर्जाबरोबर अमानत ठेविली पाहिजे, आणि त्या रकमेचा अर्जदारास कर्जरोखा देण्यांत येईल. अमानत रकम ठेवणें ती रोख ठेवावी अगर सेव्हिंग्ज बँकेमध्यें असलेल्या आपल्या खात्यांतून लागेल ती रकम काढून तिची पूर्ण किंवा अंशतः भरपाई करावी.

पोस्ट आफिस मार्फत दिलेल्या नवीन कर्जाचा कर्जरोखा जर पोस्ट आफिस अधिका-ऱ्यांचें ताब्यांत ठेवला असला तर त्या रोख्यावर मिळणाऱ्या व्याजावर प्राप्तीचा कर आकारण्यांत येणार नाहीं.

नवीन कर्ज जितक्या रकमेचें देऊं केलें असेल त्या रकमे इतक्याच हिंदुस्थान सरकारच्या दर शेकडा ३॥ टक्के व्याजाच्या रुपी सिक्यूरिटीज़ त्यांच्या दर्शनी किंमतीच्या शेंकडा ९६ या दरानें आणि दरशेंकडा ३ टक्के व्याजाच्या रुपी सिक्यूरिटीज़ त्यांच्या दर्शनी किंमतीच्या शेकडा ८२॥ या दरानें देऊन त्यांचे मोबदला हें नवीन कर्ज देण्याचा हक्क अर्जदारांस मिळेल व तो हक्क दुसऱ्या कोणास बेचन करून देतां येईल.

मोबदला करण्याचा हक्क धारण करणाऱ्या इसमांचे मोबदला करण्यासाठीं अर्ज ता. १६ आक्टोबर सन १९१६ पासून ता १६ जानेवारी सन १९१७ पर्यंत ( दोन्ही तारखा धरून ) घेण्यांत येतील. मोबदला करण्यांत येणाऱ्या सिक्युरिटींवर, त्या मोबदला करण्याचे वेळीं, ता ३० सप्टेंबर सन १९१६ पर्यंत व्याज देण्यांत येईल आणि त्यांच्या ऐवजीं दिलेल्या नवीन कर्जावर ता. १ आक्टोबर सन १९१६ पासून व्याज सुरू होईल.

या संबंधानें तपशीलवार माहितीच्या जाहिरातीच्या प्रती आणि अर्जाचे नमुने सेव्हिंग्ज बँकेचें काम करणाऱ्या कोणत्याही पोस्ट आफिसांत मिळतील.

इच्छा असल्यास सोबत जोडलेला नमुना उपयोगांत आणावा.

---

**हिंदुस्थान सरकारचे सन १९१६-१७ चे शेंकडा ४ टक्के व्याजाचें कन्व्हर्शन लोन ( मोबदल्याचे कर्ज ) साठीं पोस्ट आफिसमार्फत करावयाच्या अर्जाचा नमुना.**

(सेव्हिंग्ज बँकेचें काम करणाऱ्या कोणत्याही पोस्ट आफिसांत ता. २९ सप्टेंबर सन १९१६ पावेतों हा अर्ज दाखल करावा. वाटल्यास हा नमुना कापून काढून उपयोगांत आणावा.

मी ______________________ अक्षर वाचतां येईल असें स्वच्छ लिहावें.

या अन्वयें अर्ज करतो कीं ता. ८ जून सन १९१६ चे गॅझिट ऑफ इंडिया, एक्स्ट्राआर्डिनरी, मध्यें जाहिर करण्यांत आलेल्या सन १९१६-१७ च्या शेंकडा ४ टक्के व्याजाच्या कन्व्हर्शन लोनपैकीं __________ रुपये कर्ज मजपासून घ्यावें.

ज्या रकमेचें कर्ज देण्याकरितां मी अर्ज केला आहे त्या रकमेच्या भरपाईसाठीं

(१) मी या सोबत { रोख रुपये __________ / चेकनें रुपये __________ } सादर करित आहें.

(२) या सोबत मी आपलें पासबुक पाठवीत आहे आणि सेव्हिंग्ज बँकमध्यें माझे खातीं जमा असलेल्या रकमेंतून रुपये __________ काढन घेण्याचा मी अधिकार देत आहे.

__________

एकूण रुपये........

रोख रकम किती दिली, चेकनें किती व सेव्हिंग्ज बँकमध्यें असलेल्या ठेवींतून काढून कांहीं रकम दिली असल्यास तो किती त्या रकमा त्यांकरितां रिकाम्या सोडलेल्या जागेंत वेगवेगळ्या नमुद कराव्यात. जो मजकूर अनवश्यक असेल तो खोडून टाकावा.

(अ) माझी विंनती आहे कीं कर्जाचा जो हिस्सा मजपासून घेण्याचें मंजूर होईल त्याबद्दलचा कर्जरोखा अकौंटंट जनरल पोस्ट्स अँड टेलेग्राफ्स यांचे जवळ माझेतर्फे ठेवावा आणि त्याबद्दल मिळणारें व्याज

(१) __________ पोस्ट आफिसमध्यें माझे नांवानें सुरू असलेलें सेव्हिंग्ज बँक खातें नंबर __________ यांत जमा करावें. ( अर्जदाराचें खातें सेव्हिंग्ज बँकमध्यें आधीचेंच नसेल तर पारिग्राफ (१) खोडून टाकावा )

(२) __________ पोस्ट आफिसांत माझे नांवानें सेव्हिंग्ज बँकेचें खातें सुरू करून त्यांत जमा करावें.

(ब) माझी अशी विनंति आहे कीं कर्जाचा जो हिस्सा मजपासून घेण्याचें मंजूर होईल त्याबद्दल खालीं लिहिलेल्या प्रकारच्या प्रामिसरी नोटा मला द्याव्या आणि व्याज __________ ट्रेझरीमधून मला मिळावें असा त्यांवर शेरा लिहावा.

(अ) किंवा (ब) ह्या दोहोंतून एक पारिग्राफ भरून दुसरा खोडून टाकावा.

मी अशी विनंति करतो कीं सन १९१६-१७ चे शेंकडा ४ टक्के दराचे कन्व्हर्शन लोनपैकीं ज्या रकमेचें कर्ज देण्यासाठीं मी अर्ज केला आहे त्या रकमेइतक्या शेंकडा ३॥ अगर ३ टक्के दराच्या हिंदुस्थान सरकारच्या रुपी सिक्यूरिटी मोबदला करण्याचा अधिकार देणारें वारंटही मला द्यावें.

नांव __________________

पत्ता __________________

तारीख __________

पोस्ट आफिसांत दाखल केल्याची तारीख __________

( ही तारीख ज्या पोस्ट मास्तरानें अर्ज घेतला त्यानें नमुद करावयाची )

रजिस्टर नंबर __________

( हा नंबर हेड पोस्ट मास्तरानें घालावयाचा ).

नो नं. २४१

हेड आफिसचा छाप.

'वऱ्हाडसमाचार प्रेस' आकोला.

## वर्गणीचे दर

आकोल्यांतील लोकांस........१ रुपया
बाहेरगांवीं ट हां. ........ २ रुपये
वर्गणी आगाऊच घेण्याची वहिवाट आहे.

## नोटीशीचे दर

दर ओळीस दीड आणा.
हेडिंगच्या दोन ओळी धरल्या जातील.
नोटीस सुवाच्य असली पाहिजे.
सूचनाः- गुरुवारच्या आंत येणाऱ्या नोटीसा त्याच आठवड्यांत घेतल्या जातील. पाचुर्दे येणाऱ्या नोटीसास स्पेशल चार्ज पडेल.

# नोटीस.

हिंदुस्थानच्या बादशहाच्या फौजेमध्यें चाकरी करण्याचे नियम.

-:❀:❀:❀:-

## ब्राम्हण लोकांकरितां

—:*:0:*:0:*:—

सरकारच्या मनांतून एक ब्राह्मण लोकांची डबल कंपनी ( १ जमादार, ४ नाईक आणि २०० शिपाई ) ११६ मराठा इन्फन्द्री करितां तयार करावयाची आहे. या पैकीं निम्मे लोक मध्यप्रांत आणि वऱ्हाड व बाकीचे निम्मे इलाख्यातून भरती करावयाचे आहेत.

वऱ्हाडांतील राहिवाशांनीं नावें नोंदण्याचे अर्ज जिल्हा अधिकारी ह्मणजे डिपुटी कामिशनर यांजकडे करावेत, अगर इलिचपूर, खामगांव व वाशीम सब डिव्हिजन मधील लोकांनीं आपआपल्या सबडिव्हिजनल आफीसरकडे करावेत.

रिक्रूटनीं लढाई चालू असेपर्यंत अगर इच्छा असल्यास पुढें ही नोकरींत राहण्याकरितां नावें नोंदावींत. ते शिकून पूर्ण तयार झाल्याशिवाय त्यांना लढाईवर पाठविलें जाणार नाहीं. ज्या लोकांनीं लढाई चालू असतांना लष्करी खात्यांत नोकरी केली असेल त्या लोकांना पुढें सरकारी नोकरींत शिरते वेळेस जो काळ लष्करी खात्यांत गेला असेल तो काळ वयाच्या मुदतींतून वजा करण्याचें सरकारांनीं ठरविलें आहे.

रिक्रूटची उंची कमीतकमी ५ फुट ४ इंच, छाती ३१ इंच ( आवस्तृत ) आणि ३३ इंच ( विस्तृत ) असावी. वय १६ आणि २६ या दरम्यान असावें व त्यास कोणतेही शारीरिक व्यंग नसावें व तो सशक्त, बळकट व बुद्धीवान असावा.

शिपायास ११ रु. पगार मिळून महागाई भत्ता धान्याच्या भावाप्रमाणें मिळतो. हल्लीं हा भत्ता दक्षिणेंत ५ रु ८ आ. आहे. ह्मणजे शिपायास एकंदर वेतन १६ रु. ८ आ. मिळते या शिवाय दर वर्षी कपड्याकारितां व बुटाकरितां १२ रु. मिळून शिवाय नोकरींत शिरते वेळेस ६० रु. किंमतीपर्यंत लढाईचा सरंजाम मिळतो. ११६ मराठा लोकांची पलटण हल्लीं वायव्य सरहद्दीवर बनु येथें आहे.

नो नं २४२

# चांदीचींभांडीं

नाशिक येथें तयार केलेलीं सर्व प्रकारचीं सुबक व घाटदार भांडीं आमचेकडे विक्रीस तयार असतात भाव माफक व्ही. पी. नें अगर रोखीनें पाठवू. मालाचे खरेपणाबद्दल ग्यारंटी देऊ

पुरुषोत्तम रामचंद्र वैशंपायन
रविवार पेठ नाशिक सिटी.
नो. नं. ४

## सुबोधमाला.

सद्यःस्थितीस अनुसरून प्रगतीपर, ज्ञानप्रद, व मनोरंजक मासिक पुस्तक.

नामांकित लेखकांचे विचार परिप्लुत निबंध, बोधपर गोष्टी, अनुकरणीय चरित्रें हृदयंगम कविता, चालू कादंबरी वगैरेनीं युक्त पृष्ठें दरमहा ३६. वार्षिक वर्गणी बाहेरगांवीं ट. ख सह १॥≈ उमरावतीस रु. १॥ उमरावतीचे एजंट रा. सदाशिवराव देशमुख. जानेवारी १९१६ पासून सुरू झालें आहे. एजंट पाहिजेत

संपादक— काशीराव बापुजी देशमुख
अंबागेट उमरावती.
नो. नं. २२३

## अमेरिकन सोन्याचे कधींच काळे न पडणारे दागिने.

चंद्रहार किं. रु. ३।४ गोठ जोडीची किं रु. १॥ २, २॥. पाटल्या जोडीची किं. रु. १॥, २, २॥. सरी किं. रु. ३, ४, ५. वज्रटीका रेशमांत गुंफलेली किं. रु. ३, ४. ठुशी रेशमांत गुंफलेली किं. रु. ५, ६. नथ उत्तम मोत्यांनीं बांधलेली किं. रु. ३, ४, ५. शिंप्याचें मोतीं लहान मोठें वाटेल तसें. सरीची किं. रु. १॥, २, ३, ४. अंगठी किं. रु. १, १॥. सलें अष्टपैलु जोडीची किं. रु. १॥. बांगड्या जोडीची किं रु. १॥,२,२॥.
कोणत्याही प्रकारचा मापाचा दागिना मिळेल.

पत्ताः— मगनलाल के. आणि कंपनी,
गिरगांव मुंबई.
नो. नं. २२४

## अस्सल अंगुरी.

# हिंग

रु. ४ शेर, पवित्र केशर रु. १८३ आणि १८७ तो. खालिस कस्तुरी रु२६ तो. शुद्ध शिलाजीत ८९ तो. सुर्मा ममीरा रु. ३ तो. स्याहजीरा रु. २ शेर, मुरब्बा बादाम रु. १ शेर

काश्मीर स्टोर्स श्रीनगर नं० ९

## जाहिरात

मुंबई ब्यांकेची सेव्हिंग ब्यांक.

ह्या बँकेंत खाली दिलेल्या अटीवर ठेवी ठेवितां येतात.

कोणत्याही वर्षाचे १ ले जानेवारी आणि ३१ दिसेंबर यांच्या दरम्यान दोन हजार रुपये पर्यंत पैसा ठेविता जाईल.

ठेवी दोन अथवा अधिक इसमांच्या नांवावर ठेवतां येतील आणि तो पैसा यापैकीं एकास अथवा जास्त इसमांस अगर यापैकीं मयताचे मागें राहील त्यांस काढतां येईल.

व्याज दर साल दर शेकडा तीन रुपयाप्रमाणें दिलें जाईल. व्याजाची आकारणी प्रत्येक महिन्याची जी कनिष्ठ शिल्लक असेल तिजवर केली जाईल. मात्र दहा हजारावरील शिल्लक रकमेस व्याज नाहीं. नियमांच्या प्रती बँकेंत अर्ज केला असतां मिळतील.

मुंबई ब्यांक आकोला ९।९।०९ } Lyon Scott एजंट
नो. नं १

## हिंदुस्थानावर अरिष्ट.

हिंदुस्थानांतील राहिवाशांच्या पाठीस ज्वर व हिवताप यांचें अरिष्ट सदोदित लागलें आहे. पण त्याचा प्रतिकार करण्यास बाटलीवाला यांचें हिवतापाचें औषध व गोळ्या ह्या रामबाण आहेत. ताप किंवा शीतज्वर येणारसें वाटतांच हें औषध घ्यावें. किं. १ रु.

बाटलीवाला यांच्या निस्तेज लोकांसाठीं शक्तिकारक गोळ्या

हें औषध घेतल्यानें भागवटा, मेंदूचे श्रम, पौरुषनाश, अशक्तता व क्षयरोगाचें मान त्याप्रमाणें अजीर्ण इ. इ. विकार गाबडतोब दूर होतात किं रु. १॥८.

बाटलीवाला यांचें दंतमंजन.

हें दंतमंजन मायफळाशीं कांहीं इंग्रजी औषधांचा वैद्यकीय रीतीनें मिलाफ करून बनविलें आहे. किं. ८४

बाटलीवाल्याचें गजकर्णावर मलम.

यानें गजकर्ण, कुनखी, खरूज यांचा विकार एका दिवसांत नाहींसा होतो. किं. ८४
हीं औषधें सर्व औषधी विकणाऱ्या दुकानावर व डॉ. एच. एल. बाटलीवाला जे. पी. मु. वरली लॅबोरेटरी दादर, मुंबई यांजकडे मिळतात.

DR. H. L. Batliwala. Sons & Co Ltd
N. N. 3 Dadar Bombay.

## श्री दत्तात्रय अलंकारालय कोल्हापूर

आमचे कारखान्यांत स्वतःचे देखरेखेखालीं, मुद्दाम तयार केलेले उत्तम सोन्याचे सुबक दागिने— मंगळसूत्र साज, ठुशी जोड, गुलाबाचीफुले, बिल्वदळी टीका, मुदा अग्रफुलें साखी व वाघऱ्याचीं वगैरे सर्व जातीचा माल—तसेच चांदीच्या मासोळ्या, वाळ, उपकर्णी, तांटें, वाट्या, गडवे, इत्यादि माफक दरानें मिळतील आह्मी सर्व सोनें, न्याशनलचें शेंभर नंबरी वापरीत असतों. व डागाचा उपयोगही नियमितच केलेला असतो. यामुळें जिन्नस पांढरे पडण्याची अगर वाईट निघण्याची भीति बाळगण्याचें मुळींच कारण नाहीं. आमचे जिन्नसाची लाख काढून वजन तोलून पाहावें. गिऱ्हाइकाची खात्री करून देण्यास आह्मी तयार आहों. व्यापाऱ्यास कामिशन मिळेल ऑर्डरी प्रमाणें माल तयार करून देऊं, चांदी सोन्याचे खरेपणाबद्दल आह्मी जबाबदार आहों. माल रोखीनें अगर व्ही. पी. नें पाठविला जातो ऑर्डरी बरोबर एक रुपया आगाऊ पाठविला पाहिजे.

श्रीदत्तात्रय अलंकारालय—कोल्हापूर
नो नं ६

## सावंतवाडी येथील.

दशावतारी गंजिफा— उत्तम पान व टिकाऊ पक्का रंग किंमत ।||।, १, १।, १॥, २, २॥ ते ५ रु. प. बुद्धीबळ जोड लांकडी— किंमत ।||। १, १॥, २ ते ४ रु. प सोंगट्या जोड— किंमत ।', ।||', ।|||', १, १॥, रु. प. खडावा जोड— शिसवी व शिवणीचे वगैरे सामान घाऊक व किरकोळ आमचेकडे विकत मिळेल. मोठा क्या. मा. फूकट

डी. आर. अळवणी, स्टेट सावंतवाडी.
नो नं. २७२

## विक्रीस तयार

आमचे छापखान्यांत दरखास्तीचे, वकीलपत्राचे, परत भरण्याचे, लिस्टफार्म पर्ध्याचे व नकलेकरितां करावयाच्या अर्जाचे नमुने छापून तयार आहेत. ते आमचे छापखान्यांत कोणत्याही वेळीं विकत मिळतील.

वऱ्हाडसमाचार कार्यालय, सदाशिवाश्रम, आकोला } मॅनेजर

## खात्रीचा तयार केलेला.

ताजा अनंत मूळ.

नंबर १ ला ३॥ रु. शेर नं. २ रा २॥ रु. शेर ८ दिवसाची पूर्व मागणी केल्यास तांबुस मुळ्यांचा ताजा कुटून अच्छेराच्या वजनानें डब्यांत भरून पाठविला जाईल. गुण व घेण्याची रीत डब्यावर

पत्ता
रामचंद्र सदाशिव मार्कंडे उद्धवनी
मोहला नागपूर शहर सर्कल नं

## नोटीस

खालीं सह्या करणारे पंच लोक यांचे-कडून गिरधारीलाल केशवदास गुजराथी रा. बाळापूर

यांसः—

नोटिस देण्यांत येते कीं, तुह्मी शेठ ठाकुरदास गोविंदराम गुजराथी रा. बाळापूर यांस ता. १४-७-१६ रोजींचे वऱ्हाडसमाचारांतून दिलेली नोटिस मिळाली त्याचें उत्तर येणें प्रमाणें:—

तुह्मी देऊळ बांधण्याचें काम हातीं घेतलें ते पंच मंडळीनीं तुह्मास ज्या अटी सांगितल्या त्या अटी कबूल करून घेतले. पंच मंडळीनीं तुह्मास सर्व देऊळ बांधण्यास पुरेसे पैसे देण्याचें आश्वासन मुळींच दिलें नव्हतें. परंतु लोकांकडून जे पैसे वसूल होतील ते तुमचे स्वाधीन करावे व बाकीचे पैसे तुह्मी लावावे अशा अटीवर तुह्मास देऊळ बांधण्यास परवानगी दिली. त्याप्रमाणें लोकांकडून आलेलें पैसे तुह्मास दिले ही व त्याप्रमाणें पंचाच्या अटी कबूल झाल्यावरच तुह्मी देऊळ बांधण्यास सुरुवात केली. तुह्मी आणलेला माल मसाला तुमचा खाजगी नसून सार्वजनीक देवळाचा आहे. व त्यावर तुमचा कोणते ही प्रकारचा हक्क नाहीं व तुह्मास तो वरील कारणास्तव घेऊन जातां ही येत नाहीं. तुह्मी कबूल केल्याप्रमाणें देवळाचे सालीम काम करून द्यावें. आठ दिवसाचे आंत सुरू करावे व दोन महिन्याचे आंत मंदिर तयार झाले पाहिजे. तुह्मी आपला हिशोब पंचास दाखवावा. त्यावेळेस सर्व गोष्टींचा खुलासा होईल. तुह्मी रामाचे मूर्तीचे सिंव्हासनामागें दोन पांच हात खोलीचे खड्डे खणले आहेत. व ते भिंतीस नुकसान व्हावे ह्मणून मुद्दाम खणले आहेत. तर ते नोटिस मिळतांच बुजून टाकावे, व मंदिरांत रामाचे मूर्तीसंबंधानें व इतर वस्तू संबंधानें कोणतेही प्रकारची पंचाचे परवानगीशिवाय हालचाल करूं नये व केल्यास याबद्दल तुह्मास कायदेशीर रीतीनें जबाबदार धरले जाईल. बाळापूर ता. ८-८-१६

सह्या

सोनलाल भावलाल गुजराथी द. खुद
सही ठाकुरदास गोविंदराम द. खुद
लोभचंद बुलचंदजी गुजराथी द. खुद
नारायणदास बैरागी गादीचे मालक
हनुमान आकोलवेसचे द. खुद
पन्नालाल बालमुकुंदजी जवळेकर
द. खुद

नो. नं. २८१

---

## नोटीस

नोटिस बेशमी नारायण कृपाराम नसवाले साहू दुकान हिवरखेड ता. आकोट जिल्हा आकोला

यांसः—

नोटिस देणार किसन गोपाल जीतमल साहू दुकान दानापूर ता. आकोट जिल्हा आकोला

नोटिस देतो ऐसाजे कीं, तुह्मी आह्मांपासून १००० एकहजार रुपयांचा दस्तैवज अजमास तीन महिने झाले लिहून घेतला. व आह्मास त्यापैकीं १०० रुपये अक्षरी शंभर दिले, व बाकीचे रुपये ९०० अक्षरी नवशें दोन चार दिवसानीं देतो ह्मणून सांगितले. तरी अद्याप रुपये दिले नाहींत. तरी नोटिस पावल्यापासून चार दिवसाचे आंत बाकीचे रुपये द्यावे. वरील कर्ज रोख्याचे रुपये घेणें राहिलेले ९०० रुपये देऊन त्या कर्ज रोख्याचे भरण्याबद्दल आमची पावती घ्यावी. याप्रमाणें तुह्मी न कराल आणि जर मजला बाकीचे रुपये देण्याची तुमची इच्छा नसेल तर तुह्मी मजला वरील एकहजार रुपयाचे दस्तैवजापैकीं दिलेले रुपये १०० शंभर आणि त्याचे व्याज दस्तैवजाप्रा। आकारून त्या रकमेंत दस्तैवजाची स्टांपाची किंमत व दुसरा आवंतरखर्च अशी रकम वजा करून बाकीची रकम आह्मापासून घेऊन आमचे पासून लिहून घेतलेला दस्तैवज वापस द्यावा ही नोटिस दिली. सही ता. ९।८ १९१६ इसवी दस्तुर नथू तुकाराम पाटील दानापूर

सही

किसन गोपाल जितमल साहू दुकान
दानापूर ता. आकोट जिल्हा
आकोला द. खुद

नो. नं. २८२

---

## नोटीस

रा० रा० राजाराम बुलाजी काळे रा० शिरसो ता॥ मूर्तिजापूर

यांसः—

खालीं सही करणार याचेकडून नोटिस देण्यांत येते कीं, तुमची पुतणी नामे सुभद्रा हिचे बरोबर माझे लग्न जाहले असोन त्यास आज ८।१० वर्षे जाहलीं. तिला शहाणी होण्यास ही १ वर्ष जाहले. या मुदतींत तिची वर्तणूक मला अगदींच गैरसोयीची दिसली. त्या बद्दल तिला मी पुष्कळ वेळा समजून सांगीतलें परंतु त्याचा कांहींच उपयोग जाहला नाहीं. व तिने आपली वर्तणूक न सुधारतां अधिकच राग येईल अशी वागु लागली. त्यामुळें मी तिजवरचा नवरेपणाचा हक्क सोडून देऊन तिला ता. ४ ७।१६ रोजीं फारकत लिहून दिली असोन तुमचे स्वाधीन ही केली होती व तुम्ही घेण्याचे कबूल केले होते. परंतु तुमचे मन फिरले असोन ती फारकत तुम्ही मला परत दिली. तरी या नोटिशीनें कळविण्यांत येतें कीं, मी जी फारकत दिली आहे, ती बरोबर असोन मी तिचे ( सुभद्रीचे ) वरील आपला नवरेपणाचा हक्क सोडून देऊन तिजला दुसरा घरठाव करण्यास परवानगी दिली आहे कळावे ही नोटीस दिली ता. २७।७।१६ द० के वी. ताम्रकर पि. रा. आकोला

फार चागले उ-
गोविंदा न दुष्टपणा हे शद्ब आत.
ांचे तोंडीं राहतील असा
नो. नं. २८ जर्मनीनें मिळवून ठेविला

---

## नोटीस

नोटीस बेशमी नथु व रामचंद्र उभयतां व॥ खेमसिंग रा० हिंगणे ता० आकोला अज्ञान पालन करणार काशीबाई मर्द खेमसिंग रा० मजकूर

यांसः—

खालीं सही करणार यानकडून नोटिस देण्यांत येते कीं खालीं सही करणार यानें मौजे सोमठाणें ता. आकोला येथील आपले मालकीचे शेत स. नं. ५२ ए. १० गुंठे २३ आकार रु. २४ सालीम तुमचे बापास ह्मणजे सदर्हू खेमसिंग यांस ता. २० ७।१९०९ रोजीं रजिष्टर पट्यानें १९ वर्षाकरितां वहितीस दिलें व सदर्हु खेमसिंग यानें खालीं सही करणार यास ता. २९ ९-१९०९ रोजीं एक रजिष्टर करारपत्र करून दिलें. सदर्हु करारपत्राची एक शर्त अशी आहे कीं जर सदर्हु पट्याचे मुदतींत खेमसिंग हा मरण पावला तर खालीं सही करणार यानें सदर्हु शेत आपल्या ताब्यांत घ्यावें व खेमसिंग ह्याचा वारसांचा शेत ताब्यांत ठेवण्याचा कांहीं हक्क चालणार नाहीं. आपला उभयतांचा बाप खेमसिंग हा ता. २९-६-१९१६ रोजीं मरण पावला व सदर्हु कराराप्रमाणें खालीं सही करणार यास सदर्हु शेत ताब्यांत घेण्याचा हक्क प्राप्त झाला आहे व त्या करारान्वयें आह्मी आपणास सदर्हु शेत आमचे ताब्यांत देण्यास एक दोन वेळा सांगितलें ही परंतु आपण शेताचा ताबा दिला नाहीं. तरी या नोटिशीनें आपणास उभयतांस कळविण्यांत येतें कीं आपण उभयतांनीं सन १९१३ - १४ - १९१५ सालांची स्वामित्वाची रक्कम व सदर्हु शेताचा ताबा ही नोटिस पोहोंचल्यापासून ८ दिवसांचें आंत खालीं सही करणार यांस द्यावा. असें न कराल तर सदर्हु स्वामित्वाची रक्कम व शेताचा ताबा घेण्यास होणाऱ्या खर्चाचे जबाबदार आपण व्हाल. ता० ९-८-१६

सही

निशाणीचा आंगठा
गंगाबाई मर्द हानुसिंग ईचा नी॥
आंगठा द० कृष्णाजी केशव

नो. नं. २८६

---

## जाहीर नोटीस

मी नारायण व॥ सताजी मराठे राहणार तळणी याचे नांवचा दत्तपत्राचा दस्तऐवज रद्द केल्याचा लेख नोंदून दत्तपुत्राचा संबंध तोडून टाकला आहे त्यास माझे इस्टेटीचे भरंवशावर कोणी कर्ज दिल्यास मी व माझी इस्टेट जबाबदार नाहीं कळावे ता०

सही

परबतराव व॥ सताजी पा॥

नो. नं. २८७

---

## नोटीस.

रा. रा. बिंजराज कुंजीलाल मालक शिवनंदा मारवाडी राहणार दाहिहांडा

यांसः—

खालीं सही करणार यांजकडून नोटिस देण्यांत येते कीं, मी आपले दुकानचे ता. २।५।१९१० इ. रोजीं रु. १५० द. म. द शे. रु. १।= प्रा॥ व्याजानें घेऊन माझे पूर्ण मालकीचे शेत सर्वे नंबर ४१ एकर ४ गुंठे ७ चे तारणगहाण करून दिले. सदर्हु गहाणाचे व्याजांत मी आपणास प्रथम रु. २२ दुसऱ्यांदा रु. ५० तिसऱ्यांदा रु० ५० एकूण रुपये १२२ दिले. आणि ता. १।७।१९१६ रोजीं मी अमृत जयराम पाटील व उदेभान वाकोडे या दोन गृहस्थास बरोबर घेऊन आलो. तुह्मास दस्तैवजाचा हिशोब करावयास लाविला असतां आपण मागें दिलेला वसूल वजा जातां पुन्हा मजगरीबास शर्तीं बरहुकूम फार ज्यास्त मागू लागले. तेव्हां मजबरोबर असलेल्य मनुष्यांच्या व माझ्या विनवणीकडे लक्ष देऊन सरकारी नियमाप्रमाणें मुदलाचे दाम दुप्पट मागील वसूल वजा जातां घेईन असें कबूल केले होते. सबब ते दिवशींच रकम रु० १५० दीडशें आपणास दिले, व राहिलेले मुद्दल रुपये १५० पुन्हा आठ दिवसाना मी अमृतराव पाटील, जानजी पाटील व मारुतीराव या इसमा बरोबर घेऊन आलो तेव्हां आपण सर्वांसमक्ष फिरून दामदुप्पट मागू लागले. सर्वांनीं असें न करण्याबद्दल सांगितले परंतु आपण ऐकिलें नाहीं. ह्यावरून आपणास या नोटिशीनें अशी सूचना देण्यांत येते कीं, आपणास नोटिस पावल्यापासून आठ दिवसाचे आंत या नोटिशीचा खर्च वजा करून मुद्दल रुपये १५० घेऊन जाणे. असें न केल्यास आपणास व्याज मिळणार नाहीं. व विनाकारण दावा केला तर त्याबद्दलचा सरकारी कोर्ट खर्च मी देणार नाहीं. आपली बेइमानीची नियत पाहून मजला नोटिस देणें भाग पडले. इतःपर मी आपले दुकानावर येणार नाहीं. माझा दस्तैवज आणून देऊन रकम घेऊन जाणें. गहाणाशिवाय माझें आपले दुकानचे कोणत्याही प्रकारचे घेणें देणें नाहीं. कळावें. ता० १०।८।१९१६

सही

विठू व॥ मिठाराम शिंपी रा. कावसे
बु॥ ता. आकोट द. खुद

नो० नं० २८४

---

## नोटीस

वि० सी० सबजज्ज सा० कोर्ट आकोला
कि. मु. नं. ९ सन १९१६ इ.

अर्जदार

जनाबाई जवजे चंद्रभान रा० चौसाळ ताा. दर्यापूर. सर्वत्र लोकांस जाहीर करण्यांत येते कीं मयत बायजाई मर्द बिठोबा ही ता० ४-१०-१५ इ० रोजीं मोजे चौसाळ ता० दर्यापूर जि० उमरावती येथें मयत झाली आहे. तीचे वारस या नात्यानें अर्जदार जनाबाई इनें वारसाचे सार्टीफिकिट मिळण्याकरितां आमचे कोर्टीत ता० २५-४-१६ इ. रोजीं अर्ज दिला आहे. त्याची चौकशीची ता० १९।८।१६ इ॥ नेमली आहे. तरी तिचें विरुद्ध ज्यांची कांही तक्रार असल्यास नेमलेल्या तारखेस कोर्टीत हजर व्हावें कळावें ही नोटीस ता. २८-७-१६

Sd/ D. K. Kolatkar.
सीनीअर सबजज्ज सा. कोर्ट आकोला

नो० नं० २८५

## पत्रव्यवहार.

सा. नमस्कार वि. वि. खालील मजकुरास आपल्या लोक प्रिय पत्रीं अवश्य स्थल द्यावें:—

तारीख ४।८।१६ रोजीं सकाळीं आठ वाजतां येथील मॉरीस लायब्ररींत महायुद्धाचा आरंभ दिवसानिमित्त नागरीकांची सभा भरली होती. सभेस डेपुटी कमिशनर, पोलीस सुपरिंटेंडंट, सेंटलमेंट कमिशनर, एक्स्ट्रा असिस्टंट कमिशनर वगैरे मोठमोठे सरकारी अधिकारी हजर असून वकील मंडळी व शहरांतील सर्व मोठमोठी मंडळी हजर होती. अध्यक्ष स्थानीं येथील लोकप्रिय सर्व्हंट ऑफ इंडिया सोसायटीचे नवीन सभासद लोकमान्य रावबहादुर केळकर हे होते. रावबहादूर केळकर यांनीं थोडक्यांत सभेचा उद्देश सांगून इंग्रज लोकांचे 'सत्य, न्याय व स्वातंत्र्य प्रियतेबद्दल थोडक्यात वर्णन केलें, व दक्षिणी ब्राह्मण मंडळीची पलटणींत भरती करण्याबद्दल सरकाराकडून झालेल्या सूचनेचा फायदा घेऊन दक्षिणी ब्राह्मणांनीं दोनशेच काय परंतु दोन हजारांनीं पुढें येऊन सरकारास आह्मीं शिपाईगिरीस पात्र आहो असें दाखविण्याची आग्रहपूर्वक सूचना केली. नंतर रितीप्रमाणें—आपले बादशाहास व सरकारास यश यावे, हिंदुस्थानचे लोकांनीं तन मन धनें करून युद्धास मदत करावी व हे सर्व ठराव चीफ कमिशनर साहेब व गव्हरनर जनरलकडे पाठविण्याचे ठराव होऊन नंतर मुलांचे बाळुमार्फत बादशाहास जय मिळावा ह्मणून गायन होऊन सभा बरखास्त झाली. प्रत्येक ठरावावर चांगलीं भाषणें झालीं. रा. सा. दुर्गाप्रसाद, रा. ब. पंडा, वैजनाथ शंकरराव डबीर चिंतामणराव मराठे वगैरे मंडळीची हिंदी व मराठींत भाषणें झालीं. रा. चिंतामणराव यांचें भाषण आपणाकडे पाठविलें आहे.

यं ब्रह्मा वरुणेंद्र रुद्र मरुतः स्तुन्वति दिव्यैस्तवैर
वेदैः सांग पदक्रमोप निषदै र्गायंति यं सामगः
ध्यानावस्थित तद्गतेनमनसा पश्यन्ति यं योगिनो
यस्यांतं न विदुः सुरासुर गणाः देवाय तस्मैनमः

आज आपण येथें सर्व जण कशाकरितां जमलों आहोंत हें आतां सांगितलें पाहिजे असें नाहीं. हल्लीं सुरू असलेल्या महायुद्धा प्रमाणें युद्ध ऐतीहासीक कालांत घडल्याचें दिसत नाहीं. युद्धाच्या तयारीचे दृष्टीनें त्याचा भयंकरपणा अश्रुतपूर्ण आहेच परंतु या युद्धाचा मूल हेतुकडे पाहिले असतां देखील त्यांत विशेष आहे. आमच्या भारत भूमींत अनादिकालीं घडलेल्या राम रावणाच्या अथवा कौरव पांडवांचे युद्धाचीच ही प्रतिकृती आहे असें ह्मणण्यास हरकत नाहीं. एकीकडे सत्य, न्याय व स्वातंत्र्य आहे. तर दुसरीकडे असत्य, अन्याय व जुलूम यांचें साम्राज्य आहे! एकाचे स्वार्थत्यागाबद्दल स्वातंत्र्यप्रेमाबद्दल व न्यायीपणाबद्दल सर्व पृथ्वींत वाहवा होत आहे, व दुसऱ्याचा जुलमी स्वभावाबद्दल राज्यतृष्णेबद्दल व अशक्त व कमकुवत राष्ट्राचा विध्वंस करण्याबद्दल जिकडे तिकडे छिः थुः होऊन राहिली आहे. गरीब निरपराधी परंतु स्वातंत्र्यप्रिय राष्ट्राची ज्यानें राखरांगोळी केली त्या केसरला यमराजा पुढें खास जबाब द्यावा लागेल! आमचे साम्राटाधिपति पंचम जार्ज यांचा सदैव विजय होवो हीच परमेश्वराजवळ प्रार्थना आहे. ज्यानें आपली तरवार केवळ नाइलाजास्तव सत्याचे ब्रीद ठेवण्याकरितां बाहेर काढली त्या बादशहाची व त्या राष्ट्राची जेवढी धन्यता मानावी तेवढी थोडी आहे. अमेरिकेप्रमाणें तटस्थराहण्याचा विचार केला असता तर आज आपले सरकारावर जो प्रसंग आहे, हजारो वीर जे धारातीर्थावर आपली प्राणाहुती देत आहेत, आज दोन वर्षांपासून सर्व राष्ट्र अत्यंत कष्ट सोसून राहिले आहे हा प्रसंग खचीत आला नसता. परंतु शूरास— अपमानस्य चाकिर्ति मरणा दितीरिच्यते—या श्रीकृष्ण उक्तीप्रमाणें अपकीर्ति व असत्यता हीं मरण तुल्य आहेत. थोर जे आहेत ते आपला शब्द कधींही खोटा करीत नाहींत. जी गोष्ट व्यक्तीस लागू तीच राष्ट्रास लागूं आहे. लेखी झालेले ठराव 'शुष्क कागद' ह्मणून केसरनें बिनादिक्कत मोडले! गरीब राष्ट्रास निष्कारण नाहींसे करून टाकले! केवढा हा अधमपणा—असो चालू युद्धाचा विशेष ह्मणजे दैवी व असुरी प्रकृतीचे युद्ध होय, जिकडे सत्य तिकडेच परमेश्वर व जिकडे परमेश्वर तिकडेच जय मिळणार. युद्धापासून सर्वांसच त्रास होत आहे, परंतु असुरी प्रकृतीचा पुरा मोड होऊन दैवी प्रकृतीचा विजय होण्या करितां सृष्टिनियमातच अशी योजना असते असे अनंत कालचे इतिहासावरून दिसून येते. आमच्या साम्राट बादशहाचे विलायत सरकार व हिंदुस्थान सरकार असे दोन बाहू आहेत दोहोंचे ऐक्यतेंत बादशाहीचें हित आहे, परस्पराचे साह्यावांचून जयाची पूर्णता होणार नाहीं. अशा प्रसंगीं सर्व भेदभाव विसरून दुष्टास शासन करण्या करितां आपण सर्वांनीं कंबर बांधली पाहिजे. आपणास सुदैवानें ज्या सत्य स्वातंत्र्य व न्याय प्रिय राष्ट्राशीं संबंध आला आहे, त्याचे साहचर्यांत आपणास आज सरासरी दोनशे वर्षांपासून जो फायदा झाला आहे, आपली व त्यांची जी मैत्री जुळली आहे तिची सार्थकता, करून देण्याचा हाच प्रसंग आहे. आपले मध्यें श्रीरामचंद्र, धर्मराज व हरिश्चंद्रासारखे सत्यप्रतिज्ञ राजऋषी झाले व आह्मी सत्याची योग्यता ओळखतों हें आपले कृतीनें दाखविले पाहिजे. आपले परमपूज्य बादशहा आपले हिंदुस्थानांत येऊन गेले त्यावेळीं येथें जमलेल्या बऱ्याच मंडळीस त्यांचें दर्शन झाले असेल. केवढी त्यांची योग्यता, शांतता त खरेंच राजऋषी आहेत.

दोस्त राष्ट्रांस व इंग्रज सरकारास आज पावेतों शत्रूस जेरीस आणण्या करितां शत्रूवर आपण होऊन हल्ला करता आला नाहीं. व ह्मणून शत्रूस आपली फुशारकी मारता आली! परंतु आतां ते दिवस पालटले आहेत. शत्रूनें माघार घेतल्याचे नित्य विद्युत् संदेश येत आहेत व आमचे सार्वभौम सरकारास व दोस्त राष्ट्रास विजयश्री खचीत माळ घालणार असें वाटूं लागलें आहे. "सुखिनः क्षत्रियाः पार्थ लभंते युद्ध मिदृशं" अशा प्रकारचे प्रसंग वारंवार येत नसतात. युद्धास मदत करण्याकरितां केवळ हातांत शस्त्र घेऊनच लढले पाहिजे असें नाहीं. युद्धार्थ अत्यंत अवश्यक लागणारी जेवढ्या प्रकारची मदत लागते, त्यापैकीं प्रत्येकानें आपाल्या सामर्थ्याप्रमाणें मदत केल्यास ते युद्धांत सामील झाल्यासारखेच आहेत दुष्कृतांचा नाश व साधूंचें रक्षण हाच या युद्धाचा मूळ हेतु आहे व ह्मणून आपण या युद्धांत मनःपूर्वक सामील झालें पाहिजे. स्वार्थबुद्धीनें व आपमतलबानें आपण मागें राहू तर आपणास आपले पितर खास हसतीलच; परंतु जगांत आपली अपात्रता ही दिसून येईल! जिकडे सत्य तिकडे जय खात्रीनें आहे. श्री महर्षी व्यासोक्ती कधीं ही खोटी होणार नाहीं.

॥ यत्रयोगेश्वरः कृष्णो यत्र पार्थो धनुर्धरः ॥
॥ तत्र श्रीर्विजयो भूतिर्ध्रुवा नीतिमतिर्मम ॥

बालाघाट ता. ४-८-१६

त्रयस्थ.

---

# वऱ्हाडसमाचार

मित्ति श्रावण वद्य १ शके १८३८

## देशी कारखान्यांची अभिवृद्धि.

कोणताही कारखाना यशस्वी होण्याला भांडवल, कौशल्य, आणि व्यवस्था या तीन गोष्टी अवश्य लागत असतात व या तिन्ही गोष्टींचा संयोग हिंदुस्थानांत क्वचित् घडलेला दिसतो ह्मणून आमचे कारखाने नीट चालत नाहींत असें वारंवार सांगण्यांत येतें. हा संयोग न घडण्याला हिंदुस्थानांत विशेष काहीं अडचणी आहेत काय व असल्या तर कोणत्या त्या संबंधानें मतभेद फार आहे व आज त्या गोष्टीचा विचार करण्याचा आमचा उद्देश ही नाहीं. हिंदुस्थानांत थोड्या माणसांजवळ पुष्कळ भांडवल नसलें तरी प्रत्येकाजवळ थोडथोडें असें पुष्कळ भांडवल निघूं शकेल हें पोस्टल सेव्हिंग्ज ब्यांका व इतर ब्यांका यांतून गुंतलेल्या मध्यम स्थितींतल्या लोकांच्या द्रव्यसंग्रहावरून कोणालाही कळून येणार आहे. शिवाय सावकार लोकांजवळचें जें भांडवल सध्यां शेतकऱ्यांचे उपयोगीं पडत आहे तें आणखी कांहीं वर्षांनीं शेतकी पतपेढ्यांचें जाळें देशभर पसरल्यावर रिकामें होईल. तें मग अर्थात्च कारखान्यांतच गुंतविण्यांत येईल. अशा रीतीनें भांडवलाची वाण तर दूर होईल. दुसरी गोष्ट कुशल मजुरांची. हिंदुस्थानच्या औद्योगिक उन्नतीविषयीं निराशा बाळगणारांच्या तोंडून कधीं कधीं असे उद्गार निघालेले आपण ऐकतों कीं या देशांतला मजूरवर्ग अशिक्षित, आळशी, कामचुकार, व आडदांड आहे. त्याला कुशलतेचें काम करतांच येत नाहीं. सर्व देशभर शिक्षणाचा प्रसार होऊन मजूरवर्ग आपल्या कामांत निष्णात होईपर्यंत वाट पाहणें याचे [illegible] आले लागलें उघडकीला [illegible] दुष्टपणा हे शद्ब आतां [illegible]ांचे तोंडीं राहतील असा [illegible] जर्मनीनें मिळवून ठेविला [illegible] उ[illegible] [illegible]वळ जवळ अशक्य स्थितींत कांहीं तोड नाहीं हें पाहणें [illegible] आहे. आमचा [illegible]द्धां न सुधारण्याइ[illegible] काय? या प्रश्नाचें [illegible]ंतलीं रेल्वे वर्कशॉप्स व इतर मोठाले कारखाने चांगलें देऊं शकतील. या कारखान्यांतून युरोपियन इंजिनिअर व कारागिर यांच्या हाताखालीं थोडे दिवस शिक्षण मिळालेले आमचे आशिक्षित व अडाणी मेस्त्री आश्चर्यकारक रीतीचीं कुशलतेचीं कामें करून दाखवितात. साकची येथील टाटा कंपनीच्या लोखंडाच्या कारखान्यांत युरोपियन शिक्षणाखालीं तयार झालेले अडाणी कारागीरच जगांत पहिल्यानंबरचें उत्तम लोखंड व पोलाद तयार करूं लागले आहेत. नुकत्या नेमलेल्या इंडियन इंडस्ट्रीज कमिशनचे अध्यक्ष सर टॉमस हॉलंड यांचा ही असाच अनुभव आहे. त्यांनीं परवा मद्रासेस झालेल्या आपल्या एका भाषणांत सांगितलें कीं टाटाच्या कारखान्यांतले मजूर दोन तीन वर्षांपूर्वीं अगदीं जंगली होते; पण आतां तेच इंग्रज मजुराप्रमाणें अगदीं उत्तम प्रकारें यंत्रें वगैरे चालवूं लागले आहेत, आणि या लोकांची राहण्याची व खाण्यापिण्याची वगैरे व्यवस्था चांगली ठेवल्यास देशांत उत्पन्न होणारा सगळा कच्चा माल उपयोगांत आणून तयार माल करणारे कारखाने याच मजुराच्या जिवावर आपणांस चालवितां येतील. तिसरी गोष्ट व्यवस्था. या सदराखालीं शास्त्रीय शिक्षण घेतलेले लोकांचा समावेश होतो. हिंदुस्थानांत या ही बाबतींत कच्चा माल विपुल आहे. हिंदुस्थानचे तरुण बुद्धिमान, तरतरीत, उद्योगी व नेमस्त संवयीचे असल्यामुळें ते शास्त्रीय शिक्षणांत पडल्यास तें तेव्हांच उचलतील. असें शिक्षण देणाऱ्या संस्था काढण्यास खाजगी औदार्य पुढें झालें पाहिजे असें सर टॉमस यांचें ह्मणणें आहे. आमच्या देशांत अशा शिक्षण संस्था निघत नाहींत याला केवळ लोकांचें दारिद्र्य हेंच एक कारण नाहीं. इतर ही कांहीं अडचणी आहेत हें टाटांच्या रिसर्च युनिव्हर्सिटीच्या इतिहासावरून सर टॉमस हालंड यांना कळलें असलें पाहिजे, तथापि अडचणींना भिऊन चालावयाचें नाहीं. आमच्या दहापांच संस्थानिकांनीं मिळून एकेक याप्रमाणें अशा शास्त्रीय शिक्षणाच्या संस्था आपापल्या प्रांतांत काढण्याचें मनांत आणल्यास तें अशक्य नाहीं. पण आमच्या देशी राजेरजवाड्यांचें व शेटसावकारांचें सारें द्रव्य मोटारगाड्या, थाटाचे नाचरंग, स्पेशल ट्रेनी, मल्लांच्या कुस्त्या, किंवा नाटक कंपन्या सारख्यांना आश्रय देण्यांतच खर्च झाल्यावर शास्त्रीय शिक्षणाच्या संस्था स्थापन करण्यास द्रव्याची वाण ही सर्वत्र पुढें यावी यांत आश्चर्य नाहीं. इतर कित्येकांना या वेळीं फिलॉसफीच्या शिक्षणाच्या संस्था काढण्याची बुद्धि होत आहे. तत्त्व ज्ञान नको असें आह्मी ह्मणत नाहीं. तें ही अवश्य पाहिजे आहे. पण केव्हां? लोकांच्या पोटांतली क्षुधा शांत होऊन लोकांजवळ पैसा खुळखुळूं लागला ह्मणजे त्यांना चैनीच्या पायीं तो खर्चण्याची बुद्धी होऊं लागते तेव्हां त्यांना ताळ्यावर आणण्यास तत्वज्ञानाची जरूरी लागते. रिकाम्या पोटीं तत्वज्ञान काय कामाचें? सध्याचे काळीं तर पोटोबाची आराधना हाच मुख्य विषय आहे व तो साधण्यास जर शास्त्रज्ञान उपयोगी पडणारे आहे तर ज्यांना ज्यांना व जेवढे ह्मणून

सामर्थ्य असेल त्यांनीं त्यांनीं तें सगळें सामर्थ्य देशाच्या औद्योगिक उन्नतीचे पायीं वाहण्यास पुढें झालें पाहिजे. आतांचा काळ असाच आहे, आणि हिंदुस्थानची औद्योगिक उन्नति व्हावयाची असेल तर ती भांडवल, कुशलमजूर, व शास्त्रीय शिक्षण या त्रयींच्या मजबूत पायावरच होईल. हा पाया मजबूत करण्यास ज्याचें ज्या मानानें साह्य होईल, त्याच्या जन्माची त्या मानानें सार्थकता झाली पाहिजे. हें तत्व आमच्यांतल्या लहान थोर, श्रीमंत गरीब, सुशिक्षित अडाणी सर्वांच्याच मनांत पूर्णपणें बिंबल्या खेरीज हें महत्कार्य कधीं घडून येणार नाहीं

## महायुद्धाची प्रगती.

प्रस्तुत युद्धाचा अंत आतां फार दूर नाहीं, निदान तो अंत केव्हां ही झाला तरी मित्रराष्ट्रांचा विजय निश्चित आहे असें ह्मणण्यास गेल्या आठवड्यांत एक कारण झालें आहे. फ्रेंच सेनापति जनरल जाफ्रे हे अतिशय मोजके शब्द बोलणारे आहेत. गेल्या दोन वर्षांत त्यांनीं युद्धासंबंधानें आपला अभिप्राय कधीं कोणाला कळूं दिला नाहीं. कारण, येवढ्या मोठ्या सेनापतीचें मत ह्मणून तत्काळ त्याचा साऱ्या जगभर प्रसार झाला असता, आणि त्या मताला विरुद्ध अशा गोष्टी त्या नंतर घडल्या असत्या तर त्या मताची किंमत राहिली नसती. पण गेल्या आठवड्यांत त्यांनीं आपलें मत प्रकट केल्याची तार आली आहे. यावरून युद्धाचा अखेर निकाल त्यांच्या खात्रीच्या आटोक्यांत आला आहे असें अनुमान काढण्यास हरकत नाहीं. ते ह्मणतात कीं शत्रू आतां जेरीस आल्याचीं लक्षणें दिसूं लागलीं आहेत आणि मित्रपक्षालाच जय मिळणार हें आतां निश्चित आहे. जर्मनसैन्यापैकीं दोनतृतीयांश भाग पश्चिम रणक्षेत्रांत आहे असें ही त्यांनीं सांगितलें. यावरून पूर्वीय रणक्षेत्रांत आतां जयाविषयीं जर्मनीला विशेषशी उमेद राहिली नाहीं असें दिसतें. जर्मनीचें फक्त एक तृतीयांश सैन्यें पूर्वीय रणक्षेत्र, आस्ट्रिया, तुर्कस्थान, कॉकेशस वगैरे मध्यें वाटलें गेलें आहे. हें खरें असेल तर जर्मनीपासून त्याच्या दोस्तांना हल्लीं कितीशी मदत मिळत असेल याची ही कल्पना करतां येते. खुद्द जर्मनीला स्वतःच्या जिवाची भीती विशेष वाटत आहे असें ही यावरून ह्मणण्यास हरकत नाहीं .

## तुर्क लोकांची चळवळ.

गेल्या आठवड्यांत तुर्कांनीं पुनः एकदा ईजिप्तमध्यें उचल खाल्ली, पण त्याचा परिणाम त्यांनाच अतिशय हानिकारक झाला ईजिप्तमधल्या ब्रिटिश शक्ती विषयीं त्यांना खरी खबर नव्हती असें दिसतें. त्यांनीं १४००० फौजेनिशीं सुएझ कालव्यावर उत्तरेकडून येऊन हल्ला करण्याचा यत्न केला, पण तेथें ब्रिटिश सेनापति जनरल मरे हे सावध होते. त्यांनीं तुर्कांना असा सपाट्यानें मार दिला कीं चौदा हजारांपैकीं अडीच हजार तुर्क त्यांच्या हातीं लागले, आणि ते ही जखमी झालेले नव्हेत तर चांगले धट्टे कट्टे शिपाईगडी ! यावेळीं शिकलेला धडा तुर्क लोक बहुधा विसरणार नाहींत. आणि कालव्याच्या वाटेकडे वर मान करून पाहणार नाहींत.

## पश्चिम रणक्षेत्र.

या क्षेत्रांत गेल्या आठवड्यांत ह्मणण्यासारखी महत्वाची कांहींच गोष्ट घडली नाहीं. पोझिएरच्या ईशान्येस ब्रिटिश खंदकावर अगोदर तोफांचा भडिमार करून मग जर्मनांनीं आंत शिरकण्याचा प्रयत्न केला; पण त्यांना धुडकावून लावण्यांत आलें, किंवा वॉक्सवुडवरचा जर्मनांचा हल्ला व्यर्थ झाला, अथवा फ्रेंच वैमानिकांनीं शत्रूच्या रेल्वे स्टेशनांवर बांब टाकिले वगैरे किरकोळ गोष्टी सांगत बसलों तर पुष्कळच आहेत. पण सर्वांचा माथितार्थ हा आहे कीं जर्मन लोकांचा व्हर्डुनपाशीं जाण्याचा यत्न आज तीन महिने चालला असतां फ्रेंच बहाद्दरांनीं तो निष्फळ केला आहे इतकेंच नाहीं, तर दीड महिन्यांपूर्वीं जर्मन लोक जितके पुढें गेले होते तितके आतां ते मागें हटलेले दिसत आहेत. सॉमच्या बाजूला ब्रिटिश फौजेची मजबुती विशेष आहे. डेलव्हिल वुड व सॉम यांच्या दरम्यान नुकत्या झालेल्या लढाईत शत्रूकडचे ३००० लोक कैद करण्यांत आले. ही विशेष गोष्ट खेरीज करून बाकीच्या किरकोळ चकमकींचें वर्णन देण्यांत अर्थ दिसत नाहीं. तथापि शत्रूनें पादाक्रांत केलेल्या जागेपैकीं शे दोनशें यार्ड जागा तरी ब्रिटिश व फ्रेंच यांनीं परत मिळविली आहे

## जर्मन दुष्टपणा.

लढाईत जरी मागें पाय असला तरी दुष्टपणांत जर्मन लोकांचा पाय पुढेंच आहे. चोहींकडे मित्रराष्ट्रें नाक ठेचीत आहेत ह्मणून ह्मणा, किंवा ब्रिटिश आरमारानें दुर्दशा केल्यामुळें ह्मणा, अथवा ब्रिटिश सरकारानें व्यापार बंद केल्यामुळें जर्मन लोकांची उपासमार होऊं लागली आहे ह्मणून ह्मणा, पण ते लोक चिडून पिसाळलेल्या कुत्र्याप्रमाणें भयंकर दुष्टता प्रकट करीत आहेत. लिले आणि रुबे येथील नागरिकांचा त्यांनीं छळ मांडिला आहे. शत्रूच्या हातीं लागलेल्या एका ब्रिटिश बोटीवरच्या कप्तानाला त्यांनीं मरेमरे पावेतों मारलें. ब्रिटिश कैद्यांचे हाल जर्मन करीत आहेत अशी ओरड आज कित्येक दिवस ऐकतच आहों, या शिवाय बाहेर आल्या नाहींत अशा जर्मन दुष्टपणाच्या गोष्टी कितीक असतील. सारांश, या युद्धानें सुधारलेलें ह्मणविणाऱ्या जर्मनीचें काळेंकुट्ट अंतरंग फार चांगलें उघडकीस आणिलें आहे. जर्मन दुष्टपणा हे शब्द आतां पिढ्यान पिढ्या लोकांचे तोंडीं राहतील असा असुहृणीय दुर्लौकिक जर्मनीनें मिळवून ठेविला आहे.

## पूर्व आफ्रिकेंत.

या ठिकाणीं गेल्या आठवड्यांत बेल्ज्यन व ब्रिटिश सैन्यांनीं पुष्कळच लाभ संपादन केला. दोघांनीं सेंट्रल रेल्वेवरची युजीजी व डोडोमा नांवाचीं दोन महत्वाचीं ठाणीं काबीज केलीं. त्या पूर्वीं बेल्ज्यन फौजेनें मेरियाहिल्फ नांवाचें एक ठाणें मागच्याच आठवड्यांत घेतलें होतें. डोडोमा येथें ब्रिटिश फौजेनें मिळविलेला विजय महत्वाचा होता. तेथें जर्मन फौजेची इतकी गाळण उडाली कीं ते आपले सामानसुमान व ४००० गुरें, आणि दारूगोळा टाकून देऊन पळपलायन करीत सुटले. जनरल स्मटस् यांच्या फौजेचा रोख सेंट्रल रेल्वे गाठण्याचा आहे, व तो नेटानें चालला आहे. मेजर जनरल हॉस्किन्स यांनीं पांगानीं हें बंदर घेतलें. या बंदराचा झांझीबार व पेंबा यांच्याशीं मोठा व्यापार चालतो. जनरल स्मटस यांनीं आफ्रिकेच्या या भागांत केलेल्या अपूर्व कामगिरीबद्दल राजेसाहेबांनीं आपला अत्यंत संतोष प्रदर्शित केला आहे. यानें त्या सेनापतीला अपूर्व उत्साह वाटेल. कारण ह्मटलेंच आहे— ' क्लेशः फलेन हि पुनर्नवतां विधत्ते ;

## आदर्श संपादक.

सध्या वातावरण स्वराज्य, राजद्रोह, प्रेस आक्टाचा जुलम, नजरबंदीचे हुकुम वगैरे वगैरे शब्दांनीं गजबजलें आहे; अशावेळीं सरकारी अधिकाऱ्यांच्या दृष्टीनें संपादकाचें कर्तव्य उत्तम प्रकारें करणारा आदर्श पुरुष कसा असतो व त्याचीं लक्षणें काय, इ. महत्वाचा प्रकाश पाडण्यासारखी माहिति प्रसिद्ध झाली तर ती सर्वतोपरी इष्टच आहे. बंगाल सरकारचे कौंसिलर ना. मि. लिओन यांनीं थोड्या दिवसांपूर्वीं कलकत्यास बाबू क्रिस्तोदास पाल यांच्या पुण्यतिथीचे दिवशीं केलेल्या भाषणांत या विषयासंबंधानें थोड्याशा सूचना केल्या, त्या प्रस्तुत प्रसंगीं आमच्या व्यवसाय बंधूनीं अवश्य विचार करण्यासारख्या आहेत. बाबू क्रिस्तोदास पाल यांच्या विषयीं नामदार साहेबांनीं आपला अत्यंत आदरभाव व्यक्त केला. मि. पाल हे कलकत्त्याच्या एका पत्राचे संपादक होते व त्यांना सरकारी अधिकाऱ्यांच्या कृत्यांवर व सरकारच्या धोरणावर कडक टीका करण्याचे अनेक प्रसंग आले, ही गोष्ट ध्यानांत घेतली असतां त्या आदराची किंमत विशेष वाटते. हा आदर उत्पन्न होण्याला मुख्य कारण मि. पाल यांच्या लेखांचें धोरण हें होतें. मि पाल हे कोणत्याही विशिष्ट पक्षाला कधीं न मिळतां जें योग्य दिसेल तें लिहीत. बहुजनसमाजाला खुष करण्याकरितां चुरचुरीत लिहिण्याचा त्यांचा प्रघात नसे. समाजाला ही नाहीं आणि सरकाराला ही नाहीं, तर स्वतःच्या विवेकबुद्धिला तें संतुष्ट ठेवीत. प्रामाणिकपणाचे विचार, सत्याभिमान, तत्वनिष्ठा, प्रतिपक्षीयाविषयीं ही सरल, समान व अकलुषित बुद्धि हीं त्यांचीं दैवतें होतीं. ब्रिटिश न्यायाचें ठिकाणीं त्यांची अढळ निष्ठा होती, व ब्रिटिश सरकारच्या हातून जरी चुका झाल्या व त्यांवर अत्यंत कडक टीका त्यांना करावी लागली, तरी ती करतांना ही बुद्धि त्यांनीं कधीं ढळूं दिली नाहीं. कलुषित मनानें प्रतिपक्षीयांविषयीं भलभलती समजूत करून घेऊन किंवा अनुमानें काढून अथवा एकाददुसऱ्या अधिकाऱ्याच्या कृतीवरून एकंदर सरकारचें धोरणच असें आहे असा मनाचा ग्रह करून घेऊन त्यांनीं लेख लिहिले नाहींत. अधिकाऱ्यांच्या चुकांवर टीका करतांना अतिशयोक्ति केली नाहीं, हें त्यांच्या यशाचें रहस्य होतें. उगाच लोकांत चळवळ करून सोडावी ह्मणून त्यांनीं कधीं लिहिलें नाहीं. क्षुब्धता उत्पन्न करण्याची इच्छा व मनाची समता यांच्यांतला विरोध हल्लीं पुष्कळ लेखकांच्या लक्षांत येत नाहीं. पण तो ध्यानांत धरणें अत्यंत अवश्य आहे. मि. पाल यांच्यांतला हा विशेष गुण लक्षांत घेतला असतां हल्लीं वर्तमानपत्रकर्त्यांवर सरकारची वक्रदृष्टि आहे असें जें सांगण्यांत येतें त्यांत किती तथ्य आहे व खरोखरच सरकारची वक्रदृष्टि असली तर ती कोणत्या प्रकारच्या लेखांवर व कोणत्या हेतूनें असली पाहिजे तें सांगण्याची अवश्यकता उरत नाहीं. हल्लींच्या काळीं संपादकावरची जबाबदारी पन्नास वर्षांच्या मागच्या काळांपेक्षां शतपटीनें वाढली आहे. अशावेळीं ना. मि. लि ओन यांनीं दाखविलेल्या आदर्श संपादकाचें अनुकरण करण्याची बुद्धि आमच्या व्यवसाय बंधूंस होईल तर किती चांगलें होईल !

## गैरसमज दूर झाला.

पारिस येथें नुकत्या झालेल्या राष्ट्रीय परिषदेंत कानडा व आस्ट्रेलियाचे प्रतिनिधि घेण्यांत आले होते, पण हिंदुस्थानचेच तेवढे प्रतिनिधि घेतले नाहींत अशी इकडे सर्वांची समजूत होऊन सरकारला प्रस्तुतच्या युद्धांत हिंदुस्थानानें येवढें साह्य केलें असतां ही सरकारचा दृष्टिकोण बदलला नाहीं, व हिंदुस्थानचा दर्जा जो वाढावयास पाहिजे तो वाढला नाहीं अशा प्रकारची टीका इकडच्या बहुतेक सर्व वर्तमानपत्रांतून करण्यांत आली होती. पण या टीकेला आधारभूत जी गोष्ट तीच मुळीं चुकीची होती असें हिंदुस्थान सरकारचे एक मेंबर सर जार्ज बार्न्स यांनीं परवा मुंबईस सांगितल्यापासून टीकाकारांचीं मनें शांत झालीं आहेत. पारिस येथें भरलेली परिषद ही अखेरची परिषद नसून पूर्वतयारीची सभा होती व तिला कानड्यांतला एक व आस्ट्रेलियाचा एक असे दोघे गृहस्थ हजर होते ते त्या त्या वसाहतीचे प्रतिनिधि ह्मणून गेले नव्हते, तर ब्रिटिश प्रतिनिधींनीं त्यांना आपले मदतगार ह्मणून नेलें होतें. खरी परिषद भरण्याची वेळ येईल तेव्हां हिंदुस्थानची विस्मृति होणार नाहीं, हिंदुस्थानच्या प्रतिनिधींना अवश्य पाचारण करण्यांत येईल असें ही आश्वासन हिंदुस्थान सरकारनें स्टेट सेक्रेटरी साहेबांकडून मिळविलें आहे. हा खुलासा लवकर होता, तर टीकाकारांच्या मनाला वाटलेली चीड, व त्यांच्या क्षुब्धवृत्तीपासून उद्भवलेली कडक टीका

यांना अवसरच मिळाला नसता. पुष्कळ वेळां सरकार व वर्तमानपत्रें यांच्या मध्यें निष्कारण गैरसमज होऊनच कडक टीका लिहिण्याचे व ती सहन करण्याचे दुर्दैवाचे प्रसंग अनुक्रमें वर्तमानपत्राचे संपादक व सरकार यांना प्राप्त होतात वेळींच खुलासा झाला तर दोघांचीं ही मनें परस्परांविषयीं अंशी कलुषित न होतां राज्य कारभाराचा गाडा वाहण्याचें काम बरेंच सुलभ होईल.

---

## विलायतेंतले हिंदी विद्यार्थी.

विलायतेंत असलेल्या हिंदी विद्यार्थ्यांच्या तक्रारी सरकारच्या नजरेस आणण्यासाठीं मुंबईच्या इंडियन स्टूडन्टस फ्रेंडस सोसायटी नामक संस्थेनें एक मुद्देसूद अर्ज तयार करून तो हिंदुस्थान सरकाराकडे पाठविला आहे. ऑक्सफोर्ड व केंब्रिज येथील कांहीं कॉलेजांतून हिंदी विद्यार्थ्यांना मुळींच घेत नाहींत, व कांहींत एखाद दुसराच विद्यार्थी घेतात. जागा नाहीं ही सबब नसतां ही हें घडतें हें आश्चर्य आहे. मेडिकल कॉलेजांत शेंकडा कांहीं विवक्षित प्रमाणांत प्राच्य विद्यार्थ्यांना घेतात. प्राच्यांत जपानी, चिनी, वगैरे सर्व येत असल्यामुळें फारच थोड्या हिंदी विद्यार्थ्यांचा या कॉलेजांत प्रवेश होतो. शेतकी कॉलेजानें दरसाल एकच हिंदी विद्यार्थी घेण्याचें ठरविलें आहे. हिंदुस्थानांतल्या पब्लिक वर्क्स खात्यांत ज्या कॉलेजांतून उतीर्ण झालेल्यांना जागा मिळतात, त्या इंजिनियरिंग कॉलेजानें हिंदी विद्यार्थ्यांच्या मार्गांत अनेक अडचणी उभ्या करून ठेविल्या आहे. कायद्याचा अभ्यास करणारांना परीक्षा पास झाल्यावर विलायतेंत एखाद्या बॅरिस्टरपाशीं कांहीं काळ पर्यंत उमेदवारी करावी लागते. इंजिनियरिंगच्या विद्यार्थ्यांना विलायतेंतले मोठाले कारखानदार व्यावहारिक शिक्षणासाठीं आपल्या कारखान्यांतून घेत नाहींत ही तक्रार तर विशेषच चमत्कारिक आहे. कारण कीं या कारखानदारापासून लाखो रुपयांचा माल हिंदुस्थानसरकारसाठीं स्टेटसेक्रेटरी साहेब खरीद करीत असतात तेव्हां येवढ्या मोठ्या गिऱ्हाइकाला इतकी लहानशी सवलत देण्याचें त्यांचे जिवावर यावें हें आश्चर्य आहे. माल खरेदीचे वेळीं या कारखानदारांनीं हिंदी विद्यार्थ्यांना घेण्याविषयींची शर्त जर स्टेटसेक्रेटरी साहेब घालतील तर या कारखानदारांची बुद्धि तेव्हांच ताळ्यावर येईल. चीन, जपान, तुर्कस्थान, व ब्राझिल येथील सरकार अशी शर्त करून घेतें. मग हिंदुस्थानासाठीं अशी शर्त मागण्यांत कांहीं विलक्षणपणा आहे असें आह्मांस वाटत नाहीं. आक्स फोर्ड व केंब्रिज येथील कॉलेजांना ही तीं कालेजें हिंदुस्थानासाठीं सिव्हिल सर्वंट तयार करतात ह्मणून कांहीं द्रव्यसाह्य देण्यांत येत असते. तेव्हां त्यांना ही हिंदी विद्यार्थ्यांना अधिक सवलती देण्यास भाग पाडण्याचें अंशतः तरी स्टेटसेक्रेटरी साहेबांचे हातांत असलें पाहिजे. या सगळ्या गोष्टी सदर अर्जांत इतक्या नम्रभाषेनें व मुद्देसूद रीतीनें मांडल्या आहेत कीं या अर्जाचा अनुकूळ विचार झालाच पाहिजे.

---

## अमेरिकन धनिक

मॉडर्न रिव्यूच्या आगस्टच्या अंकांत डा० सुधींद्र बोस एम. ए. एम. डी. यांचा अमेरिकेंतील राष्ट्रैक्य या विषयावर फार मननीय लेख आला आहे. अमेरिका हा अनेक राष्ट्रांचा एक संघ आहे. त्यांत ६९ भिन्नभिन्न राष्ट्रें व ७९ भिन्न भिन्न भाषा बोलणारे लोक येतात. असें असून त्यांच्यांत एकत्वाचें बंधन विलक्षण दृढ आहे. याचें मुख्य कारण तेथें लोकमताला एक अपूर्व शक्ति प्राप्त झाली आहे हें आहे. तेथें हिंदुस्थानाहून कांहीं निराळा पण एक प्रकारचा जातिभेद आहे. अमेरिकन जातिभेद जन्मसिद्ध नसून त्याचा पाया धनसंचय व त्यामुळें प्राप्त झालेला सामाजिक दर्जा आहे. ‘यस्यास्ति वित्तं स नरः कुलीनः’ हें तत्त्व तेथें सर्वमान्य झालेलें दिसतें. धनाला जरी सर्वोच्च प्रतीचा मान आहे तरी तेथें सर्व लोकांच्या बुद्धिप्रभावाला आपलें वर्चस्व स्थापित करण्यास सारखा अवसर मिळतो हें विशेष आहे. ‘मदायत्तं तु पौरुषम’ हें वाक्य प्रत्येक अमेरिकनाच्या ह्रदयपटलावर बिंबलेलें आहे. दुसरी गोष्ट- तेथें कोट्यधीश आहेत, पण ते आपला पैसा आपल्या नातवंडा पंतवंडांचा आहे असें न समजतां आपल्या देशाचा आहे आणि आपण केवळ त्याचे व्यवस्थापक आहों असें समजतात. या बाबतींत मि. आंड्रयू कार्नेजी यांचें चरित्र आपल्या इकडच्या धनिकांना आदर्शवत् होईल यांत शंका नाहीं. ते स्वतःच्या सुखासाठीं लागेल तेवढा पैसा खर्चून उरेल त्या पैशानें दवाखाने बांधतात; ग्रंथसंग्रहालयें काढतात; शिक्षणसंस्थांना मदत करतात; व जेणें करून सामान्य लोकांच्या क्लेशाचें निवारण होईल अशा रीतीचा दानधर्म करतात. अशाच माणसांच्या योगानें अमेरिकेला हल्लींचा उच्चदर्जा प्राप्त झाला आहे. अमेरिकन लोक दैववादी नाहींत; ते कट्टे कर्मयोगी आहेत. दैवयोगानें कोणतें ही राष्ट्र उदयाला येत नसतें. राष्ट्राची उत्क्रांति ही वाढ आहे व ती मनुष्यकृत आहे असा त्यांचा पूर्ण विश्वास आहे. आमचे धनिक लोक अमेरिकन धनिकांचें उदाहरण डोळ्यांपुढें ठेवतील, तर हिंदुस्थानचे भवितव्यास एकदम निराळी दिशा लागेल.

---

## स्त्रीशिक्षणाचा आदर्श

सध्यां स्त्रियांच्या शिक्षणाविषयीं निरनिराळे लोक आपापलीं निरनिराळीं मतें व विचार प्रकट करीत आहेत, अशावेळीं मद्रासचे वयोवृद्ध, ज्ञानवृद्ध, अनुभववृद्ध आणि विचारवृद्ध अग्रणी सर सुब्रण्यम् आयर यांचे त्या विषयासंबंधाचे विचार लोकांस विचाराची योग्य दिशा दाखवितील, ह्मणून त्यांचें मत संक्षेपानें येथें देतों. त्यांच्या मतें स्त्रियांना शिक्षण द्यावयाचें तें असें असावें कीं त्याच्या योगानें पत्नी, माता, व देशकन्या या तिन्ही संबंधाचीं कर्तव्यें त्यांना योग्य रीतीनें करतां येऊन त्यांचा जन्म त्यांच्या, त्यांच्या कुटुंबाच्या व एकंदर देशाच्या हितसाधनांत जावा. आरोग्याचीं तत्त्वें व तीं व्यवहारांत आणण्याचे प्रकार यांची त्यांना अवश्य माहिती व्हावी. नुसत्या पदवीधर स्त्रिया निर्माण करण्यांत देशाचा पैसा व्यर्थ खर्च करूं नये.

---

## पडच्छाया.

### ( श्री टिळक यांची सरकारी संभावना )

कृपणाला त्याचें धन किंवा नागाला जसा त्याचा रत्नमणी जीव कीं प्राण असतो तद्वत् मुंबई सरकारला आपली इभ्रतीची कल्पना प्रिय होय हें सुंदर आहे; पण त्या कल्पनेच्या नादांत जो अतिरेक होतो त्याचा मासला ह्मणजे राजश्री टिळक यांच्या जामीनकीचें प्रकरण. गेल्या शनिवारीं त्यांच्याकडून वीस हजाराचा जात मुचलका व वीस हजाराचा जामीन घेण्याचा अखेर पुण्याच्या जिल्हा मॅजिस्ट्रेट साहेबांनीं हुकूम सुनावला. ही हुकूम ह्मणजे श्री टिळकांच्या वाणीला आर्थिक कुलुपच होय. ‘**साम्राज्य-देव**’ बनवूं पहाणाऱ्या या राष्ट्रीय थोर संताला मःन सृष्टींतच रममाण होण्याची आज्ञा देण्यासारखेंच आहे. इतिहासही असें सांगतो कीं उत्कृष्ट ध्येयांचीं संतचरित्रें ह्मणजे गुलाबाच्या कांटेरी झाडाचें वर्णनच होय. श्री टिळकांची शद्धरूपी पडछाया ह्मणजे एक सरकारी बागुलबुवाच आहे. तेव्हां अशा स्थितींत न्यायकोर्टांतले ते शद्धछल व ठराव सरकारच्याच दृष्टीनें स्वीकारल काल निरवधि आहे तेव्हां सत्यप्रतीती होईपर्यंत मौन हे देखील संजीवनी विद्येसारखें उपकार करील. आह्माला मात्र एवढा मोठा अभिमान वाटतो कीं मुंबई प्रांता प्रमाणें आमचे स्थानीक सरकार क्रूरण व न्हस्वदृष्टी नाहीं.

---

## रामराज्य.

### ( रा. स्टँडन यांची सुमनांजली )

उमरावतीच्या हिंदी हायस्कूलनें गेला नागपंचमीचा सण खराखरा सण करून दाखविला. आणि त्या प्रसंगीं नानाविध खेळ झाल्यानंतर विद्यार्थ्यांना संबोधून सर्व वऱ्हाडच्या जनतेपुढें राजश्री स्टँडनसाहेब कमिशनर यांनीं जें संभाषण केलें, त्यांत त्यांचे उदार तत्वविचार, कार्यकारी मंत्रीपणा व अंतःकरणांतील कल्याणबुद्धी हीं अगदीं ओतप्रोत भरलेला आहेत. त्यांची दृष्टी आमच्या चष्म्यांतून असें पाहते कीं हें महायुद्ध ह्मणजे रावणशाहीचा विजय कीं रामशाहीचा विजय हाच मोठा प्रश्न आहे. ‘बळी तो कान पिळी’ हें रावणाचें साम्राज्य होतें आणि त्याच प्रमाणें सर्व लहान मोठीं राष्ट्रें जर्मनी पादाक्रांत करूं पहात आहे. न्याय, नीती व स्वातंत्र्य हीं श्रीरामाच्या साम्राज्याची संपदा. त्याच प्रमाणें ब्रिटिश, फ्रेंच व रशिया हीं तिन्ही दोस्त राष्ट्रें त्या दैवी संपदेवर विश्वबंधुत्वाचे साम्राज्य स्थापूं पहात आहेत. तेव्हां सांप्रतच्या युद्धाच्या ईश्वरी योजनेंत कोणत्या साम्राज्याला यशश्री लाभेल हें भावी काला पेक्षां आपण इतिहास दृष्टीनें लवकर निश्चित करू शकतों. राजश्री स्टँडन यांच्या भाषणांत इतकी स्पष्टोक्ती व कळकळ भरली आहे कीं त्यांचे तें समग्र भाषणच मुळच्या इंग्रजींत व मराठी रूपांतरांत आह्मी देऊ इच्छितो. ह्मणजे त्याच्या वाचनानें एका प्रकारचा चेहऱ्यावर तजेला, वीरश्री व आकांक्षा आपोआप बहिःस्फूट होऊं लागतील. भावी साम्राज्याचें विश्वबंधुत्व रणांगणाच्या रसायन शाळेंत बनणारें आहे. तेव्हा तेथेंच स्वार्थाची परमावधी होऊन परमार्थाचें रसायन लाभणार आहे.

---

## आपलेपणा.

नामदार राव बहादुर केशव गोविंद दामले यांनीं गेल्या ४ थ्या तारखेच्या जाहीर सभेंत जे विचार प्रदर्शित केले, त्यांमध्यें राज्यकर्ते व हिंदी प्रजा यांच्यामधील लघु गुरु भेद त्यांनीं अगदी नाहींसा केला आहे. ब्रिटिश आरमार, ब्रिटिश सैन्य किंवा जें जें ह्मणून कांहीं ब्रिटिश त्याच्याशी इतकें तादात्म्य झालें आहे कीं त्यांनीं पश्चिम रणक्षेत्रावर उभे राहून आपल्या मनाच्या त्या उच्च ब्रिटिश पोशाखांत भाषण केलें असतें तर सांप्रतच्या भाषणांत त्यांना यत्किंचित्‌ही फरक करावा लागला नसता. आमच्यांतील सात्वीक भागीनदारीची ही आर्यवृत्ती व समसमान बुद्धी जेव्हां राज्य कर्त्यांच्या ह्रदयांत ही सारखाच प्रकाश पाडील, तो खरा मंगल दिवस होय. ईश्वर करो आणि नामदारांची ही मंगलवाणी सत्यमय होवो.

---

# वऱ्हाडवृत्त.

हवामानः— हें सप्तक बहुतेक पर्जन्याशिवाय गेलें. आणि त्यामुळें शेतांतील तृणशाला दूर करण्यास व धनधान्य देणारीं पिकें अधिक जोमांत आणण्यास चांगली संधी मिळाली. आकोले शहरीं व पुष्कळशा खेड्यापाड्यांतून प्लेग डोकाऊं पाहात आहे असें इतस्ततः फिरणारे उंदीर बोलतात.

रा. रा किशोरीलाल मश्रुवाले बी. ए. एल् एल्. बी. वकील आकोला हे वकीलीच्या धंद्याला रजा देऊन मुंबईस व्यापार धंद्यांत पडण्यासाठीं काल रोजीं गेले. हे गृहस्थ सत्याग्रही, स्वभावानें प्रेमळ व महत्वाकांक्षी जसे असावेत तसेच आहेत. वकील मंडळीनीं त्यांचा चांगला सन्मान करून या नव्या उत्क्रांतीबद्दल त्यांचे मनोभावानें अभिनंदन केलें.

गेल्या शुक्रवारीं येथील लायब्ररीच्या वर्षोत्सव व्याख्यानमालेला **पुनः** जीवनदशा आणल्याबद्दल तिच्या चालकांचे आह्मी अभिनंदन करितो गेल्या शुक्रवारीं पहिलें व्याख्यान राजश्री मश्रुवाले यांनीं प्राथमिक शिक्षणावर इंग्रजींत दिलें. त्यावर राजश्री जोग डिपटि इन्स्पेक्टर व रावसाहेब महाजनी यांनीं समयोचित चर्चा करून व्याख्यात्याचा गौरव केला.

**सैतानाची घडी**—गेल्या ईदीच्या दिवशीं बऱ्हाणपूर येथें हिंदू मुसल्मानांचा दंगा होऊन कांहीं खून पडण्यापर्यंत मजल पोचली. हें ऐकून उभय हिंदू मुसल्मानांस सारखेंच हळहळ वाटेल. बऱ्हाणपूरची हकीकत स्थानिक सरकार तूर्त प्रसिद्ध करूं इच्छित नाहीं तों पर्यंत आह्मी ही त्याच इच्छेला वश होऊन दुःखानें लेखणी थांबवितों.

---


## Wanted.

Wanted an under graduate for the post of Head Clerk The post is pensionable... carrying a salary of Rs. 40-2- 50 with future prospects in the service of the Local Bodies.

(Sd) K. P. Bhat,
President,
Municipal Committee,
Date 5-8-16 Burhanpur.

## नोटीस

जनाब साहेबजादी गफुरुननीसा बेगम दादीसाहेबां जहागीरदार कौलखेडा जहागीर ता. आकोला राहणार हैद्राबाद दखन

यांसः—

खालीं सही करणार यांजकडून नोटिस देण्यांत येते कीं, आह्मी या पूर्वीं ता. २९ ४-१६ इ॥ रोजीं एक नोटिस जनाब मीर नसरत अलीसाहेब मुनसीफ नारायणपेठ यांस व दुसरी नोटिस ता. २७-४-१६ रोजीं तुह्मास हैद्राबाद दाक्षिण मुक्कामीं आह्मास तुमचेकडून कर्जाउ घेणें असलेले २७९ रुपया बद्दल दिली होती. तरी तुह्मी सदर्हू रुपयाची आजपावेतों कोणत्याच प्रकारे फेड केली नाहीं. सबब मौजे कोलखेडा जहागीर येथील वायद्याबद्दल रकम रु. १४२८१०८३ सन १९१५-१६ सालाबाबत आमचेकडून तुह्मास देणें होते. परंतु आह्मास तुमचेकडून घेणें असलेल्या रुपयाची २७९ तुह्मी फेड न केल्यामुळें आह्मास देणें असलेल्या वायद्याची रकम रुपये १४२८१०८३ वसुलात मजराकरून वायदा आदा केला आहे. हल्लीं तुह्मापासून आह्मास रुपये १३२८५८९ एकशें बत्तीस रुपये पांच आणें नऊ पै घेणें आहेत. सदर्हू रुपये तुह्मी नोटिस पावले तारखेपासून १५ दिवसाचे आंत आदाकरून आमचे सहीची पावती घ्यावी न दिल्यास कायद्याप्रमाणें तजवीज करून व्याजासुद्धां एकंदर रकम व त्यावर होणारा सर्व खर्च या नोटिशीचे खर्चासुद्धां भरून द्यावी लागेल. ता. १०।८।१६

सही

K. Hafizuddin
Jahageerdar
Dated 10-8-16

नो. नं. २९०

---

## नोटीस

रा. संभू वा॥ पुनाजी साहू दुकान मोरगांव सादिजन ता. बाळापूर

यांसः—

हणमंत रावजी खानझोडे वकील रा. आकोला खालीं सही करणार यांजकडून नोटिस देण्यांत येते कीं, तुह्मास सिदू वा॥ पुंजाजी यानें रु. ४०० शे चे गहाणखत ता. १९-२-१९१४ इ. रोजीं लिहून दिले होते. त्या गहाणखताचा ता. २२-६-१९१६ इ. रोजीं माझा पक्षकार नामें वनसिंग वा॥ जैसिंग रा. निमकर्द यानें तुमचे गहाणाची पूर्ण रकम देऊन निकाल केला आहे. व त्या गहाणखतावर तुह्मी आपले गुमास्त्या मार्फत एक आण्याचे पावतीचे टिकीट लावून गहाणची पूर्ण फेड झाली असा शेरा लिहून ते गहाणखत फाडून माझे पक्षकारास परत केलें आहे. परंतु तें बरोबर नाहीं, सबब या नोटिशीनें कळविण्यांत येते कीं, ही नोटिस पावल्यापासून आठ दिवसाचे आंत त्या गहाणाची पूर्ण फेड झाली आहे अशा-बद्दल माझे पक्षकाराचे नांवची मला निराळी पावती तुह्मी लिहून नोंदून द्यावी, तसें न केल्यास त्याला दावा करावा लागेल. त्याबद्दल त्याला जो खर्च लागेल तो तुह्माला द्यावा लागेल. करितां आगाऊ नोटिशीनें कळविले आहे. ही नोटिस दिली ता.

सही

H. R. Khanzode
Pleader
For Wansing Jaising of Nimkarda
N. N. 291

---

## जाहीर नोटीस

मी खालीं सही करणार या नोटिशीनें सर्व लोकांस कळवितो कीं मी मंचनपूराहून आकोटास ता० ३ आगष्ट १९१६ रोजीं नारायण सिताराम चौधरी राहणार मंचनपूर याचे सहीचा एक कागद, बापुजी रघुजी चौधरी याचे निशाणी आंगठा केलेला कागद, तिसरा नारायण सिताराम याची सही व बापूजी रघूजी याची निशाणी आंगठा असलेला कागद व चौथा बापुजी रघूजी याची निशाणी रेघ असलेला कागद असें चार कागद घेऊन आकोट मुक्कामीं वरील तारखेस वरील नारायण सिताराम व बापुजी रघुजी याचे चाललेल्या फौजदारी मुकदम्यात त्यांचे सहीचे अर्ज दाखल करण्या करितां घेऊन जात असतां ते कागद वाटेत गहाळ झाले ते अद्याप सांपडले नाहींत तरी ते कोणास सांपडले असल्यास त्यांनीं खालील पत्त्यावर पाठवून द्यावे अगर आणून द्यावे असें जो कोणी आणून देईल त्यांस ५ रुपये बक्षीस देण्यांत येईल.

सही

लालजी कृष्णाजी मंचनपूरकर
हल्लीं आकोट
मु० आकोट ता० ६-८-१६
नो. नं. २९२

---

## नोटीस

खालीं सही करणाराकडून सर्वत्र साहुसावकार व सभ्यगृहस्थ लोकांस विनय पूर्वक कळविण्यांत येते कीं. मी व माझा भाऊ नामें लक्ष्मण व माझा पुतण्या अज्ञान नामें गोविंदा वा॥ तीमा असे त्रीवर्ग मिळून असलेली स्थावर इस्टेट समाईक आजपावेतों होती व एकत्रच राहत होतो, हल्लीं माझे व माझा भाऊ लक्ष्मण याची आपसांत ना बनती झाल्यामुळें गावांतील सभ्यगृहस्थ (पंच) जमऊन त्यांचे मार्फत वाटणी झाली तीचा तपशील येणें प्रमाणें:—

मौजे दिग्रस प्रगणें चिंचोली तालुके दारव्हा जिल्हा येवतमाळ येथील राहते घर (चार दिवाली आवाराची औरस चौरस लांबीचे आतील) यांत एक घर कवेलुचे उत्तराभीमुखी आहे व या घरासच लागून पश्चिमे कडून जागेस खोल्या आहेत व त्याजवर तक्ते टाकलेले आहेत व दरवाजाचे बैठकीवर कवेलु व तक्ते आहेत यापुढें आंगण आंगणांत विहीर व एक निंबाचे झाड अशी जागा आहे. जंगम माल घरांतील भांडींकुंडी हें ही वाटून ज्याचे त्याचे ताब्यांत आहे वरील स्थावर मालपैकीं माझी व अज्ञान पुतण्या ही मजजवळ असल्यानीं त्याचीही हिस्याची जागा असे दोघे मिळून उत्तरे कडील व पश्चिमे कडील खोल्या व बैठक मिळून २५×२६ अशी जागा वाटणी होऊन माझे ताब्यांत दिली आहे तसेंच कर्जही ज्याचे त्याचे ज्यानीं त्यानीं द्यावें या प्रमाणें ठराव होऊन वाटणीपत्र लिहिले गेले परंतु ते कांहीं कारणामुळें नोंदलें गेलें नसल्यानीं झालेला व्यवहार माहीत होणार नाहीं असे मला वाटल्या बद्दल जाहीर केले आहे व अशी ही विनंती करण्यांत येते कीं वरील माझा भाऊ यानीं माझे व माझे पुतण्याचे इस्टेटीवर बोजा ठेऊन कर्ज काढल्यास मी व माझी इस्टेट जबाबदार राहणार नाहीं करीतां जाहीर केलें आहे. तारीख ८ माहे आगष्ट सन १९१६ इ.

द० वासुदेव जयराम वेंडर दिग्रस

सही

सहीचा आंगठा भगाजी वा॥ संभाजी
झाली याचे डावे हातचा असे

नो. नं. २९३

---

## नोटीस

तुळशी मर्द बाबू व १ बाबू वा॥ लक्ष्मण अडनांव माळोकार रा. निंभ ता. बाळापूर

यांसः—

खालीं सही करणार यांजकडून नोटिस देण्यांत येतें कीं तुह्मी माझे साक्षांत चुलता व चुलती असून तुमचे कडेस असलेली जिनगी वडीलोपार्जीत आहे. तुमचे मरणानंतर त्या जिनगीचा मीच योग्य व कायदेशीर वारीस असून मजला बुडविण्याचे इरायानें तुह्मी त्या जिनगीची अफरा तफरा करण्याचे विचारांत आहा. तुह्माला कोणाचे कर्ज नसून ती जिनगी कोणास गाहाण अगर खरेदी देण्याचे कांहींच कारण नाहीं. तरी या नोटिशीनें कळविण्यांत येते कीं त्या जिनगीची तुह्मी कोणत्याही तऱ्हेनें अफरा तफर करूंनये केल्यास ती रद्द असें. सबब आगाऊनोटिस देऊन कळविले आहे ता ८-८-१६

सही

महादु सोनाजी माळेकार द० खद

नो. नं. २९४


ॐ नमः श्रीगणेशाय.

## आर्यवनौषधींचा कारखानाः—मुर्डी.

### मदनामृतसंजीवनी.

धातुवर्धक, अत्यंत कामोत्तेजक व पौष्टीक, वीर्यस्तंभक, रक्तशोधक, मनोत्साहक कांतिबुद्धिवर्धक, सुवर्णमाक्षिक, मौक्तिक, कस्तुरी व अनेक वनस्पतीमिश्र अद्भुत गुटिका.

यांच्या सेवनानें नपुंसकत्व, स्वप्नजन्य व इतर धातुपात, उन्हाळे इंद्रियशिथिलता गर्भाशयं मुरलेले विकार मूत्रसंकोच, धातूचा पातळपणा, स्त्रियांची धुपणी छातींत रोग हात, पाय मूत्रमार्ग व नेत्र यांचा दाह, क्षय, पांडुरोग, मुलांची खर, जीर्णज्वर, अग्निमांद्य; मस्तकशूळ, मुळव्याधी, वातरोग, निद्रानाश, पित्तविकार बाळंतरोग, मधुमेह, जुनाट पर्मा, मुष्टीमैथुनानें आलेली कृशता इत्यादि अनेक विकार खात्रीनें बरे होऊन शरीर निरोगी, मजबूत व सतेज बनते. पचनशक्ति व स्मरणशक्ति भरपूर वाढून धातू व रक्त यांची शुद्धि, वीर्यस्तंभन व भरपूर कामोद्दीपन होतें, व मनास उत्साह देतात. दूध व जडान्न भरपूर पचूं लागतें. त्यांत उपयुक्त वनस्पतींचें मिश्रण केले असल्यामुळें त्यांत अपायकारक पदार्थ अगदीं नसून वरील विकारांवर अत्यंत गुणकारक आहेत, करितां गुणाबद्दल असंख्य. सर्टिफिकिटा मिळाल्या व नित्य मिळतात. पथ्यसेवनाची गरज मुळींच नसून स्त्रिया, पुरुष व मुलें यांस पाहिजे त्या दिवसांत घेण्यास अत्यंत उपयोगी आहेत. एका रुपयांचे आंत मिळणार नाहींत. एकदम ४ रुपयांच्यावर कितीही घेणारास टपालखर्च माफ आहे. चार रुपयाचें आंत वेगळा टपालखर्च ५ आणे पडेल दर एकदम ३५ गो० १ रु० ७५ गो० २ रु० १६५ गो० ४ रु० २७१ गो० ६ रु० ५५० गो० १० रुपये.

१. **अपूर्व नेत्रांजन**—यानें वडस, सारा, फुलें, खुपऱ्या, बिंदु, काच, इ० नेत्रांचे सर्व विकार त्वरित बरे होऊन दृष्टि तीव्र व थंडगार राहते. या रोगास हें अंजन खरें रामबाण आहे. १॥ तो. ड. १ रु.

२. **परम्यावर अपूर्व मिश्रण**—कोणत्याही नवा जुना पर्मा व तज्जन्य दाह तिडाक, मुत्रांची काळा, सकाच, पुपस्राव, रक्तस्राव इत्यादि विकार पथ्य नसत सात दिवसांत जातात. तिडीक एका घटकत जाते. असे रामबाण औषध कोठेंच मिळत नाहीं. बा० किं० १ रु० १। भार २ रु० सर्व औषध व्हा० नें पाठवं.

सर्व सामानाचा मोठा क्याटलाग मागवावा. तो फुकट पाठवूं. औषधांत अपायकारक पदार्थ अगदीं नसून तीं पूर्ण खात्रीची असल्याबद्दल असंख्य सर्टिफिकिटें आयुर्वेदशिवाय मोठमोठे रोगांवर अनेक औषधें, योक्त रसायनें, भस्में, पाक गुटिका आसवें, तेलें व सुगंधी अत्तरें वगैरे माफक दरानें मिळतात. अनु० ख० सो० ट० ख० वे० पडेल. रोखीनें किंवा व्ही. पी. नें पाठवूं. प्रकृतिमान कळविल्यास रोग्याचें निदान व चिकित्सा कळवूं.

पत्ताः—मु० मुर्डी, पो० हर्णे, जिल्हा रत्नागिरी. } कृष्णशास्त्री पेंडसे वैद्य.

ना० नं० २०

# कौतुकरत्नाकर

**छिन्नमस्तानी धुमावती; मातंगी भैरव षोडश देवतांचे चित्रांसह पृष्ठसंख्या ६००; विषय ६०० वर आवृत्ती ९ वी. प्र. २००००,**

बंगाल्यांतील कामरूपदेशी ही विद्या फार प्रबल असून तिकडील जटेली, लंगोटि, छा छु करणारे अज्ञानवादी यांचेकडून खरी माहिती मिळवून सिद्धनागार्जुन मंत्रमहोदधि, महानिर्वाणतंत्र उड्डीश वगैरे ग्रंथाचे आधारें हा भानुमती ग्रंथ तयार केला आहे. ह्याच धर्तीवर प्रसिद्ध झालेल्या इंद्रजाल, जादुबाई इतरसंग्रह, कौतुकचिंतामणी, किमिया, गुप्त गारुडी विद्या वगैरे पुस्तकांचा ह्याचेपुढें हिशेब नाहीं. यांत कोणते विषय आहेत याचा विस्तार कळाविणें फार कठीण आहे. मंत्र तंत्र व यंत्र विधिपूर्वक करणें नियम ग्रहादिकांचें वर्णनें भानुमती यंत्र वशिकरणशास्त्र नानाप्रकारचे स्तंभन प्रयोग, उच्चाटन, जारण मारण प्रयोगविधि, औषधी हुन्नर, नानारंग कला, आत्मविद्यामेस्मेरिझम प्रयोग विधि वैगेरे अनेक विषय आहेत. किं. ट. व्ही. पी. सह १॥ रुपया.

# कोकशास्त्र अथवा जीवनसौख्य.

ज्यांना खरोखरीच सौख्य भोगणें आहे त्या प्रत्येकांनीं हें पुस्तक अवश्य संग्रहीं ठेवावें. या पुस्तकांत कोणते विषय आहेत हे पुस्तकाच्या नांवावरून सहज समजण्याजोगें असल्यामुळें त्याचें वर्णन करणें नको. किंमत १ रुपया ट. ख. २ आणे.

अपूर्व ग्रंथ ! **मराठी भाषेंत** अपूर्व ग्रंथ

**आजपर्यंत मराठी भाषेंत प्रसिद्ध न झालेला अपूर्व ग्रंथ.**

# वशीकरण विद्या.

अर्थात दत्तात्रय तंत्र हा ग्रंथ दत्तात्रय व शंकर यांचा संवादरूपी असून दत्तात्रयांनीं प्रश्न केल्यावरून शंकरानीं कलीयुगांत त्वरीत सिद्धी देणारे प्रयोग सांगितले आहेत. ते मारण, मोहन, स्तंभन, विद्वेशण, वशीकरण, स्त्रीवशीकरण, आकर्षण इंद्रजाल, यक्षिणीसाधन, रसायन विद्या, कालज्ञान, अनाहार, आहार, निधी दर्शन, वंध्यापुत्रवती करण, वाजी करण, भूतग्रहानिवारण, सिंह व्याघ्र निवारण इत्यादी अनेक प्रयोग सांगितले आहेत. किं. ८८ आणे ट. ख. ३

पुस्तकें मागविण्याचा पत्ता.

ब्रँच आफीस
उंबरगांव जि ठाणें
नो. नं. ७

पत्ता:— **गंगाधर आर. आणि कंपनी.**
हरिश्चंद्र बिल्डिंग मुंबई नं. ४


## नोटीस

नोटिस बेशमी रघुजी वा। शिवराम जात माळी बगाळे रा० अंत्रज ता० खामगांव जि० बुलडाणा

यांस:—

मी खालीं सही करणार या नोटिशीनें कळविते कीं, मी तुमची लग्नाची बायको असून तुह्मा पासून मला एक मुलगा झाला होता व त्याचे वय मरण समयीं तीन वर्षांचे होते. त्या मुलाचे मरणानंतर तुह्मी माझे अंगावरील सर्व डागीनें व इतर चिजवस्त काढून मला तुह्मी आपले आईचे व भावाचे सांगण्यावरून घराबाहेर हाकून दिले; व त्याच भावाचे नांवाचें मृत्युपत्र करून ठेविले अहे तें रद्द असें. तुह्मास महारोग झाल्यामुळें तुह्मी मला ५ वर्षांपासून वागवीत नाहीं. तरी तुह्मी १५ पंधरा दिवसांत मला आज पावेतो लागलेला खावटीचा खर्च रुपये २५० अडीचशे आणून द्यावा व मला पुढें खावटी कारितां सालीना ५० पन्नास रुपये प्रमाणे खर्च पुरवावा अगर वागविण्याकरितां घेऊन जावे. वरील मुदतींत आपण वर लिहिल्यापैकीं कांहीं न केल्यास रितीप्रमाणें कोर्टांत दावाकरून या नोटिशीचे खर्चासह सर्व रक्कम भरून घेतली जाईल. कळावे ता. २९-७-१६ इ०

सही

सहीची निशानी आंगठा
सुपडाई मर्द रघुजी रा०
हिवरे बुजरुक

नो. नं. २८९


# Oriental Government Security Life Assurance Co., Ltd.

ESTABLISHED 1874.

HEAD OFFICE, BOMBAY.

## FUNDS exceed 5 CRORES.

INVESTED IN GOVERNMENT SECURITIES AND MUNICIPAL AND PORT TRUST BONDS.

*Claims paid* $4\frac{1}{2}$ CRORES

## A Novennial Record of Progress.

| Year. | No. of Policies in force. | Existing Assurance Rs. |
|---|---|---|
| 1879 | 1.034 | 31,00,950 |
| 1888 | 8668 | 2 63,38,000 |
| 1897 | 26,522 | 6 37,26,354 |
| 1906 | 48,147 | 9,45,63 407 |
| 1915 | 64 738 | 12,23,63.755 |

| Year. | Total Income. Rs. | Total Assets. Rs. |
|---|---|---|
| 1879 | 1,30,109 | 1,70,695 |
| 1888 | 11,48644 | 36,38,694 |
| 1897 | 28,85,976 | 1,3390.729 |
| 1906 | 4884 | 2,84,76165 |
| 1915 | 72,96,901 | 5,25,53900 |

EVERY MAN'S DUTY

is to provide for those dependent upon him and for his own old age. When a man's income is reduced owing to any cause there is all the more reason for his making provision for those dependent upon him and this can be effected in no way better than by a Life Assurance Policy with the "Oriental"

### *SPECIAL FEATURES.*

Absolute Security—Low Rates—Liberal Conditions.
Forty years continuously increasing prosperity.
Ninety per cent of the entire Profits, after providing for the Reserve Fund divided among the Policyholders every 3 years.
Indian Lives are accepted at the same rates as Europeans.
Loans granted to policyholders at reasonable rates.
Prompt Payment of Claims.

***Influential and active agents wanted Terms Liberal***

:0:

Full particulars, prospectus and proposal forms on application to:—

R. Paterson Brown, Manager, Bombay. or *A. C. Lal,* Branch Secratary, *C. P. Berar & Khandesh*, Nagpur.

N. N. 22


४ टके
या रकमेइतक
मोबदला कर


श्रीमत्सद्गुरु श्रीसमर्थ रामदासस्वामिविरचित

# सटीप दासबोध.

**श्रीरामदासस्वामींच्या सुंदर चित्रासहित.**

**पोथी साईज, किंमत रुपये २, टपालखर्च ८ आणे.**

'प्रपंच साधुनि परमार्थाचा लाहो' करण्यास श्रीसमर्थ रामदासस्वामींच्या ह्या दासबोध ग्रंथाचें [illegible] व मनन हें एक अत्युत्तम साधन आहे. असा हा उत्तमोत्तम प्रासादिक ग्रंथ आह्मीं पोथी-[illegible]मध्यें ठळक टाईपांत एका रामदासीयाकडून तपासवून व अर्थनिर्णायक टीपा देववून छापून [illegible] केला आहे.

[illegible]३, कोलभाट लेन,
[illegible]बादेवी रोड, मुंबई.

तुकाराम जावजी,
निर्णयसागर छापखान्याचे मालक.


हें पत्र आकोला येथें कैकासवासी खंडेराव बाळाजी फडके यांच्या वऱ्हाडसमाचार छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं सदाशिवाश्रमांत छापून प्रसिद्ध केलें.

Regd-No. N 150

# वऱ्हाडसमाचार.

Berar-Samachar.

वर्ष ५० ] आकोला—सोमवार तारीख २१ माहे आगष्ट सन १९१६ इ० [ अंक ३३

# हिंदुस्थान सरकार.

—:※:-:※:-:※:—

## सन १९१६-१७ चे कनव्हर्शन लोन

## [ मोबदल्याचें कर्ज. ]

### पोस्ट आफिस विभाग.

**ह्या कर्जाची फेड भर किंमतीनें सन १९३० नंतर आणि सन १९३७ चे आंत करण्यांत येईल.**

**व्याज दरसाल दरशेंकडा ४ टक्के दरानें दर सहा महिन्यांनीं ह्मणजे एप्रिलचे व ऑक्टोबरचे १ ल्या तारखेस देण्यांत येईल.**

**शेंकडा ३ अगर ३॥ टक्के दरानें पूर्वी दिलेल्या कर्जाच्या रोख्यांच्या मोबदला ह्या नवीन कर्जाचे रोखे घेण्याचा अर्जदारास हक्क राहील.**

अर्ज द्यावयाचे ते १०० रुपयांसाठीं अगर शंभरांनीं बरोबर भाग तुटेल अशा ५००० रुपयांहून जास्त नाहीं इतक्या कोणत्याही रकमेसाठीं द्यावेत, व ते तारीख १४ जून सन १९१६ ते ता. २९ सप्टेंबर सन १९१६ पर्यंत ( ह्या दोन्ही तारखा धरून ) कोणत्याही दिवशीं सेव्हिंग्ज बँकेचें काम करणाऱ्या कोणत्याही पोस्ट आफिसांत घेण्यांत येतील. अर्ज कोणाही मनुष्यास करतां येतो, मग तो सेव्हिंग्ज बँकेचा ठेवीदार असो वा नसो.

जितक्या कर्जाकरितां अर्ज असेल तितकी पुरी रकम अर्जाबरोबर अमानत ठेविली पाहिजे, आणि त्या रकमेचा अर्जदारास कर्जरोखा देण्यांत येईल. अमानत रकम ठेवणें ती रोख ठेवावी अगर सेव्हिंग्ज बँकेमध्यें असलेल्या आपल्या खात्यांतून लागेल ती रकम काढून तिची पूर्ण किंवा अंशतः भरपाई करावी.

पोस्ट आफिस मार्फत दिलेल्या नवीन कर्जाचा कर्जरोखा जर पोस्ट आफिस अधिकाऱ्यांचें ताब्यांत ठेवला असला तर त्या रोख्यावर मिळणाऱ्या व्याजावर प्राप्तीचा कर आकारण्यांत येणार नाहीं.

नवीन कर्ज जितक्या रकमेचें देऊं केलें असेल त्या रकमे इतक्याच हिंदुस्थान सरकारच्या दर शेकडा ३॥ टक्के व्याजाच्या रुपी सिक्यूरिटीज् त्यांच्या दर्शनी किंमतीच्या शेंकडा ९६ या दरानें आणि दरशेंकडा ३ टक्के व्याजाच्या रुपी सिक्यूरिटीज् त्यांच्या दर्शनी किंमतीच्या शेकडा ८२॥ या दरानें देऊन त्यांचे मोबदला हें नवीन कर्ज देण्याचा हक्क अर्जदारांस मिळेल व तो हक्क दुसऱ्या कोणास बेचन करून देतां येईल.

मोबदला करण्याचा हक्क धारण करणाऱ्या इसमांचे मोबदला करण्यासाठीं अर्ज ता. १६ आक्टोबर सन १९१६ पासून ता १६ जानेवारी सन १९१७ पर्यंत ( दोन्ही तारखा धरून ) घेण्यांत येतील. मोबदला करण्यांत येणाऱ्या सिक्युरिटींवर, त्या मोबदला करण्याचे वेळीं. ता. ३० सप्टेंबर सन १९१६ पर्यंत व्याज देण्यांत येईल आणि त्यांच्या ऐवजीं दिलेल्या नवीन कर्जावर ता. १ आक्टोबर सन १९१६ पासून व्याज सुरू होईल.

या संबंधानें तपशीलवार माहितीच्या जाहिरातीच्या प्रती आणि अर्जाचे नमुने सेव्हिंग्ज बँकेचें काम करणाऱ्या कोणत्याही पोस्ट आफिसांत मिळतील.

इच्छा असल्यास सोबत जोडलेला नमुना उपयोगांत आणावा.

---

**हिंदुस्थान सरकारचें सन १९१६-१७ चे शेंकडा ४ टक्के व्याजाचें कन्व्हर्शन लोन ( मोबदल्याचे कर्जा ) साठीं पोस्ट आफिसमार्फत करावयाच्या अर्जाचा नमुना.**

(सेव्हिंग्ज बँकेचें काम करणाऱ्या कोणत्याही पोस्ट आफिसांत ता. २९ सप्टेंबर सन १९१६ पावेतों हा अर्ज दाखल करावा. वाटल्यास हा नमुना कापून काढून उपयोगांत आणावा.)

मी ______ (अक्षर वाचतां येईल असें स्वच्छ लिहावें.)

या अन्वयें अर्ज करतो कीं ता. ८ जून सन १९१६ चे गॅझिट ऑफ इंडिया, एक्स्ट्राआर्डिनरी, मध्यें जाहिर करण्यांत आलेल्या सन १९१६-१७ च्या शेंकडा ४ टक्के व्याजाच्या कन्व्हर्शन लोनपैकीं ______ रुपये कर्ज मजपासून घ्यावें.

ज्या रकमेचें कर्ज देण्याकरितां मी अर्ज केला आहे त्या रकमेच्या भरपाईसाठीं

(१) मी या सोबत { रोख रुपये ______ / चेकनें रुपये ______ } सादर करित आहें.

(२) या सोबत मी आपलें पासबुक पाठवीत आहे आणि सेव्हिंग्ज बँकमध्यें माझे खातीं जमा असलेल्या रकमेंतून रुपये ______ काढन घेण्याचा मी अधिकार देत आहे.

(रोख रकम किती दिली, चेकनें किती व सेव्हिंग्ज बँकमध्यें असलेल्या ठेवींतून काढून कांहीं रकम दिली असल्यास ती किती त्या रकमा त्याकरितां रिकाम्या सोडलेल्या जागेंत वेगवेगळ्या नमुद कराव्यात. जो मजकूर अनवश्यक असेल तो खोडून टाकावा.)

एकूण रुपये.......

(अ) माझी विंनती आहे कीं कर्जाचा जो हिस्सा मजपासून घेण्याचें मंजूर होईल त्याबद्दलचा कर्जरोखा अकौंटंट जनरल पोस्ट्स अँड टेलेग्राफ्स यांचे जवळ माझेतर्फे ठेवावा आणि त्याबद्दल मिळणारें व्याज

(१) ______ पोस्ट आफिसमध्यें माझे नांवानें सुरूं असलेलें सेव्हिंग्ज बँक खातें नंबर ______ यांत जमा करावें. ( अर्जदाराचें खातें सेव्हिंग्ज बँकमध्यें आधीचेंच नसेल तर पारिग्राफ (१) खोडून टाकावा )

(२) ______ पोस्ट आफिसांत माझे नांवानें सेव्हिंग्ज बँकेचें खातें सुरू करून त्यांत जमा करावें.

(ब) माझी अशी विनंति आहे कीं कर्जाचा जो हिस्सा मजपासून घेण्याचें मंजूर होईल त्याबद्दल खालीं लिहिलेल्या प्रकारच्या प्रामिसरी नोटा मला द्याव्या आणि व्याज ______ ______ ट्रेझरीमधून मला मिळावें असा त्यांवर शेरा लिहावा.

((अ) किंवा (ब) ह्या दोहोंतून एक पारिग्राफ भरून दुसरा खोडून टाकावा.)

मी अशी विनंति करतो कीं सन १९१६-१७ चे शेंकडा ४ टक्के दराचे कन्व्हर्शन लोनपैकीं ज्या रकमेचें कर्ज देण्यासाठीं मी अर्ज केला आहे त्या रकमेइतक्या शेंकडा ३॥ अगर ३ टक्के दराच्या हिंदुस्थान सरकारच्या रुपी सिक्यूरिटी मोबदला करण्याचा अधिकार देणारें वारंटही मला द्यावें.

नांव ______

पत्ता ______

तारीख ______

पोस्ट आफिसांत दाखल केल्याची तारीख ______ ( ही तारीख ज्या पोस्ट मास्तरानें अर्ज घेतला त्यानें नमुद करावयाची )

रजिस्टर नंबर ______ ( हा नंबर हेड पोस्ट मास्तरानें घालावयाचा )

हेड आफिसचा छाप.

नो. नं. २४१

'वऱ्हाडसमाचार प्रेस' आकोला.

## वर्गणीचे दर

आकोल्यांतील लोकांस........१ रुपया
बाहेरगांवीं ट. हां. ........ २ रुपये
वर्गणी आगाऊच घेण्याची वहिवाट आहे.

## नोटीशीचे दर

दर ओळीस दीड आणा.
हेडिंगच्या दोन ओळी धरल्या जातील.
नोटीस सुवाच्य असली पाहिजे.
सूचनाः— गुरुवारच्या आंत येणाऱ्या नोटीसा त्याच आठवड्यांत घेतल्या जातील. यापुढें येणाऱ्या नोटीसास स्पेशल चार्ज पडेल.


# नोटीस.

हिंदुस्थानच्या बादशहाच्या फौजेमध्यें चाकरी करण्याचे नियम.

## ब्राम्हण लोकांकरितां

सरकारच्या मनांतून एक ब्राह्मण लोकांची डबल कंपनी ( १ जमादार, ४ नाईक आणि २०० शिपाई ) ११६ मराठा इन्फन्ट्री करितां तयार करावयाची आहे. या पैकीं निम्मे लोक मध्यप्रांत आणि वऱ्हाड व बाकीचे निम्मे इलाख्यातून भरती करावयाचे आहेत.

वऱ्हाडांतील राहिवाशांनीं नावें नोंदण्याचे अर्ज जिल्हा अधिकारी ह्मणजे डिपुटी कामिशनर यांजकडे करावेत, अगर इलिचपूर, खामगांव व वाशीम सब डिव्हिजन मधील लोकांनीं आपआपल्या सबडिव्हिजनल आफीसरकडे करावेत.

रिक्रूटनीं लढाई चालू असेपर्यंत अगर इच्छा असल्यास पुढें ही नोकरींत राहण्याकरितां नांवें नोंदावीत. ते शिकून पूर्ण तयार झाल्याशिवाय त्यांना लढाईवर पाठविलें जाणार नाहीं. ज्या लोकांनीं लढाई चालू असतांना लष्करी खात्यांत नोकरी केली असेल त्या लोकांना पुढें सरकारी नोकरींत शिरते वेळेस जो काळ लष्करी खात्यांत गेला असेल तो काळ वयाच्या मुदतींतून वजा करण्याचें सरकारांनीं ठरविलें आहे.

रिक्रूटची उंची कमीतकमी ५ फुट ४ इंच, छाती ३१ इंच ( आवस्तृत ) आणि ३३ इंच ( विस्तृत ) असावी. वय १६ आणि २६ या दरम्यान असावें व त्यास कोणतेही शारीरिक व्यंग नसावें व तो सशक्त, बळकट व बुद्धीवान असावा.

शिपायास ११ रु. पगार मिळून महागाई भत्ता धान्याच्या भावाप्रमाणें मिळतो. हल्लीं हा भत्ता दक्षिणेंत ५ रु ८ आ. आहे. ह्मणजे शिपायास एकंदर वेतन १६ रु. ८ आ. मिळते या शिवाय दर वर्षी कपड्याकारितां व बुटाकरितां १२ रु. मिळून शिवाय नोकरींत शिरते वेळेस ६० रु. किंमतीपर्यंत लढाईचा सरंजाम मिळतो. ११६ मराठा लोकांची पलटण हल्लीं वायव्य सरहद्दीवर बन्नु येथें आहे.

नो नं २४२


# चांदीचीं भांडीं

नाशिक येथें तयार केलेलीं सर्व प्रकारचीं सुबक व घाटदार भांडीं आमचेकडे विक्रीस तयार असतात भाव माफक व्ही. पी. नें अगर रोखीनें पाठवू. मालाचे खरेपणाबद्दल ग्यारंटी देऊ

पुरुषोत्तम रामचंद्र वैशंपायन
रविवार पेठ नाशिक सिटी.
नो. नं. ४

## सुबोधमाला.

सद्यःस्थितीस अनुसरून प्रगतीपर, ज्ञानप्रद, व मनोरंजक मासिक पुस्तक.

नामांकित लेखकांचे विचार परिप्लुत निबंध, बोधपर गोष्टी, अनुकरणीय चरित्रें हृदयंगम कविता, चालू कादंबरी वगैरेनीं युक्त पृष्ठें दरमहा ३६. वार्षिक वर्गणी बाहेरगांवीं ट. ख सह १॥≈ उमरावतीस रु. १॥ उमरावतीचे एजंट रा. सदाशिवराव देशमुख. जानेवारी १९१६ पासून सुरूं झालें आहे. एजंट पाहिजेत

संपादक— काशीराव बापुजी देशमुख.
अंबागेट उमरावती.
नो. नं. २२३

## अमेरिकन सोन्याचे कधींच काळे न पडणारे दागिने.

चंद्रहार किं. रु. ३।४ गोठ जोडीची किं रु. १॥ २, २॥. पाटल्या जोडीची किं. रु. १॥, २, २॥. सरी किं. रु. ३, ४, ५. वज्रटीका रेशमांत गुंफलेली किं. रु. ३, ४. ठुशी रेशमांत गुंफलेली किं. रु. ५, ६. नथ उत्तम मोत्यांनीं बांधलेली किं. रु. ३, ४, ५ शिंप्याचें मोतीं लहान मोठें वाटेल तसें. सरीची किं. रु. १॥, २, ३, ४. अंगठी किं. रु. १, १॥. सल्ले अष्टपैलु जोडीची किं. रु. १॥. बांगड्या जोडीची किं रु. १॥,२,२॥. कोणत्याही प्रकारचा मापाचा दागिना मिळेल.

पत्ताः— मगनलाल के. आणि कंपनी,
गिरगांव मुंबई.
नो. नं. २२४

## अस्सल अंगुरी.

# हिंग

रु. ४ शेर, पवित्र केशर रु. १८३ आणि १८७ तो. खालिस कस्तुरी रु२५ तो. शुद्ध शिलाजीत ८९ तो. सुर्मा ममीरा रु. ३ तो. स्याहजीरा रु. २ शेर, मुरब्बा बादाम रु. १ शेर

काश्मीर स्टोर्स श्रीनगर नं० ५

## जाहिरात

मुंबई ब्यांकेची सेव्हिंग ब्यांक.

ह्या बँकेंत खालीं दिलेल्या अटीवर ठेवी ठेवितां येतात.

कोणत्याही वर्षाचे १ ले जानेवारी आणि ३१ दिसेंबर याच्या दरम्यान दोन हजार रुपये पर्यंत पैसा ठेविला जाईल.

ठेवी दोन अथवा अधिक इसमांच्या नांवावर ठेवतां येतील आणि तो पैसा यापैकीं एकास अथवा जास्त इसमांस अगर यापैकीं मयताचे मागें राहील त्यांस काढतां येईल.

व्याज दर साल दर शेकडा तीन रुपयाप्रमाणें दिलें जाईल. व्याजाची आकारणी प्रत्येक महिन्याची जी कनिष्ठ शिल्लक असेल तिजवर केली जाईल. मात्र दहा हजारावरील शिल्लक रकमेस व्याज नाहीं. नियमांच्या प्रती बँकेंत अर्ज केला असतां मिळतील.

मुंबई ब्यांक आकोला ९।९।०९ } Lyon Scott एजंट
नो. नं १

## हिंदुस्थानावर अरिष्ट.

हिंदुस्थानांतील राहिवाशांच्या पाठीस ज्वर व हिवताप यांचें आरिष्ट सदोदित लागलें आहे. पण त्याचा प्रतिकार करण्यास बाटलीवाला यांचें हिवतापाचें औषध व गोळ्या ह्या रामबाण आहेत. ताप किंवा शीतज्वर येणारसें वाटतांच हें औषध घ्यावें. किं. १ रु.

**बाटलीवाला यांच्या निस्तेज लोकांसाठीं शक्तिकारक गोळ्या**

हें औषध घेतल्यानें भागवटा, मेंदूचे श्रम, पौरुषनाश, अशक्तता व क्षयरोगाचें मान त्याप्रमाणें अजीर्ण इ. इ. विकार तावडतोब दूर होतात किं रु. १८८.

**बाटलीवाला यांचें दंतमंजन.**

हें दंतमंजन मायफळाशीं कांहीं इंग्रजी औषधांचा वैद्यकीय रीतीनें मिलाफ करून बनविलें आहे. किं. ८४

**बाटलीवाल्याचें गजकर्णावर मलम.**

यानें गजकर्ण, कुजली, खरूज यांचा विकार एका दिवसांत नाहींसा होतो. किं. ८४

हीं औषधें सर्व औषधी विकणाऱ्या दुकानावर व डॉ. एच. एल. बाटलीवाला जे. पी. मु. वरली लेबोरेटरी दादर, मुंबई यांजकडे मिळतात.

DR. H. L. Batliwala. Sons & Co Ltd
N. N. 3 Dadar Bombay.

## श्री दत्तात्रय अलंकारालय कोल्हापूर

आमचे कारखान्यांत स्वतःचे देखरेखेखालीं, मुद्दाम तयार केलेले उत्तम सोन्याचे सुबक दागिने— मंगळसुत्र साज, ठुशा-जोड, गुलाबाचीं फुलें, बिल्वदळी टीका, मुदा अग्रफुलें साखळ्या व वागऱ्याचीं वगैरे सर्व जातीचा माल—तसेच चांदीच्या मासोळ्या, चाळ, उपकर्णी, तारें, वाट्या, गडवे, इत्यादि माफक दरानें मिळतील आह्मी सर्व सोनें, न्याशनलचें शंभर नंबरी वापरीत असतों. व डागाचा उपयोगही नियमितच केलेला असतो. यामुळें जिन्नस पांढरे पडण्याची अगर वाईट निघण्याची भीति बाळगण्याचें मुळींच कारण नाहीं. आमचे जिनसाची लाख काढून वजन तोलून पाहावें. गिऱ्हाइकाची खात्री करून देण्यास आह्मी तयार आहों. व्यापाऱ्यास कामिशन मिळेल. ऑर्डरी प्रमाणें माल तयार करून देऊं, चांदी सोन्याचे खरेपणाबद्दल आह्मी जबाबदार आहों. माल रोखीनें अगर व्ही. पी. नें पाठविला जातो ऑर्डरी बरोबर एक रुपया आगाऊ पाठविला पाहिजे.

श्रीदत्तात्रय अलंकारालय—कोल्हापूर
नो नं ६

## सावंतवाडी येथील.

**दशावतारी गंजिफा**— उत्तम पान व टिकाऊ पक्का रंग किंमत ॥।, १, १।, १॥, २, २॥ ते ५ रु. प. **बुद्धीबळ जोड लांकडी**— किंमत ॥। १, १॥, २ ते ४ रु. प **सोंगट्या जोड**— किंमत ।, ॥, ॥।, १, १॥, रु. प. **खडावा जोड**— शिसवी व शिवणीचे वगैरे सामान घाऊक व किरकोळ आमचेकडे विकत मिळेल. मोठा क्या. मा. फुकट

डी. आर. अळवणी, स्टेट सावंतवाडी.
नो. नं. २७२

## विक्रीस तयार

आमचे छापखान्यांत दरखास्तीचे, वकीलपत्राचे, परत भरयाचे, लिस्टफार्म पर्च्याचे व नकलेकरितां करावयाच्या अर्जांचे नमुने छापून तयार आहेत. ते आमचे छापखान्यांत कोणत्याही वेळीं विकत मिळतील.

वऱ्हाडसमाचार कार्यालय, सदाशिवाश्रम, आकोला } मॅनेजर

## खात्रीचा तयार केलेला.

ताजा अनंत मूळ.

नंबर १ ला ३॥ रु. शेर नं. २ रा २॥ रु. शेर ८ दिवसाची पूर्व मागणी केल्यास तांब्रस मुळ्यांचा ताजा कुट्टन अच्छेराच्या वजनानें डब्यांत भरून पाठविला जाईल. गूण व घेण्याची रीत डब्यावर

पत्ता
रामचंद्र सदाशिव मार्कंडे उद्धवजी मोहला नागपूर शहर सर्कल नं ६

## नोटीस

नोटीस बेशमी रा. रा. यशवंतराव गोविंदराव देशमूख राहणार हात ता. बाळापूर

यांसः—

खालीं सही करणार यांजकडून नोटिस देण्यांत येते कीं, लोहार वगैरे गांवचे देशमुखी वतनाचे रूसुमाबद्दल तुह्मी सार्टीफिकीट होल्डर असून यंदाचा सर्व रूसुम तुह्मी घेतला आहे. वरील रूसुमांत माझा एक बारांश हिस्सा आहे. तो तुह्मास मागितला असतां दिला नाहीं. तरी नोटिस पावल्यापासून ८ दिवसाचे आंत देणें. न दिल्यास दावा करून घेऊं. व या नोटिशीचा खर्च ही देणें. कळावें. ता. १२।८।१६

सही

शेखलाल शेखचांद देशमुख राहणार

लोहार ता. बाळापूर नि. खुद

नो० नं० ३०२

## नोटीस

सकसेशन सर्टीफिकीट नंबर १ सन १६ विद्यमान सब जज्ज साहेब कोर्ट खामगांव

सुंदरलाल पन्नालाल मारवाडी राहणार पातुर्डा ता. जळगांव

अर्जदार

मयत गंगाबिसन पन्नालाल मारवाडी रा० पातुर्डा ता. जळगांव याचे जिनगीचे वारसाचे सार्टीफिकीट संबंधीं अर्ज.

सर्वत्र लोकांस कळविण्यांत येते कीं, गंगाबिसन पन्नालाल हा मयत झाला असून त्याचा वारस सुंदरलाल पन्नालाल मारवाडी हा असून सार्टीफिकीट मिळणेंबद्दल अर्ज केला आहे. त्याबद्दल ज्या कोणाची सार्टीफिकोर्ट देणेंबद्दल हरकत असेल त्यांनीं या कोर्टांत ता. १४-१०-१६ रोजीं हजर राहून आपली हरकत दर्शवावी. तसें न केल्यास सुंदरलाल पन्नालाल याजला वारसाचे सार्टीफिकीट दिले जाईल कळावें. आज ता० १० माहे आगष्ट सन १९१६ रोजीं आमचे सहीनिशी व कोर्टाचे शिक्या निशी दिले.

R. N. Trivedi
Sub Judge
Khamgaon

नो. नं. ३०३

## जाहिर नोटीस

या नोटीशीनें सर्वत्रांस व विशेषतः रा. गोविंदा खंडू मुरतडकर वंजारी रा. आकोला शहर यांसः—

खालीं सही करणार नोटीस देते कीं गोविंदा माझा मुलगा असून अलीकडे ३ वर्षापासून बिघडला आहे. तो माझे संमती शिवाय स्थावर जंगम जिनगीची अफरातफर करीत असून त्याचा माझ्या जिवंतपणीं कांहींच हक्क संबंध नाहीं. तरी त्याजपासून माझी स्थावर जंगम जिनगी कोणी गहाण खरेदी, पट्यानें वगैरे घेऊं नये. घेतल्यास त्याबद्दल माझी जिनगी अगर मी जबाबदार राहणार नाहीं. तसेंच गोविंदा वा खंडू यांस ही कळविते कीं तूं जिनगीची अफरातफर करूं नये. केल्यास तुझा योग्य बंदोबस्त केला जाईल. तुझ्या ताब्यांत दिलेला घोडा व टांगा तुला वाहून पोटभरण्याकरितां दिला आहे, तो त्वां विकू नयेस व कोणी विकत घेऊं नये. घेतल्यास त्या पैशाचा बोजा टांगा घोडें याजवर राहणार नाहीं. क० ता० १७-८-१६ इ.

सहीची निशानी आंगठा

लक्ष्मी मर्द पुंजाजी वंजारीण

रा० शहर आकोला हिचा खुद

नो. नं. ३०४

## पत्रव्यवहार.

रा. रा. वऱ्हाड समाचार कर्ते यांस

सा. न. वि. वि. कॉलरा ह्मणजे ज्यास पटकी वगैरे ह्मणतात त्यावर मला एक उत्तम औषध माहित आहे. पथ्य केल्यास एकही मनुष्य जाया होणार नाहीं. पंढरपूर वगैरे यात्रेचे वेळीं व इतर वेळीं या रोगाची साथ आली असतां या रोगानें हजारों मनुष्यें मरतात. या औषधाचा लोक उपयोग करितील तर एकही मनुष्य मरणार नाहीं अशी खात्री आहे. परंतु हें औषध सर्व लोकांस माहित नसल्यामुळें त्याचा फायदा दुसऱ्यास घेतां येत नाहीं. यासाठीं सार्वजनिक फायद्या करितां त्याची वर्तमानपत्रांतून प्रसिद्धी करावी असा विचार मनांत येऊन तें औषध प्रसिद्धी करितां या पत्रासोबत आपलेकडे लिहून पाठविलें आहे. तरी पुढील अंकांत तें छापून प्रसिद्ध करावें.

### कॉलऱ्यावर रामबाण औषध

### फुकट! फुकट!! फुकट!!!

सा. न. वि. वि. कालरा ह्मणजे ज्यास पटकी, महामारी, हवेचा उपद्रव, गोळीचा आजार वगैरे जयस ह्मणतात त्यावर खालीं लिहिलेलें उत्तम औषध आहे. पथ्य उत्तम प्रकारें केल्यास एकही मनुष्य दगावणार नाहीं. तें औषध येणें प्रमाणें:—

| | |
|---|---|
| १ कापूर कचोरा. ( मसाल्यात घालतात तो ) | तोळे १२॥ |
| २ उंची कलमी ह्मणजे दालचीनी | तोळे १२॥ |
| ३ वेलदोडे | तोळे ९ |
| ४ बडी सोप | तोळे २९ |

येणें प्रमाणें औषधे घेऊन कुटून दहा शेर पक्के पाण्यांत ( फुरसत असल्यास चार तास भिजत घालून ) काढा करावा. निम्मे पाणी उरलें ह्मणजे काढा उतरावा. तो काढा तोळे २ रोग्यास प्रथम देणें त्या पासून जुलाब बंद होतात. जुलाबाचें मान पाहून १-२ वेळां काढा देणें तहान लागेल तर एक शेर पाण्यास आधण आणून तें पाणी थंड करून त्यांत वरील काढा पांच तोळें घालून तेंच पाणी पिण्यास देणें. या रोगावर मुख्य पथ्य हें आहे कीं, "रोग्यास खाण्यास कांहींच देऊं नये" दूध देखील देऊं नये. लघवी सुरू होऊन दीड दोन दिवस झाल्यावर साबुदाणा वगैरे हलके अन्न प्रथम खाण्यास देणें. मग क्रमाने दुसरे जड अन्न देत जावें. या प्रमाणें केल्यास एकही रोगी दगावणार नाहीं. या रोगात दुसरे प्रकार होतात. त्यावर खालीं लिहिलेले उपचारही करणें, ह्मणजे धोक्याचें कारण राहणार नाहीं. ओकारी असेल तर कापराचे अर्काचे पांच थेंब थोडे साखरेवर घालून ती प्रत्येक ओकारी नंतर खाण्यास देणें. पोट दुखत असल्यास ( मुरडणें नव्हे ) दोन मासे हिंग घेऊन कुटून तो २ तोळे पाण्यात टाकून देणें, पोट फुगेल तर सागवानाची बी पाण्यांत उगाळून ती चाटण्यास देणें व त्याचाच बेंबीवर आणि बेंबी पासून खालचे पोटास लेप करणें.

मुख्य औषध एका अवालियानें सांगितले आहे त्याची इच्छा आहे कीं जे रोगी या औषधानें बरे होतील त्या पैकीं प्रत्येकानें ८-। सव्वा आणा श्री कृष्णेश्वर महाराज संस्थान शहर सातारा पेठ व्यंकटपुरा यांचे सेवे करितां पाठवावा. सध्या सदहू संस्थानचे वहिवाटदार वे० रा० रा० वामन शास्त्री पंडित हे आहेत त्यांचेकडे हे पैसे पाठवावे, व कुपनात खुलासा लिहावा प्रत्येकानें अलग मनीआरडर न करितां १०-९ जनांनीं मिळून पैसे अगर पोष्टाची तिकीटें पाठविण्यास खर्च कमी येईल. कळावें ही विनंती ता० १९-८-१६

आपला

मुक्काम दारव्हा } वामन रामचंद्र गोखले
प्रांत वऱ्हाड } वकील

## वऱ्हाडसमाचार

मित्ति श्रावण वद्य ८ शके १८३८

## ग्रामस्वराज्य.

हल्लीं जिकडे तिकडे स्वराज्य शद्वाचा घोष सुरू आहे. अशा वेळीं ह्मैसूर संस्थानानें आपल्या ग्रामवासीयांना स्वराज्याचे अधिकारच नव्हेत तर स्वराज्य चालविण्याचें शिक्षण देण्याचा उपक्रम केलेला पाहून कोणाला ही संतोष वाटल्या वांचून राहणार नाहीं. अधिकाराच्या बरोबर कर्तव्यें ही येतात. ह्मैसूर संस्थानानें ग्रामपंचायती स्थापन केल्या असून त्या पंचायती कडे त्या त्या गांवचें आरोग्य, शिक्षण वगैरे बाबी पूर्णपणें सोपविल्या आहेत, व त्या बरोबरच हीं कामें कशीं करावयाचीं त्याबद्दलचें सविस्तर टांचण ही प्रसिद्ध केलें आहे. त्यांत कर्तव्याचे दोन भाग केले आहेत. एक प्राथमिक कर्तव्यांचा व दुसरा उच्च कर्तव्यांचा. प्राथमिक कर्तव्यांत आरोग्य कसें राखावें तें सांगितलें आहे. आठवड्यांतून निदान एकदां (सोमवारीं) सर्व गांवकऱ्यांनीं जमून गांवाच्या आरोग्यार्थ कोणकोणत्या गोष्टी करावयास पाहिजेत तें ठरवावें आणि मग प्रत्येक घरच्या एका माणसानें चार पांच तास काम करून रस्त्यांची व्यवस्था, मोऱ्या, केरकेचरा, वगैरेची व्यवस्था पहावी. गटारें नसतील, तर जेथें पाणी साचत असेल तेथें पक्कें कुंड बांधून त्यांतलें पाणी आठवड्यांतून एक दोनदां काढून शेतकऱ्यांच्या शेतांत अगर गांवाबाहेर नेऊन टाकावें. गांवाभोंवतालीं खाचखळगे असतील ते बुजवावे, अगर त्यांतलें पाणी मोरीवाटे काढून ओढ्यांत नेऊन सोडावें. गांवाभोंवतीं विषारी वनस्पति उगवल्या असतील तर त्या काढाव्या. गांवांत पडकींसडकीं घरें असतील तर तीं त्यांच्या मालकांकडून पाडवावीं. गांवाच्या आसपास तीनशें फुटांच्या आंत कोठें ही दुर्गंधि राहूं देऊं नये. पाणी पिण्याच्या विहिरी वगैरे स्वच्छ ठेवाव्या. गांवांतली चावडी, देवळें, करमणुकीच्या जागा वगैरेंची दुरुस्ती ठेवावी प्रत्येक घराला वर्षांतून एकदा तरी चुन्याची सफेती देण्यांत यावी. हें एक काम झालें. दुसरें काम लोक शिक्षणाचें. प्रत्येक तालुक्याच्या डे. कमिशनरानें आठवड्यांतून एकदा गांवकऱ्यांना जमवून त्यांना वर्तमानपत्रांतल्या बातम्या सांगून आरोग्य व उद्योगधंदे यांचे बाबतींत कोठें काय चाललें आहे याविषयीं माहिती सांगावी, व गांवच्या लोकांच्या अडचणी समजून घेऊन त्यांना सल्लामसलत द्यावी. वरचीं कामें करण्यास पैसा पाहिजे ह्मणून प्रत्येक कुटुंबानें दरसाल निदान एक रुपया तरी वर्गणी द्यावी. ज्यांचे घरांत अंग मेहनत करणारें माणूस नसेल त्या कुटुंबापासून अर्धा आण्यापासून एक आण्यापर्यंत त्या कुटुंबाच्या स्थितीच्या मानानें दंड घ्यावा. वर्गणीची व दंडाची रकम मिळून एक फंड करावा व हा फंड आणि सरकारी मदत मिळून होईल त्या रकमेची व्यवस्था गांव कमिटीनें करावी. गांवांतल्या लोक संख्येच्या निदान एकदशांश तरी शाळेंत जाणाऱ्या मुलांची संख्या असावी. प्रौढ वयाच्या अशिक्षितांना ही विद्या शिकण्यास उत्तेजन द्यावें. प्रत्येक गांवांत दर महिन्यास किती प्रगति झाली याची नोंद ठेवावी. या शिवाय शक्य असेल तेथें गांवकऱ्यांनीं गांवची सांपत्तिक स्थिति व लोकांच्या गरजा यांबद्दलची ही माहिती गोळा करावी, ही प्राथमिककर्तव्यें झालीं. उच्च प्रतीच्या कर्तव्यांत गांवसुधारणा व ग्रामशृंगार, लोकांच्या सांपत्तिक व औद्योगिक स्थितीची सुधारणा, आणि सर्व सामान्य ज्ञानाचा प्रसार या तीन गोष्टी येतात. ग्रामसुधारणेंत नवे रस्ते करणें, पूल, पाण्याचा पुरवठा, गटारमोऱ्यांची व्यवस्था, गुरांच्या वैरणीचा पुरवठा वगैरे गोष्टींचा समावेश होतो. दुसऱ्यांत मुलांच्या शाळा, वाटसरांच्या सोयी, शेतीपासून अधिक उत्पन्न काढण्याच्या तजविजी सहकारी मंडळ्या, व ब्यांका, लहानसान उद्योगधंदे, व्यापार वृद्धि वगैरे विषय येतात; आणि तिसऱ्या ह्मणजे ज्ञान प्रसाराच्या सदरांत व्याख्यानमाला, प्रदर्शनें, वस्तुसंग्रहालयें, व्यापारी वगैरे शिक्षणासाठीं गांवांतल्या हुशार तरुणांना शहरास पाठविणें, दुय्यम व उच्चप्रतीचें शिक्षण वगैरे गोष्टींचा समावेश होतो. या सगळ्या गोष्टी जुलमानें नव्हे तर लोकांच्या खुषीच्या साह्यानें व ...nt ...e of तालुका अंमलदारांनीं करवून ...mpetent ...d proper संस्थानच्या मुख्य अंमलदा जिल्हाधिकाऱ्यांनीं दौऱ्याचे त्यांचें काम कसें काय मुद्दाम लक्षपूर्वक

उत्तेजन द्यावें,

म्हैसूर सरकारची ही योजना कागदावर चांगली दिसते; पण प्रत्यक्ष अमलांत कितपत येते तें पहाणें आहे, प्रत्येक कुटुंबांतल्या निदान एका माणसानें चारपांच तास सार्वजनिक कामांत घालवावे ही अपेक्षा कांहीं मोठी नाहीं. याच्या कितीतरी पटीनें अधिक काळ चिलमी फुंकण्यांत व गांवच्या कुटाळक्या करण्यांत जातो. पण आमच्या लोकांना अशा सवयीच जडल्या आहेत कीं काम आणि त्यांत ही सार्वजनिक काम म्हटलें म्हणजे पडल्या कपाळाला आठ्या! वरची योजना पूर्णत्वानें आमच अमलांत येईल अशी अपेक्षा कोणी करणार नाहीं. पण अंशतः जरी ती अमलांत आली, तरी तो प्रारंभ शुभच म्हटला जाईल. म्हैसूरच्या या प्रयोगाकडे सर्वांचे डोळे लागून राहतील हें सांगावयास नकोच.

## शास्त्रीय शिक्षणाचें महत्त्व.

उमरावती येथें मुसलमानांसाठीं जें सरकारी हायस्कूल झालें आहे तें त्या जातीच्या शिक्षणासाठीं सरकार करीत असलेल्या कळकळीच्या प्रयत्नाचें निदर्शक आहे यांत शंका नाहीं. या हायस्कुलाचा प्रवेशसमारंभ करण्याचे वेळीं ना. चीफ कमिशनर साहेब सर बेंजामिन राबर्टसन यांनीं काढलेले उद्गार ही तसेच महत्त्वाचे होते या भाषणांत त्यांनीं मुसलमानांच्या उच्च शिक्षणाच्या सोयी कशा दिवसें दिवस वाढत आहेत व त्यांचा फायदा घेऊन सार्वजनिक कल्याणांत आपल्यावरची जबाबदारी उचलण्यास मुसलमानबंधूंनीं पुढें होणें किती अवश्य आहे याचें जें विवेचन केलें तें आमचे मुसलमानबंधु लक्षांत घेतील अशी आम्हांस उमेद आहे. दुसरी त्याहूनही महत्त्वाची व शिक्षणाधिकाऱ्यांनीं विशेषतः ध्यानांत ठेवण्यासारखी अशी एक गोष्ट त्यांनीं मोठ्या कळकळीनें सांगितली. सध्याच्या युद्धानें विलायतेंतल्या शिक्षणक्रमांत सुद्धां फेरफार करण्याची अवश्यकता दिसून आली आहे. सध्याच्या काळीं भौतिक शास्त्रांत उत्तम प्रगति झाल्याशिवाय कोणत्या ही राष्ट्राचा निभाव लागावयाचा नाहीं ही गोष्ट बहुतेक विद्वानांस पटली आहे आणि म्हणून त्या प्रगतीच्या मुळाशीं असलेलें जें शास्त्रीय शिक्षण तें कोणत्या उपायांनीं वाढवितां येईल याविषयीं तिकडच्या लोकांचे डोक्यांत विचार चालला आहे. हिंदुस्थानच्या मानानें इंग्लंड शास्त्रीय ज्ञानांत इतका पुढें असतां ती तेथें शास्त्रीय ज्ञानाची उणीव जर इतकी [ती]व्र रीतीनें भासत आहे तर हिंदुस्थानाविषयीं बोलावयासच नको. हिंदुस्थानाला [स]ध्यां शास्त्रज्ञानाइतकी दुसरी मोठी गरज [क]ोणती ही नाहीं. म्हणून आईबापांनीं, [शि]क्षकांनीं, अधिकाऱ्यांनीं, या ज्ञानाचा प्रसार …ठीं शिकस्तीचे प्रयत्न करण्याची जरूरी … व दुय्यम प्रतीच्या शाळांतून …स्त्रज्ञानाचा विषय अवश्यक …ने. या बाबतींत आम्हीं … गोष्ट प्रतिपादली … आमच्या खुद … मिळाल्याचें पाहून …मदार साहेब नुसता उपदेश करूनच स्वस्थ न राहतां शाळांतून शास्त्रीय ज्ञानाचा प्रसार जोरानें करण्याची कांहीं तरी तजवीज अवश्य करतील अशी अपेक्षा करणें गैरवाजवी होणार नाहीं. शाळेच्या बाहेर जनतेला ही या ज्ञानाची अवश्यकता मोठी आहे आणि ही उणीव एखाद्या मासिक पुस्तकाच्या रूपानें भरून काढण्याचें श्रेय एखाद्या उत्साही संपादकानें व प्रकाशकानें अवश्य घ्यावें अशी आम्ही पूर्वी सूचना केलीच होती, तीच आतां दुप्पट जोरानें करतों. हल्लींच्या काळीं पाणचट प्रेमविषयक किंवा गुप्तपोलिसाच्या चातुर्याविषयींच्या गोष्टींच्या मालांचा सुकाळ करण्यांत लेखक व प्रकाशक यांचा उत्साह व वाचकांचे पैसे व्यर्थ खर्च होत आहेत. त्यांचा एक चतुर्थांश जरी तूर्त शास्त्रीयज्ञानाच्या प्रसाराकडे लागला तरी पुष्कळ कार्य होईल.

## देशी उद्योग आणि सरकारी मदत.

देशी उद्योगधंद्यांना मदत करण्याची सरकारची इच्छा आहे यांत शंका नाहीं. पण त्या इच्छेला मूर्त स्वरूप येण्याचे मार्गांत कांहीं ना कांहीं अडचण उद्भवते यामुळें तिचा परिणाम लोकांचे मनावर विपरीत होतो. याचें ताजें उदाहरण अंबाला येथील काच कारखान्याचें आहे. या कारखान्याला सध्यां भांडवलाची फार जरूर आहे. म्हणून तें मिळविण्याविषयीं त्या कारखान्याच्या चालकांनीं पंजाब सरकाराकडे अर्ज केला. त्या सरकारानें कारखान्याच्या व्यवस्थेसंबंधानें पूर्ण चौकशी करून तो मदतीस पात्र आहे सबब ती द्यावी अशी हिंदुस्थानसरकाराकडे शिफारस ही केली. पण आतां असें कळतें कीं सरकार टॉमस हॉलंड यांच्या अध्यक्षत्वाखालीं नेमलेल्या कमिशनाचा रिपोर्ट होईपर्यंत या शिफारसीचा विचार करण्यास हिंदुस्थान सरकारची इच्छा नाहीं! कमिशनाचे कामाला अद्याप सुरुवात ही नाहीं. तें काम वर्षभर चालून नंतर रिपोर्ट व्हावयाचा. त्याचा विचार होऊन मग कारखान्याला मदत द्यावयाची कीं नाहीं तें हिंदुस्थान सरकार ठरविणार! तों पर्यंत कारखान्याचे पंचप्राण कदाचित् निघून ही जातील. मग त्या मदतीचा काय उपयोग होणार? हा प्रसंग पाहून जॉनसनच्या चरित्रांतल्या एका सुप्रसिद्ध गोष्टीची आठवण होते. जॉनसननें बृहत् इंग्रजी कोश अत्यंत परिश्रमानें तयार केला व तो छापण्यासाठीं एका बड्या इंग्रज सरदारापाशीं द्रव्याची याचना केली. पण सरदारानें तिकडे दुर्लक्ष केलें; आणि पुढें जेव्हां जॉनसननें दुसरीकडून मदत मिळवून तो कोश प्रसिद्ध केला, तेव्हां सत्कार्याला मदत करण्याची व स्वतःला सन्मान मिळविण्याची संधी हातची घालविल्याबद्दल त्या सरदाराला हळहळ वाटली पण काय उपयोग? गेली वेळ ती गेलीच. सरकारच्या अशा कार्यपद्धतीनें लोकांत विपरीत ग्रह होण्याचा संभव असल्यामुळें सरकारानें पुनः या गोष्टीचा विचार करावा अशी आमची नम्र विनंति आहे.

## जपान आणि कापसाचा व्यापार.

हिंदुस्थानांत ज्या वर्षी चांगलें पीक येतें त्यासालीं सुमारें पंनास लक्ष गांठी कापूस पिकतो याची किंमत सरासरी ७५ कोट रुपये होते. यांतला पुष्कळ भाग परदेशीं जातो. अलीकडे युद्ध सुरू झाल्यापासून जपानला पुष्कळसा कापूस जाऊं लागला आहे. कापूस खरेदी साठीं जपाननें सर्वत्र आपले एजंट ठेविले आहेत. या खरेदीची एजन्सी सुद्धां आमचे लोकांचे हातीं नाहीं. हल्लीं ज्या प्रमाणावर जपान आपल्या एजंटाच्या द्वारें हिंदुस्थानचा कापूस नेत आहे तें प्रमाण पाहिलें तर लवकरच कापसाचा सगळा व्यापार जपानी लोकांचे हातांत जाईल काय अशी भीती वाटते. जपानी लोकांची स्वार्थबुद्धि इतकी तीव्र आहे कीं जपानांतले गिरणीवाले जपानी एजन्सी वांचून दुसऱ्यानें आणलेल्या कापसाला हातांत सुद्धां धरीत नाहींत. अर्थात् एखाद्या हिंदी एजन्सीनें तिकडे कापूस नेला तर त्या एजन्सीला तो माल जपानी एजंटांना विकल्यावांचून व तो नाचवील तसें नाचल्यावांचून गत्यंतर नसतें. जपानला जाणारा कापूस जपानी जहाजांतूनच नेला पाहिजे असा जपानी लोकांचा दुसरा एक नियम आहे. यामुळें इतर राष्ट्रांच्या कंपन्यांचें नुकसान होत आहे. हिंदुस्थानांतल्या बंदरांत जपानी माल येण्यास कोणती ही हरकत नाहीं. पण जपानांत मात्र हिंदुस्थानचा माल जपानी जहाजांतून नेला नाहीं तर तो माल परत करण्यांत येतो. अशा कडक नियमांमुळें जपानांत गेलेल्या हिंदी व्यापाऱ्यांचें किती नुकसान होत असलें पाहिजे याची कल्पना करतां येईल. या गोष्टीकडे इंग्रजसरकारचें लक्ष लावण्याचें काम हिंदी व्यापारीमंडळाचें आहे. हिंदुस्थानांत इतक्या गिरण्या असतां जपानला कापूस कां जावा तें कळत नाहीं. जपानच्या अंगीं जसा करारीपणा आहे त्याच्या शतांशानें तो गुण जर आमचे व्यापारी, दलाल, व शेतकरी वर्ग दाखवील तर जपानला आपली सध्याची दांडगाई सोडून द्यावी लागेल. पण हें कसें व्हावें?

## बंगाली लोकांची सैन्यांत भरती.

सध्याच्या महायुद्धांत आफ्रिकेंतल्या जंगली लोकांना सुद्धां युरोपियनांच्या खांद्याशीं खांदा लाऊन लढण्याचा जो मान मिळाला, तो बंगाली लोकांसारख्या सुशिक्षित हिंदी लोकांना अद्याप मिळाला नव्हता म्हणून त्यांना वाईट वाटणें साहजिक होतें. विशेषतः कित्येक बंगाली सुशिक्षित कांहीं एक हक्क, मानपान किंवा पगार ही न मागतां केवळ राजनिष्ठेच्या प्रेरणेनें युद्धाला जाण्याला तयार झाले असतां थोडे दिवसांपूर्वी बंगाल सरकारनें त्यांचा हिरमोड केला तेव्हांपासून बंगाली लोकांचा मनें निराशाग्रस्त झाली होतीं. पण थोड्या दिवसांपूर्वी सरकारनें लष्करी अधिकाऱ्यांची समजूत घालून बंगाली लोकांवरचा हा कलंक धुऊन टाकिला आणि त्यांच्या दोन कंपन्या करण्यास परवानगी मिळाल्याचें जाहिर केलें, यामुळें बंगाली लोकांसच नव्हे तर एकंदर हिंदी समाजास अत्यंत समाधान वाटेल. मराठा, शीख, गुरखा, जाट, रजपूत, पठाण, वगैरे इतर बहुतेक सर्व जातींच्या लोकांना इंग्रज सरकारच्या बाजूनें लढण्याची जी संधी मिळाली ती या पूर्वीच बंगाली लोकांना ही मिळावयास पाहिजे होती. पण त्या लोकांविषयीं मेकॉले साहेबांनीं इंग्रज अधिकाऱ्यांचे मनांत जो दुराग्रह उत्पन्न करून ठेविला तो या गोष्टीच्या मुळाशीं खोल असें वाटतें. बंगाली लोकांनीं सैन्यांत भरती होण्याचा हक्क मागितला तो एकदम मागितला नव्हता. प्रथम त्यांनीं अँब्युलन्सचे कामासाठीं स्वयंसैनिकाची एक तुकडी तयार करून पाठविली व तिनें मेसोपोटेमियाच्या रणक्षेत्रांत उत्तम कामगिरी केल्याबद्दलचें लष्करी अधिकाऱ्यांचें सर्टिफिकेटही मिळविलें. मागील इतिहास पाहतां बंगाली लोकांविषयीं शंका घेण्यास वस्तुतः कांहीं जागा नव्हती. हिंदुस्थानांत इंग्रजी राज्याचा पाया बंगाली फौजेच्या साह्यानेंच घालण्यांत आला हें इतिहासज्ञांस ठाऊक आहेच. पण कित्येक वेळां मुत्सद्यांना मागील इतिहास विसरण्याची खोड असते. तसें विस्मरण यावेळीं सरकारास कदाचित् झालें असेल. पण अखेर पूर्वस्मृति जागृत होऊन बंगाली लोकांना जें पाहिजे होतें तें मिळालें व त्यांची तक्रार सरकारानें दूर केली, याबद्दल बंगाली बंधूंच बरोबर सरकारचें ही आम्ही अभिनंदन करतों व गुरखा, शीख, व मराठा यांच्या सारखे आमचे बंगाली बंधु ही रणक्षेत्रावर आपल्या आर्यपूर्वज तेज प्रकट करून लष्करांत अधिक भरती होण्याचा मार्ग खुला करतील अशी अपेक्षा करतों.

## वऱ्हाडवृत्त

**हवामानः**— या सप्तकांत सूर्यगोलाची ती दीव्य प्रभा मेघमंडळांतून आरपार निघून पृथ्वीला सौंदर्य व वनस्पतींना परिपुष्टी आणीत आहे आणि पर्जन्याच्या विपदा दूर फेंकतांना वायुचक्रालाही मोठी गती देत आहे. रोगराई ओसरली असून प्लेगालाही रजा मिळाल्या सारखी दिसते.

**कायदे-कौंसिल**— गेल्या बुधवारीं नव्या कौंसिल हाल मध्यें अलिशान सर बेंजामिन राबर्टसन चीफ कमिशनर यांनीं कौंसिलाच्या कार्याला प्रारंभ करण्या पूर्वी सर रेजिनाल्ड क्राडाक यांची तसबीर गौरवपूर्वक अनावृत्त केली. या तसबीरीच्या द्वारानें नामदार दादाभाईनीं पूजा द्रव्यें अर्पण केलीं. बिन-सरकारी सर बिपिन बाबू सारख्यांचा गौरव त्या स्थळीं झाला असता तर सत्तेच्या पूजेबरोबरच सद्गुणाची पूजा लोकांस अधिक आवडली असती.

यंदा जूनिअर कालेज स्कालरशिपा मिळालेल्या १८ विद्यार्थ्यांमध्यें उमरावतीच्या हिंदू हायस्कुलाचे ४ विद्यार्थी असून येथील विद्यालयांतून ० विद्यार्थी आहेत.

रा. रा. दामोदर पुरुषोत्तम खानझोडे तहशीलदार यांस रजा संपतांच चिखली तहशिलीवर नेमण्यांत आलें.

**वऱ्हाड कॉलेजः**— या संबंधाचा प्रश्न नामदार रा. ब. मुधोळकर यांचा झाला आहे तेव्हां त्या कॉलेजच्या ध्येयाला शोभण्या साठीं सुंदर हवाशीर गुरुकूलाला अनुरूप व विद्याभ्यासाला उद्दीपक असें चिखलदऱ्याच्या बाजूचें मैदान शोधून काढण्याची हीच वेळ आहे तेव्हां लोकांनीं आपला विचार स्पष्टपणें बोलण्याला धैर्य सोडूं नये.

( पुरवणी पहा. )

## नोटीस

नोटीस कलम ११ एक्ट ८ सन १८९० प्रमाणें.

किर. दिवाणी मुकद्दमा नंबर ६१ सन १९१६ इ.
विद्यमान डिस्ट्रीक्ट जज्ज साहेब बहादुर यांचें कोर्ट
मुक्काम आकोला पश्चिम वऱ्हाड

नांव गोविंदराव
बापाचें नांव नारायणराव
जात देशमुख राहणार कुरणखेड
तहसील आकोला जिल्हा आकोला
च्या अल्पवयी दुरदी बापाचे नांव गणपतराव
उमर वर्षे १२
राहणार कुरणखेड ता आकोला तहासिलीचे (२) शरीर व इस्टेट रक्षणासाठीं पालन कर्ता (१) नेमला जाण्या विषयींच्या अर्जा संबंधीं—

सर्वत्र लोकांस कळविण्यात येते कीं सदर्हू अर्जदारानें सदर्हू अल्पवयीचें २ शरीर व इस्टेट रक्षणासाठीं पालन कर्ता नेमला जाण्या विषयीं अर्ज केल्यावरून सदर्हु अर्जाची सुनावणी व चौकशीची तारीख७ माहे आक्टोबर सन १९१६ इ. रोजीं नेमिली आहे. त्यावरून अशी नोटीस देण्यात येत आहे कीं, सदर्हू अर्जदाराच्या अर्जा-बद्दल जर कोणास कांहीं तक्रार असेल तर त्यास जातीनें किंवा कोर्टानें अधिकार दिलेल्या ज्या वकीलास योग्य माहिती दिली असेल व अर्जासंबंधीं सर्व मुद्याच्या सवालांच्या जबाब देण्यास जो समर्थ असेल किंवा अशा सर्व सवालांचा जबाब देऊं शकेल असा कोणी दुसरा असामी ज्याच्या बरोबर असेल अशा प्लीडराच्या मार्फत या कोर्टात हजर झाले पाहिजे; आणि त्यास असें ही नोटीस देण्यात येत आहे कीं सदरी लिहिलेल्या दिवशीं तो हाजर न झाल्यास, त्याच्या परोक्ष अर्जाची चौकशी होऊन ठराव केला जाईल. आज तारीख ३ माहे आगष्ट सन १९१६ इ. रोजीं आमच्या सहीनिशीं व कोर्टाच्या शिक्या निशीं दिली.

V. M. Kelker
डि० जज
पश्चिम वऱ्हाड
नो. नं. ३०७ आकोला

## जाहिरात

सर्वत्र लोकांस कळविण्यांत येते कीं, कावसे बु. ता. आंकोट जिल्हा आकोला वऱ्हाड येथें खानगी इं. म. शाळा ता. १९-४-१९१९ इ. रोजीं स्थापन केली. वार्षिक परिक्षेंत ८ मुलांपैकीं ७ मुलें पास झालीं. या वर्षीं गांवचे लोकांनीं वर्गणी करून प्रशस्त शाळागृह बांधिलें आहे. हल्लीं शाळेंत ३४ मुलें इं. पाहिली व ८ मुलें इं. दुसरी इयत्ता शिकत आहेत. अभ्यासक्रम सरकारी शाळेसारखा आहे. सरकारी मराठी शाळेंत मराठी शिकणारांची संख्या १३० आहे. या मुलांना शिकविणारे ४ मास्तर आहेत. या शाळेवर २९ वर्षें काम केलेले अनुभविक हेडमास्तर रा. सदाशिव सिताराम सरकारनीं स्थिती अवलोकन करून दिले आहेत. याबद्दल आह्मी त्यांचे उपकार मानितों. बाहेरगांवच्या मुलांची येथें खाण्यापिण्याची व रहाण्याची व्यवस्था केली आहे. हल्लीं बोर्डिंगमध्यें ११ मुलें आहेत त्यांचा मागील महिन्याचा बोर्डिंगचा खर्च सरासरी दर मुलास रु. ३ तीन आला आहे. इंग्रजी शिकणाऱ्या मुलास शाळेची फी व बोर्डिंगचा खर्च दरमहा रु. ४ चारच वर जाणार नाहीं अशी खात्री वाटते. खानगी इंग्रजी शाळेंत तीन शिक्षक आहेत. पैकीं ता. १-८-१९१६ इ० पासून सरकारी शाळेंत वर्षें १३ व खानगी रीतीनें वर्षें ९ शिक्षणाचे काम केलेले, म्याट्रिक झालेले हेड मास्तर रा. राघव राजाराम उज्जेनकर या शाळेस मिळाले आहेत. खानगी रीतीनें काम करीत असतां यांचे कामाची सरकारी अधिकारी व निजामसरकारचे अधिकारी यांनीं तपासणी करून फारच चांगले शेरे दिलेले आहेत. आह्मी बोर्डिंगच्या मुलांची विशेष काळजी घेत असतों. ह्मणून गरजूंनीं आपलीं मुलें येथें पाठविल्यास त्यांचा व मुलांचा बराच फायदा होईल अशी खात्री आहे येथें सातेगांवचे मारवाडी लोकांचें लग्न आलें होतें ते वेळीं हे लोक ही संस्था पहावयास आले होते. ह्या लोकांनीं खूष होऊन या संस्थेस देणगी ह्मणून रु०६७ दिले. हें त्यांना भूषणावह आहे. या प्रमाणें उदार आश्रयदात्यांनीं या संस्थेस द्रव्यद्वारा मदत द्यावी. त्यांचा एक रुपया या ठिकाणीं सहस्रपट किंमतीचा आहे. राजाधिराज पंचम जार्ज प्रायव्हेट आंग्लो व्हर्न्याक्युलर स्कूल असें नांव दिलें आहे. सबब राजनिष्ठ देशभक्त व विद्याभिलाषी लोकांनीं यथाशक्ति द्रव्यद्वारा मदत दिल्यास विद्याप्रसाराचें पुण्य मिळेल. पैसे पोष्टमार्फत अध्यक्ष यांचे नांवानें पाठविल्यास सोईचें होईल. कळावें. ता० ९-८-१६ इ०

रा. रा चंद्रभान रायोजी पाटील
अध्यक्ष
स्कूल कमिटी कावसें ता० आकोट
नो. नं. ३०८ पो० रेल

## नोटीस

मारुती वल्लद रघुजी लादे राहणार चावर तालुका जळगांव जिल्हा आकोला
यांस:—

खालीं सही करणार यांजकडून नोटीस देण्यांत येते कीं माझा भाऊ हरी कुकडे हा मयत झाल्यास एक वर्ष होऊन गेलें. मी त्याचा वारस आहे. तुह्मी त्याचे बायको जवळून ( ह्मणजे तुमचे बहीणी जवळून ) दोन पीकाचे अजमास ४०० चारसे रुपये नेले आहेत. तरी ही नोटीस पावल्यापासून आठ दिवसाचे आंत मला पैसे आणून द्यावे न दिल्यास मला फिर्यादी करावी लागले. ही नोटीस दिली द० अनंतसिंग उमरावसिंग तारिख १९-८-१६ इ.

सही
कालु वा धर्माजी कुकडे नि०
नो. नं. ३०९ हातची रेघ असे

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस कळविण्यांत येते कीं माझा भाऊ नामे हरी वा धर्माजी कुकडे हा अजमास एक वर्ष झाले मयत झाला आहे. त्याची बायको रुखी ही त्याचे जींदगीची अफरातफर करण्याचे विचारांत आहे असें मला समजले आहे. मयत हरी हा माझा सख्खा भाऊ होता. त्याचे जिंदगीचा मी वारस आहे. तरी तिचे जवळून त्याचें घर अगर शेत कोणीही गहाण किंवा खरेदी घेऊं नये . घेतल्यास तें पोंकळ समजलें जाईल कळावे. ता० १९-८-१६ इ.

द. अनंतसिंग उमरावसिंग द. खु.
सही
कालु वा धर्माजी कुकडे नि०
नो. नं ३१० हातची रेघ असे

## NOTICE.

The following extract from Government of India, Resolution No 2951-2964, dated the 18th December 1914, is published for general information.

F. S. A. Slocock.

NAGPUR:
The 10th August 1916 } *Chief Secretary to the Chief Commissioner, Central Provinces*

## RESOLUTION.

2. Every native of India who contemplates proceeding out of India to foreign countries is strongly urged before leaving to furnish himself with an authoritative certificate of identity, in the appended form, signed by the Deputy Commissioner, in the case of residents of British India, and by the Political Agent in that of residents of Native States. In the case of a student the certificate should be signed by the head of his last school or college and countersigned by the Deputy Commissioner or Political Agent, as the case may be.

Appeals for assistance by destitute Indians who desire repatriation and by students who, owing to embarrassed circumstances, are unable to complete their course of education, cannot be dealt with satisfactorily unless the Parties are in a position to produce evidence of identity. The possession of a certificate of identity will be specially useful to young men of good family, as it may enable the Secretary of State to obtain for them social and other attentions.

The who are desirous, however, of travelling in countries where a passport will be necessary are advised to furnish themselves with such a document also before leaving India, in lieu of or in addition to, a certificate of identity. It should be remembered that no person is entitled to a passport, as of right, on the ground that he is a British subject, and the production before authorities outside India of a certificate of identiy, unless supplemented by documentary evidence of respectability, is not sufficient to ensure that a passport will be granted.

### FORM OF CERTIFICATE OF IDENTITY,

1. Name of applicant ____________________
2. Fathar's name and caste ____________________
3. Residence ____________________
4. Age of applicant ____________________
5. Nationality of applicant ____________________
6. Social or pecuniary status of father ( or guardian ) ____________
7. Date of probable departure of applicant from India ____________
8. Object of applicant's visit to England ( Europe ) / America / Japan.

*Signature of Dehuty Commissioner or Political Agent, or Head of School or College,*

*Signature of applicant,*

Signed before me.

*Deputy Commissioner or Political Agent,*

Dated ____________________

‡ *i. e.*, Whether a Brirish subject by birth of by naturalization ( or a subject of Native State. )

* Countersignature of the Deputy Commissioner or Political Agent should be obtained on certificates signed by Heads of Schools or Colleges.

Note.—Holders of of certificates of identity intending to apply subsequently in England or elsewhere for a passport to visit a foreign country are warned that no person is entitled to a passport as of right on the sole ground that he is a British subject. The production of a certificate of identity, therefore, will not ordinarily be sufficient to secure the grant of a passport, unless it is supplemented by documentary evidence of respectability endorsed by a local Government or other authority competent to issue passports in India, cerifying that the holder is a fit and proper person to receive a passport.

N. N. 306

# कौतुकरत्नाकर

**छिन्नमस्तानी धुमावती; मातंगी भैरव षोडश देवतांचे चित्रांसह**
**पृष्ठसंख्या ६००; विषय ६०० वर आवृत्ती ५ वी. प्र. २००००,**

बंगाल्यांतील कामरूपदेशी हो विद्या फार प्रबळ असून तिकडील जटेकी, लंगोटे, छा ळु करणारे अज्ञानवादी यांचेकडून खरी माहिती मिळवून सिद्धनागार्जुन मंत्रमहोदधि, महानिर्वाणतंत्र उड्डीश वगैरे ग्रंथाचे आधारें हा भानुमती ग्रंथ तयार केलेला आहे. ह्याच धर्तीवर प्रसिद्ध झालेल्या इंद्रजाल, जादुवाई इतरसंग्रह, कौतुकचिंतामणी, किमिया, गुप्त गारुडी विद्या वगैरे पुस्तकांचा ह्याचेपुढें हिशेब नाहीं. यात कोणते विषय आहेत याचा विस्तार कळविणें फार कठीण आहे. मंत्र तंत्र व यंत्र विधिपूर्वक करणें नियम ग्रहादिकांचें वर्णनें भानुमतो यंत्र वशीकरणशास्त्र नानाप्रकारचे स्तंभन प्रयोग, उच्चाटन, जारण मारण प्रयोगविधि, औषधी हुन्नर, नानारंग कला, आत्मविद्यामेस्मेरिझम प्रयोग विधि वैगेरे अनेक विषय आहेत. किं. ट. व्ही. पी. सह १॥ रुपया.

# कोकशास्त्र अथवा जीवनसौख्य.

ज्यांना खरोखरीच सौख्य भोगणें आहे त्या प्रत्येकांनीं हें पुस्तक अवश्य संग्रही ठेवावें. या पुस्तकांत कोणते विषय आहेत हे पुस्तकाच्या नांवावरून सहज समजण्याजोगें असल्यामुळें त्याचें वर्णन करणें नको. किंमत १ रुपया ट. ख. २ आणे.

अपूर्व ग्रंथ ? **मराठी भाषेंत** अपूर्व ग्रंथ

**आजपर्यंत मराठी भाषेंत प्रसिद्ध न झालेला अपूर्व ग्रंथ.**

# वशीकरण विद्या.

अर्थात दत्तात्रय तंत्र हा ग्रंथ दत्तात्रय व शंकर यांचा संवादरूपी असून दत्तात्रयांनीं प्रश्न केल्यावरून शंकरानीं कलीयुगांत त्वरीत सिद्धी देणारे प्रयोग सांगितले आहेत. ते मारण, मोहन, स्तंभन, विद्वेशण, वशीकरण, स्त्रीवशीकरण, आकर्षण इंद्रजाल, यक्षिणीसाधन, रसायन विद्या, कालज्ञान, अनाहार, आहार, निधी दर्शन, वंध्यापुत्रवती करण, वाजी करण, भूतग्रहनिवारण, सिंह व्याघ्र निवारण इत्यादी अनेक प्रयोग सांगितले आहेत. किं. ८८ आणे ट. ख. ३ पुस्तकें मागविण्याचा पत्ता.

ब्रँच आफीस — उंबरगांव जि ठाणें

पत्ता:— **गंगाधर आर. आणि कंपनी.** हरिश्चंद्र बिल्डिंग मुंबई नं. ४

नो. नं. ७

**श्रीमत्सद्गुरु श्रीसमर्थ रामदासस्वामिविरचित**

# सटीप दासबोध.

**श्रीरामदासस्वामींच्या सुंदर चित्रासहित.**
**पोथी साईज, किंमत रुपये २, टपालखर्च ८ आणे.**

'प्रपंच साधुनि परमार्थाचा लाहो' करण्यास श्रीसमर्थ रामदासस्वामींच्या ह्या दासबोध ग्रंथाचें वाचन व मनन हें एक अत्युत्तम साधन आहे. असा हा उत्तमोत्तम प्रासादिक ग्रंथ आह्मीं पोथीसाईजमध्यें ठळक टाईपांत एका रामदासीयाकडून तपासवून व अर्थनिर्णायक टीपा देववून छापून प्रसिद्ध केला आहे.

२३, कोलभाट लेन, कालबादेवी रोड, मुंबई.

**तुकाराम जावजी,**
निर्णयसागर छापखान्याचे मालक.


## नोटीस

शेख माहिबूब वा॥ शेख राहिमान राहणार आकोला शहर

२ शेखचांद वा॥ महमद हनीफ रा. आकोला शहर भाजी बाजार

३ लाडले साहेब वा बिसामिल्ला साहेब रा. आकोला शहर

यांस

खालीं सही करणार यांजकडून नोटिस देण्यांत येते कीं, तुह्मी आमचे पक्षकार अमीरबी हजायनी मर्द हाजी शेखलाल राहणार ताजनापेठ आकोला याजपासून सुमारें ८।४।१६ रोजीं पांच रुपये व एक रुपया किंमतीचे असे दोन स्टांप कागद आणवून तिजपासून त्या दोन दस्तैवजावर तिला कांहीं एक न सांगतां तिच्या इष्टेटीसंबंधानें कांहीं लिहून घेतले. सबब तुह्मास कळविण्यांत येते कीं. वरील दोन दस्तैवज तुह्मी तिजपासून तिला फसवून लिहून घेतले. असल्याकारणानें पोकळ आहेत. वरील दोन्ही कागद तुह्मी ही नोटिस पावल्यापासून ४ चार दिवसाच्या आंत आमच्या पक्षकारास वापस आणून द्यावेत. व तिजपासून पावती घेऊन जावी. असें न केल्यास कायद्याप्रमाणें योग्य तजवीज केली जाईल. कळावें.

आकोला १४-८-१६

सही
A. G. Nargundker
Pleader

N. N. 305

## Wanted.

Wanted an under graduate for the post of Head Clerk The post is pensionable... carrying a salary of Rs. 40-2- 50 with future prospects in the service of the Local Bodies.

( Sd ) K. P. Bhat,
President,
Municipal Committee,

Date 5-8-16 N, N,288 Burhanpur.


# Oriental Government Security Life Assurance Co., Ltd.

ESTABLISHED 1874.

HEAD OFFICE, BOMBAY.

## FUNDS exceed 5 CRORES.

INVESTED IN GOVERNMENT SECURITIES AND MUNICIPAL AND PORT TRUST BONDS.

*Claims paid* $4\frac{1}{2}$ CRORES

## A Novennial Record of Progress.

| Year. | No. of Policies in force. | Existing Assurance Rs. |
|---|---|---|
| 1879 | 1,034 | 31,00,950 |
| 1888 | 8668 | 2 63,38,000 |
| 1897 | 26,522 | 6 37,26,354 |
| 1906 | 48,147 | 9,45,63 407 |
| 1915 | 64 138 | 12,23,63.755 |

| Year. | Total Income. Rs. | Total Assets. Rs. |
|---|---|---|
| 1879 | 1,30,109 | 1,70,695 |
| 1888 | 11,48644 | 36,38,694 |
| 1897 | 28,85,976 | 1,3390.729 |
| 1906 | 4884 | 2,84,76155 |
| 1915 | 72,96,901 | 5,25,53900 |

EVERY MAN'S DUTY

is to provide for those dependent upon him and for his own old age. When a man's income is reduced owing to any cause there is all the more reason for his making provision for those dependent upon him and this can be effected in no way better than by a Life Assurance Policy with the "Oriental"

## *SPECIAL FEATURES.*

Absolute Security—Low Rates—Liberal Conditions.
Forty years continuously increasing prosperity.
Ninety per cent of the entire Profits, after providing for the Reserve Fund divided among the Policyholders every 3 years.
Indian Lives are accepted at the same rates as Europeans.
Loans granted to policyholders at reasonable rates.
Prompt Payment of Claims.

***Influential and active agents wanted Terms Liberal***

Full particulars, prospectus and proposal forms on application to:—

R. Paterson Brown
Manager
Bombay.

or

*A. C. Lal,*
Branch Secratary
*C. P. Berar & Khandesh*
Nagpur.

N. N. 22


हें पत्र आकोला येथें कैलासवासी खंडेराव बाळाजी फडके यांच्या वऱ्हाडसमाचार छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं सदाशिवाश्रमांत छापून प्रसिद्ध केलें.

## नोटीस

**नोटीस कलम ११ एक्ट ८ सन १८९० प्रमाणें.**

किर. दिवाणी मुकद्दमा नंबर ९८ सन १९१६ इ.

विद्यमान डिस्ट्रीक्ट जज्ज साहेब बहादुर यांचे कोर्ट
मुक्काम आकोला

नांव बापुजी
बापाचें नांव राघोजी
जात कुणबी राहणार बेलूरा
तहसील खांमगांव जिल्हा बुलडाणा
च्या अल्पवयी यमुनी मर्द पांडुरंग
उमर वर्षे ४

राहणार बेलूरा ता खामगांव तहसिलीचे (२) शरीर व इस्टेट रक्षणासाठीं पालन कर्ता (१) नेमलाजाण्या विषयींच्या अर्जा संबंधीं—

सर्वत्र लोकांस कळविण्यात येते कीं सदर्हू अर्जदारानें सदर्हू अल्पवयीचें शरीर व इस्टेट रक्षणासाठीं पालन कर्ता नेमला जाण्या विषयीं अर्ज केल्यावरून सदर्हु अर्जाची सुनावणी व चौकशीची तारीख २३ माहे सप्टेंबर सन १९१६ इ. रोजीं नेमिली आहे. त्यावरून अशी नोटीस देण्यांत येत आहे कीं, सदर्हू अर्जदाराच्या अर्जा बद्दल जर कोणास कांहीं तक्रार असेल तर त्यास जातीनें किंवा कोर्टानें अधिकार दिलेल्या ज्या वकीलास योग्य माहिती दिली असेल व अर्जासंबंधीं सर्व मुद्याच्या सवालांचा जबाब देण्यास जो समर्थ असेल किंवा अशा सर्व सवालांचा जबाब देऊं शकेल असा कोणी दुसरा असामी ज्याच्या बरोबर असेल अशा प्लीडराच्या मार्फत या कोर्टांत हजर झाले पाहिजे; आणि त्यास असें ही नोटीस देण्यांत येत आहे कीं सदरी लिहिलेल्या दिवशीं तो हाजर न झाल्यास, त्याच्या परोक्ष अर्जाची चौकशी होऊन ठराव केला जाईल. आज तारीख १० माहे आगष्ट सन १९१६ इ. रोजीं आमच्या सहीनिशीं व कोर्टाच्या शिक्या निशीं दिली,

V. M. Kelker
डि० जज्ज
पश्चिम वऱ्हाड
नो. नं. २९६ आकोला

## जाहिरात

सर्वत्र लोकांस जाहीर करण्यांत येते कीं, माझ्या बायकोची सख्खी बहीण नामें तुळशी मर्द किसन सुतार वय अजमासें १६।१७ वर्षे ही माझ्याजवळ तिचे आईबाप वारल्यामुळें आज १० वर्षे आहे. तिचा नवरा किसन वा दावल सुतार हा परागंदा झाला असून त्या गोष्टीला १० वर्षे झालीं. पुष्कळ तपास केला त्याचा पत्ता कोठेंच लागत नाहीं. जर कोणी त्याचा शोध लावून देईल तर मी त्याला १० रुपये बक्षीस देईन. तो कोठें गेला ते सांगण्यासारखा कोणीस आप्तमित्र मिळत नाहीं; व आज इतक्या वर्षांत त्याची कोणाल वार्ताही नाहीं म्हणून तो बहुतेक मरण पवला असावा असा निश्चय ठरतो. तथापि कोठें कांहीं मागमूस लागल्यास मी तुळशीला तिच्यानवऱ्याच्या घरीं पोचती करण्यास तयार आहे. दोन महिन्याच्या मुदतींत जर कांहीं पत्ता लागणार नाहीं तर तो मृत समजून मी तुळशीचा योग्य स्थळीं पाट लावून देईन. आणि ही गोष्ट करण्यापूर्वीं जातीच्या पंचाचीही रिवाजा प्रमाणें मंजूरात घेईन. सरकार दरबारीं जाहिर होण्यासाठीं आणि अखेरचा उपाय म्हणून ही जाहीर खबर दिली आहे. आतां दोन महिने संपल्यानंतर तुळशीला दुनियेदारीला लावण्याचा हा एकच उपाय राहिला आहे, आणि मी तो त्या मुदतीनंतर अंमलांत आणीन. ता. १४ आगष्ट १९१६ इसवी

सही
रामचंद्र सदाशिव सुतार राहणार
साराकिनी ता. आकोला द. खुद
नो० नं० २९७

## नोटीस

नोटीस बेशमी नाना वा। शिवसींग पा. रजपूत राहणार मौजे टाकरखेड प्रगणे चांदूर ता. मलकापूर जि. बुलडाणा

यांसः—

खालीं सही करणार यांजकडून नोटिस देण्यांत येते कीं, तुम्ही मजपासून कर्जरोखा रुपये १००० हजारचा मिती आषाढ शुद्ध पौर्णिमा इंग्रजी ता. १५ माहे ७ सन १९१६ इसवी रोजीं तुम्ही मला ३०० रुपये देऊन कर्जरोखा भूलथाप देऊन मजजवळून लिहून घेतला. व ७०० रुपये आपण मला दिले नाहीं. व हे रुपये मजला ८ दिवसाचे आंत आणून द्यावे. व माझी पावती घेऊन जावी असें न केल्यास मी तुमचेवर दगलबाजीबद्दल फौजदारींत फिर्याद करून वरील रक्कम रु. ७०० भरून घेतली जाईल. आणि प्रॉमेसरी नोट तुम्ही मजजवळून रुपये १००० हजाराचा लिहून घेतला. मित्ती श्रावण शुद्ध ७ इंग्रजी ता. ६ माहे ८ सन १९१६ इसवी रोजीं लिहून घेतला. त्यापैकीं रुपये ९५ पंचाण्णव मजला बाळाभाऊ समक्ष दिले. आणि बाकी रुपये ९०५ प्रॉमेसरी नोटी पैकीं घेणें तुमचेकडून घेणें राहिले आहे. असे दोन्ही दस्तैवज मिळून तुमचेजवळून १६०५ रुपये घेणें राहिले आहे. सदर्हू रक्कम आठ दिवसाचे आंत देऊन माझी पावती घेऊन जावी. तसें न केल्यास कोर्ट खर्च व या नोटिशीचा खर्च तुम्हास द्यावा लागेल. कळावें. ता. १५।८ १९१६ इसवी

सही
नारायणदास कनीराम मारवाडी रा.
टाकरखेड दस्तुर खुद
नो० नं० २९८

## भाषांतर नोटीस.

सर्व लोकांस आणि साधारणपणें कवलखेडा जहागीर येथील रहिवाशांस आणि खास खाजा इमदाद अली खान साहेब जहागीरीचे हिस्सेदार यांस या नोटिशीच्याद्वारें कळविण्यांत येते कीं ही नोटिस देणारी गफुरुन्नीसा बेगम भ्रतार मयत खाजा हसन अली खान जहागीरदार कवलखेडा प्रगणे कुरणखेडा ता. व जि. आकोला इलाखा वऱ्हाड मध्य प्रांत यांच्या आणि जहागीरीचे हिस्सेदार खाजा इमदाद अलीखा यांच्या दरम्यान आकोल्याचे सिवील जज्ज यांचे कोर्टांत नंबर ६९ सन १८९२ इसवीचा दिवाणी मुकदमा चालवून अखेर पक्षकाराच्या दरम्यान सुल्ला होऊन कोर्टातून ही डिक्री मिळाली कीं सर्व जहागिरीवर मी नोटिस देणारीचा ताबा असून कलम (८) अन्वयें मला अधिकार देण्यांत आला आहे कीं जहागीर मजकूरचा एक चतुर्थांश हिस्सा मी माझे हयाती नंतर पाहिजे त्यास करून देऊं शकेन. सदर्हू अधिकार बरहुकूम मी माझ्या जहागीरचा एक चतुर्थांश हिस्सा रजिष्टर केलेल्या तारीख १४ मार्च १९०५ इसवीच्या बक्षीसपत्राचेद्वारें आणि रजिष्टरी केलेल्या ता. १९ आगष्ट १९१५ इसवीच्या विक्रीपत्राद्वारें मी आपली नात दिलावरी बेगम उर्फ आहमदी बेगम मीर आहमद अली खान मयत यांची कन्या राहणार हैद्राबाद दाक्षिण इच्या नांवे करून देऊन तिच्या ताब्यांत दिला आहे. सर्व लोकांस जाहीर होण्याकरितां ही नोटिस वर्तमानपत्रांत प्रसिद्ध केली आहे. या नोटिशीची एकप्रत सिवीलजज्ज साहेब आकोला याजकडे दिवाणी मुकदमा फायलनंबर ६९ सन १८९२ इसवी यांत दाखल करण्याकरितां आणि खाजा इमदाद अली साहेब जहागीरीचे हिस्सेदार राहणार दाक्षिण हैद्राबाद कोटलागबरजहां दुधखाना आल्लारखी बेगम आणि सदर्हू कवलखेडा जहागीर येथें पाटील कुळकर्णी याजकडे माहिती करितां पाठविली आहे. फक्त ता १०।८।१६ दस्तूर सांव देवजी मक्तेदार सैदापूर उर्फ सामनूर ता. मक्तल जि. महबूब नगर इलाखा निजामसरकार

सही
मीर नूसरतअली मुखत्यार आम गफुरुन्नीसा बेगम साहेबा कवलखेडा
नो० नं० २९९

## नोटीस

नोटिस बेशमी गजाबाई मर्द मानाजी धनगर राहणार शिलोडा

इजला:—

खालीं सही करणार यांजकडून नोटिस देण्यांत येते कीं, तुझा नवरा मयत मानाजी मी व आमचा बाप भोनाजी यांचेमध्यें वाटणी झाल्या नंतर भोनाजी व मानाजी एकत्रांत राहूं लागले. त्यामुळें मानाजी मयत झाल्या नंतर त्यांची समाईक सर्व स्थावर जंगम जिनगी भोनाजीचे मालकीची असून तुझा फक्त खाण्यापिण्याचा हक्क आहे. तूं मला दिलेल्या नोटिशींतील माल मी घेतला नाहीं व मी त्याबद्दल जबाबदार नाहीं, नोटिशींतील माल मानाजी मयत झाल्यावर अस्तित्वात असल्यास त्यावर तुझी मालकी नाहीं. माझा बाप भोनाजी हा सर्व जिनगी संबंधानें तुझ्यावर लवकरच फिर्याद दाखल करणार आहे. सहीं ता. १३-८-१६

सही
सोनाजी वा भोनाजी धनगर नि. [illegible]
नो० नं० ३००

## नोटीस.

रा. रा. सिताराम मारोती पाटील मौजे धरणगांव प्रगणे व ता० मलका[illegible] जि० बुलडाणा यांसः—

नोटीस देणार बिंजराज सावतराम [illegible] दुकान कजबे मलकापूर प्रमणे व त[illegible] मजकुर जि० बुलडाणा याजकडून नोटि[illegible] देण्यांत येते कीं, वि० सबजज्ज साहेब [illegible] मलकापूर यांचे फायलावरील दि० मुं० [illegible] ७२ सन १९१५ यांतील वादी मथु[illegible]दास मन्नालाल मालक मथुरादास धनसु[illegible]दास मारवाडी हे असून यांतील प्र० [illegible] इसम नं. १ ते ७ असून त्यांत प्र० [illegible] नं० ६ तुम्ही आम्हां व प्रतीवादी नं० [illegible] आम्ही आहों. सदर्हू वर लिहिलेले मु[illegible]म्याचा निकाल ता० ७-१२-१९१५ रोजीं झाला. त्यांत सहा माहिन्याचे [illegible] तीचे रुपये भरण्याचे होते ते रुपये मु[illegible] प्र० आम्ही कोर्टांत सालीम हुकूमनाम[illegible] रुपये २६०८ भरले व पावती अ[illegible] जवळ आहे. ते रुपये वादी मथुर[illegible] मन्नालाल अद्याप घेऊन गेले नाहीं [illegible] कळतें. आम्ही ऐकतो कीं, वादी व [illegible] एक मिलाफी होऊन आमचे व्याजाचे नुकसान व्हावे म्हणून तुम्ही रुपये [illegible] सांत दिलें आहेत खरें किंवा खोटें माहित नाहीं. परंतु वादी अद्याप घेऊन गेला नाहीं म्हणून ही तुम्हास नोटीस दिली आहे कीं, आम्ही [illegible] गहाणदार असून आमचे ताबेगहाण व हल्लीं आमचे ताब्यांत दाव्यांतील आहेत म्हणून रुपये भरण्याचा अ[illegible] हक्क आहे. व त्याप्रमाणें रुपये भरून दिले आहेत. करितां या नो[illegible] तुम्हास कळविण्यांत येते कीं ही [illegible] तुम्हास पावल्या दिवसा पासून आठ दि[illegible] आंत तुम्ही वादी मथुरादास मन्नालाल[illegible] रुपये दिले असल्यास ते तुम्ही [illegible] परत घेऊन जावें. जर वादी मथु[illegible] मन्नालाल तुमचे रुपये परत देणार तर आम्ही तुम्हास रुपये देण्यास तयार [illegible] आमच्या पासून रुपये घेऊन आम्हास [illegible] द्यावी. आम्ही रुपये कोर्टांत भरलेच ते आम्ही रुपये कोर्टांत अर्ज करून रुपये परत घेऊं जर तुम्ही असें [illegible] तर आम्ही किंवा प्रतीवादी नं १ [illegible] हे कोणतेही रितीनें व्याज अगर नुकसानीस कोणतेही प्रकारचे ज[illegible] राहणार नाहींत. ही नोटीस दिली ता० १६ माहे आगष्ट सन १९[illegible]

दस्तुर बळवंत गणेश सोना[illegible]
म[illegible]

सही ( मारवाडींत [illegible]
बिंजराज सावतराम द[illegible]
नो. नं. ३०१

Regd-No. N 150

# वऱ्हाडसमाचार.

Berar-Samachar.

वर्ष ५० ] आकोला—सोमवार तारीख २८ माहे आगष्ट सन १९१६ इ० [ अंक ३४

# हिंदुस्थान सरकार.

—:*:-:*:-:*:—

## सन १९१६-१७ चे कनव्हर्शन लोन

## [ मोबदल्याचें कर्ज. ]

### पोस्ट आफिस विभाग.

**ह्या कर्जाची फेड भर किंमतीनें सन १९३० नंतर आणि सन १९३७ चे आंत करण्यांत येईल.**

**व्याज दरसाल दरशेंकडा ४ टक्के दरानें दर सहा महिन्यांनीं ह्मणजे एप्रिलचे व ऑक्टोबरचे १ ल्या तारखेस देण्यांत येईल.**

**शेंकडा ३ अगर ३॥ टक्के दरानें पूर्वीं दिलेल्या कर्जाच्या रोख्यांच्या मोबदला ह्या नवीन कर्जाचे रोखे घेण्याचा अर्जदारास हक्क राहील.**

अर्ज द्यावयाचे ते १०० रुपयांसाठीं अगर शेंभरांनीं बरोबर भाग तुटेल अशा ५००० रुपयांहून जास्त नाहीं इतक्या कोणत्याही रकमेसाठीं द्यावेत, व ते तारीख १४ जून सन १९१६ ते ता. २९ सप्टेंबर सन १९१६ पर्यंत ( ह्या दोन्ही तारखा धरून ) कोणत्याही दिवशीं सेव्हिंग्ज बँकेचें काम करणाऱ्या कोणत्याही पोस्ट आफिसांत घेण्यांत येतील. अर्ज कोणाही मनुष्यास करतां येतो, मग तो सेव्हिंग्ज बँकेचा ठेवीदार असो वा नसो.

जितक्या कर्जाकरितां अर्ज असेल तितकी पुरी रकम अर्जाबरोबर अमानत ठेविली पाहिजे, आणि त्या रकमेचा अर्जदारास कर्जरोखा देण्यांत येईल. अमानत रकम ठेवणें ती रोख ठेवावी अगर सेव्हिंग्ज बँकेमध्यें असलेल्या आपल्या खात्यांतून लागेल ती रकम काढून तिची पूर्ण किंवा अंशतः भरपाई करावी.

पोस्ट आफिस मार्फत दिलेल्या नवीन कर्जाचा कर्जरोखा जर पोस्ट आफिस अधिकाऱ्यांचें ताब्यांत ठेवला असला तर त्या रोख्यावर मिळणाऱ्या व्याजावर प्राप्तीचा कर आकारण्यांत येणार नाहीं.

नवीन कर्ज जितक्या रकमेचें देऊं केलें असेल त्या रकमे इतक्याच हिंदुस्थान सरकारच्या दर शेकडा ३॥ टक्के व्याजाच्या रुपी सिक्यूरिटीज़ त्यांच्या दर्शनी किंमतीच्या शेंकडा ९६ या दरानें आणि दरशेंकडा ३ टक्के व्याजाच्या रुपी सिक्यूरिटीज़ त्यांच्या दर्शनी किंमतीच्या शेकडा ८२॥ या दरानें देऊन त्यांचे मोबदला हें नवीन कर्ज देण्याचा हक्क अर्जदारांस मिळेल व तो हक्क दुसऱ्या कोणास बेचन करून देतां येईल.

मोबदला करण्याचा हक्क धारण करणाऱ्या इसमांचे मोबदला करण्यासाठीं अर्ज ता. १६ आक्टोबर सन १९१६ पासून ता १६ जानेवारी सन १९१७ पर्यंत ( दोन्ही तारखा धरून ) घेण्यांत येतील. मोबदला करण्यांत येणाऱ्या सिक्युरिटींवर, त्या मोबदला करण्याचे वेळीं, ता. ३० सप्टेंबर सन १९१६ पर्यंत व्याज देण्यांत येईल आणि त्यांच्या ऐवजीं दिलेल्या नवीन कर्जावर ता. १ आक्टोबर सन १९१६ पासून व्याज सुरू होईल.

या संबंधानें तपशीलवार माहितीच्या जाहिरातीच्या प्रती आणि अर्जाचे नमुने सेव्हिंग्ज बँकेचें काम करणाऱ्या कोणत्याही पोस्ट आफिसांत मिळतील.

इच्छा असल्यास सोबत जोडलेला नमुना उपयोगांत आणावा.

---

**हिंदुस्थान सरकारचें सन १९१६-१७ चे शेंकडा ४ टक्के व्याजाचें कन्व्हर्शन लोन ( मोबदल्याचे कर्ज ) साठीं पोस्ट आफिसमार्फत करावयाच्या अर्जाचा नमुना.**

(सेव्हिंग्ज बँकेचें काम करणाऱ्या कोणत्याही पोस्ट आफिसांत ता. २९ सप्टेंबर सन १९१६ पावेतों हा अर्ज दाखल करावा. वाटल्यास हा नमुना कापून काढून उपयोगांत आणावा.)

मी ———————— अक्षर वाचतां येईल असें स्वच्छ लिहावें.

या अन्वयें अर्ज करतो कीं ता. ८ जून सन १९१६ चे गॅझिट ऑफ इंडिया, एक्स्ट्राआर्डिनरी, मध्यें जाहिर करण्यांत आलेल्या सन १९१६-१७ च्या शेंकडा ४ टक्के व्याजाच्या कन्व्हर्शन लोनपैकीं ———— रुपये कर्ज मजपासून घ्यावें.

ज्या रकमेचें कर्ज देण्याकरितां मी अर्ज केला आहे त्या रकमेच्या भरपाईसाठीं

(१) मी या सोबत { रोख रुपये ———— / चेकनें रुपये ———— } सादर करित आहें.

(२) या सोबत मी आपलें पासबुक पाठवीत आहे आणि सेव्हिंग्ज बँकमध्यें माझे खातीं जमा असलेल्या रकमेंतून रुपये ———— काढन घेण्याचा मी अधिकार देत आहे.

[रोख रकम किती दिली, चेकनें किती व सेव्हिंग्ज बँकमध्यें असलेल्या ठेवींतून काढून कांहीं रकम दिली असल्यास तो किती त्या रकमा त्याकरितां रिकाम्या सोडलेल्या जागेंत वेगवेगळ्या नमुद कराव्यात. जो मजकूर अनवश्यक असेल तो खोडून टाकावा.]

————

एकूण रुपये........

(अ) माझी विंनती आहे कीं कर्जाचा जो हिस्सा मजपासून घेण्याचें मंजूर होईल त्याबद्दलचा कर्जरोखा अकौंटंट जनरल पोस्ट्स अँड टेलेग्राफ्स यांचे जवळ माझेतर्फे ठेवावा आणि त्याबद्दल मिळणारें व्याज

(१) ———— पोस्ट आफिसमध्यें माझे नांवानें सुरू असलेलें सेव्हिंग्ज बँक खातें नंबर ———— यांत जमा करावें. ( अर्जदाराचें खातें सेव्हिंग्ज बँकमध्यें आधीचेंच नसेल तर पारिग्राफ (१) खोडून टाकावा )

(२) ———— पोस्ट आफिसांत माझे नांवानें सेव्हिंग्ज बँकेचें खातें सुरू करून त्यांत जमा करावें.

(ब) माझी अशी विनंति आहे कीं कर्जाचा जो हिस्सा मजपासून घेण्याचें मंजूर होईल त्याबद्दल खालीं लिहिलेल्या प्रकारच्या प्रामिसरी नोटा मला द्याव्या आणि व्याज ———— ———— ट्रेझरीमधून मला मिळावें असा त्यांवर शेरा लिहावा.

[(अ) किंवा (ब) ह्या दोहोंतून एक पारिग्राफ भरून दुसरा खोडून टाकावा.]

मी अशी विनंति करतो कीं सन १९१६-१७ चे शेंकडा ४ टक्के दराचे कन्व्हर्शन लोनपैकीं ज्या रकमेचें कर्ज देण्यासाठीं मी अर्ज केला आहे त्या रकमेइतक्या शेंकडा ३॥ अगर ३ टक्के दराच्या हिंदुस्थान सरकारच्या रुपी सिक्यूरिटी मोबदला करण्याचा अधिकार देणारें वारंटही मला द्यावें.

नांव ————————

पत्ता ————————

तारीख ————

पोस्ट आफिसांत दाखल केल्याची तारीख ———— ( ही तारीख ज्या पोस्ट मास्तरानें अर्ज घेतला त्यानें नमुद करावयाची )

रजिस्टर नंबर ———— ( हा नंबर हेड पोस्ट मास्तरानें घालावयाचा

नो. नं. २४१ हेड आफिसचा छाप.

'वऱ्हाडसमाचार प्रेस' आकोला.

## वर्गणीचे दर

आकोल्यांतील लोकांस........१ रुपया
बाहेरगांवीं द. हां. ........ २ रुपये
वर्गणी आगाऊच घेण्याची वहिवाट आहे.

## नोटीशीचे दर

दर ओळीस दीड आणा.
हेडिंगच्या दोन ओळी धरल्या जातील.
नोटीस सुवाच्य असली पाहिजे.
सूचनाः— गुरुवारच्या आंत येणाऱ्या नोटीसा त्याच आठवड्यांत घेतल्या जातील. यापुढें येणाऱ्या नोटीसास स्पेशल चार्ज पडेल.

# नोटीस.

हिंदुस्थानच्या बादशहाच्या फौजेमध्यें चाकरी करण्याचे नियम.

## ब्राम्हण लोकांकरितां

सरकारच्या मनांतून एक ब्राह्मण लोकांची डबल कंपनी ( १ जमादार, ४ नाईक आणि २०० शिपाई ) ११६ मराठा इन्फन्ट्री करितां तयार करावयाची आहे. या पैकीं निम्मे लोक मध्यप्रांत आणि वऱ्हाड व बाकीचे निम्मे इलाख्यातून भरती करावयाचे आहेत.

वऱ्हाडांतील राहिवाशांनीं नावें नोंदण्याचे अर्ज जिल्हा अधिकारी ह्मणजे डिपुटी कामिशनर यांजकडे करावेत, अगर इलिचपूर, खामगांव व वाशीम सब डिव्हिजन मधील लोकांनीं आपआपल्या सबडिव्हिजनल आफीसरकडे करावेत.

रिक्रूटनीं लढाई चालू असेपर्यंत अगर इच्छा असल्यास पुढें ही नोकरींत राहण्याकरितां नांवें नोंदावीत. ते शिकून पूर्ण तयार झाल्याशिवाय त्यांना लढाईवर पाठविलें जाणार नाहीं. ज्या लोकांनीं लढाई चालू असतांना लष्करी खात्यांत नोकरी केली असेल त्या लोकांना पुढें सरकारी नोकरींत शिरते वेळेस जो काळ लष्करी खात्यांत गेला असेल तो काळ वयाच्या मुदतींतून वजा करण्याचें सरकारांनीं ठरविलें आहे.

रिक्रूटची उंची कमीतकमी ५ फुट ४ इंच, छाती ३१ इंच ( आवस्तृत ) आणि ३३ इंच ( विस्तृत ) असावी. वय १६ आणि २६ या दरम्यान असावें व त्यास कोणतेही शारीरिक व्यंग नसावें व तो सशक्त, बळकट व बुद्धीवान असावा.

शिपायास ११ रु. पगार मिळून महागाई भत्ता धान्याच्या भावाप्रमाणें मिळतो. हल्लीं हा भत्ता दक्षिणेंत ५ रु ८ आ. आहे. ह्मणजे शिपायास एकंदर वेतन १६ रु. ८ आ. मिळते या शिवाय दर वर्षी कपड्याकारितां व बुटाकरितां १२ रु. मिळून शिवाय नोकरींत शिरते वेळेस ६० रु. किंमतीपर्यंत लढाईचा सरंजाम मिळतो. ११६ मराठा लोकांची पलटण हल्लीं वायव्य सरहद्दीवर बन्नु येथें आहे.

नो नं २४२

# चांदीचींभांडीं

नाशिक येथें तयार केलेलीं सर्व प्रकारचीं सुबक व वाटदार भांडीं आमचेकडे विक्रीस तयार असतात भाव माफक व्ही. पी. नें अगर रोखीनें पाठवू. मालाचे खरेपणाबद्दल ग्यारंटी देऊ

पुरुषोत्तम रामचंद्र वैशंपायन
रविवार पेठ नाशिक सिटी.
नो. नं. ४

## Wanted.

Wanted an under graduate for the post of Head Clerk. The post is pensionable... carrying a salary of Rs. 40-2- 50 with future prospects in the service of the Local Bodies.

(Sd) K. P. Bhat,
President,
Municipal Committee,
Dated 5-8-16 Burhanpur.
N, N.288

## अमेरिकन सोन्याचे कधींच काळे न पडणारे दागिने,

चंद्रहार किं रु. ३।४ गोठ जोडीची किं रु. १॥ २, २॥. पाटल्या जोडीची किं. रु. १॥, २, २॥. सरी किं. रु. ३, ४, ५. वज्रटीका रेशमांत गुंफलेली किं. रु. ३, ४. ठुशी रेशमांत गुंफलेली किं. रु. ५, ६. नथ उत्तम मोत्यांनीं बांधलेली किं. रु. ३, ४, ५ शिंप्याचें मोतीं लहान मोठें वाटेल तसें. सरीची किं. रु. १॥, २, ३, ४. अंगठी किं. रु. १, १॥. सल्ले अष्टपैलु जोडीची किं. रु. १॥. बांगड्या जोडीची किं रु. १॥,२,२॥. कोणत्याही प्रकारचा मापाचा दागिना मिळेल.

पत्ताः— **मगनलाल के. आणि कंपनी,**
गिरगांव मुंबई.

नो. नं. २२४

## अस्सल अंगुरी.

# हिंग

रु. ४ शेर, पवित्र केशर रु. १८३ आणि १८७ तो. खालिस कस्तुरी रु२५ तो. शुद्ध शिलाजीत ८९ तो. सुर्मा ममीरा रु. ३ तो. स्याहजीरा रु. २ शेर, मुरब्बा बादाम रु. १ शेर

**काश्मीर स्टोर्स श्रीनगर नं० ५**

## जाहिरात

मुंबई ब्यांकेची सेव्हिंग ब्यांक.

ह्या बँकेंत खालीं दिलेल्या शर्तीवर ठेवी ठेवितां येतात.

कोणत्याही वर्षाचे १ ले जानेवारी आणि ३१ दिसेंबर याच्या दरम्यान दोन हजार रुपये पर्यंत पैसा ठेविला जाईल.

ठेवी दोन अथवा अधिक इसमांच्या नावावर ठेवतां येतील आणि तो पैसा यापैकीं एकास अथवा जास्त इसमांस अगर यापैकीं मयताचे मागें राहील त्यांस काढतां येईल.

व्याज दर साल दर शेकडा तीन रुपयाप्रमाणें दिलें जाईल. व्याजाची आकारणी प्रत्येक महिन्याची जी कनिष्ठ शिल्लक असेल तिजवर केली जाईल. मात्र दहा हजारावरील शिल्लक रकमेस व्याज नाहीं. नियमांच्या प्रती बँकेंत अर्ज केला असतां मिळतील.

मुंबई ब्यांक आकोला ९।९।०९ } Lyon Scott एजंट
नो. नं १

## हिंदुस्थानावर अरिष्ट.

हिंदुस्थानांतील राहिवाशांच्या पाठीस ज्वर व हिवताप यांचें अरिष्ट सदोदित लागलें आहे. पण त्याचा प्रतिकार करण्यास बाटलीवाला यांचें हिवतापाचें औषध व गोळ्या ह्या रामबाण आहेत. ताप किंवा शीतज्वर येणारसें वाटतांच हें औषध घ्यावें. किं. १ रु.

**बाटलीवाला यांच्या निस्तेज लोकांसाठीं शक्तिकारक गोळ्या**

हें औषध घेतल्यानें भागवटा, मेंदूचे श्रम, पौरुषनाश, अशक्तता व क्षयरोगाचें मान त्याप्रमाणें अजीर्ण इ. इ. विकार ताबडतोब दूर होतात किं रु. १८८.

**बाटलीवाला यांचें दंतमंजन.**

हें दंतमंजन मायफळाशीं कांहीं इंग्रजी औषधांचा वैद्यकीय रीतीनें मिलाफ करून बनविलें आहे. किं. ८४

**बाटलीवाल्याचें गजकर्णावर मलम.**

यानें गजकर्ण, कुजटी, खरूज यांचा विकार एका दिवसात नाहींसा होतो. किं. ८४

हीं औषधें सर्व औषधी विकणाऱ्या दुकानावर व डॉ. एच. एल. बाटलीवाला जे. पी. मु. वरली लेबोरेटरी दादर, मुंबई यांजकडे मिळतात.

DR. H. L. Batliwala. Sons & Co Ltd
N. N. 3 Dadar Bombay.

## श्री दत्तात्रय अलंकारालय कोल्हापूर

आमचे कारखान्यांत स्वतःचे देखरेखेखालीं, मुद्दाम तयार केलेले उत्तम सोन्याचे सुबक दागिने— मंगळसुत्र साज, ठुशा-जोड, गुलाबाचीं फुलें, बिल्वदळी टीका, मुदा अग्रफुलें साखीं व वाकन्याचीं वगैरे सर्व जातीचा माल—तसेच चांदीच्या मासोळ्या, चाळ, उपकर्णी, तारें, वाट्या, गडवे, इत्यादि माफक दरानें मिळतील आह्मी सर्व सोनें, न्याशनलचें शंभर नंबरी वापरीत असतों. व डागाचा उपयोगही नियमितच केलेला असतो. यामुळें जिन्नस पांढरे पडण्याची अगर वाईट निघण्याची भीति बाळगण्याचें मुळींच कारण नाहीं. आमचे जिनसाची लाख काढून वजन तोलून पाहावें. गिऱ्हाइकाचीं खात्री करून देण्यास आह्मी तयार आहों. व्यापाऱ्यास कमिशन मिळेल. ऑर्डरी प्रमाणें माल तयार करून देऊं, चांदी सोन्याचे खरेपणाबद्दल आह्मी जबाबदार आहों. माल रोखीनें अगर व्ही. पी. नें पाठविला जातो ऑर्डरी बरोबर एक रुपया आगाऊ पाठविला पाहिजे.

श्रीदत्तात्रय अलंकारालय—कोल्हापूर
नो नं ६

## सावंतवाडी येथील.

**दशावतारी गंजिफा**— उत्तम पान व टिकाऊ पक्का रंग किंमत ।॥।, १, १।, १॥, २, २॥ ते ५ रु. प. **बुद्धीबळ जोड लांकडी**— किंमत ।॥। १, १॥, २ ते ४ रु. प **सोंगट्या जोड**— किंमत ।, ॥, ।॥।, १, १॥, रु. प. **खडावा जोड**— शिसवी व शिवणीचे वगैरे सामान वाऊक व किरकोळ आमचेकडे विकत मिळेल. मोठा क्या. मा. फुकट

**डी. आर. अळवणी, स्टेट सावंतवाडी.**
नो. नं. २७२

## विक्रीस तयार

आमचे छापखान्यांत दरखास्तीचे, वकील पत्राचे, परत भरण्याचे, लिस्टफार्म पर्च्याचे व नकलेकारितां करावयाच्या अर्जाचे नमुने छापून तयार आहेत. ते आमचे छापखान्यांत कोणत्याही वेळीं विकत मिळतील.

वऱ्हाडसमाचार कार्यालय, सदाशिवाश्रम, आकोला } मॅनेजर

## खात्रीचा तयार केलेला.

### ताजा अनंत मूळ.

नंबर १ ला ३॥ रु. शेर नं. २ रा २॥ रु. शेर ८ दिवसाची पूर्व मागणी केल्यास तांबूस मुळ्यांचा ताजा कुट्टन अच्छेराच्या वजनानें डब्यांत भरून पाठविला जाईल. गूण व घेण्याची रीत डब्यावर

पत्ता
रामचंद्र सदाशिव मार्कंडे उद्धवजी
मोहला नागपूर शहर सर्कल नं ६

## नोटीस

रा. रा. नारायण माधव वाणी कुलमुखत्यार मु० खंडाळ यांसः—

खालीं सही करणार हरबाजी बळीराम इनारदार पाटील मौजे खंडळ तालुके दारव्हा जि० येवतमाळ यांजकडून जाहीर नोटीस देण्यांत येते कीं आजपर्यंत तुह्मी आमचे कडून दिवाणी, मुल्की, फौजदारी वगैरे कामें चालविण्याकरितां कुलमुखत्यार असतां तारीख २९-१०-१३ इसवी पासून तुह्मी आमचेविरुद्ध पक्षाकडे ह्मणजे दर्याजी बळीराम पाटील यांचेकडे मुखत्यार राहिला. त्या तारखेपासून आमचेकडील मुखत्यार पत्र रद्द समजावे. दुसरे दिवाणी मुकदमा नंबर २१४ सन १९१६ मध्यें काम केलें तें दर्याजी पाटील यांचेकडे असतांना रुपये २०० ठरावानें केलें ते रुपये तुह्मांस तेव्हांच नगदी दिले आतां त्या मुकदम्या बद्दल आमचेकडे तुमचे कोंणते प्रकारचे देणें राहिलें नाहीं. तुमचेकडे सन १९१५ इसवी सालचा शेताचा ठेका येणें आहे, तरी नोटीस पावले पासून ८ दिवसांचे आंत रुपये आमचे जवळ आणून द्यावे. दुसरे खाते बाकीचा हिशेब पाहून त्याचाही निकाल करावा. नाहीं तर रिती प्रमाणें दावा करून एकंदर रु. वसूल करण्यांत येईल.

सही.

हरबाजी बळीरामजी पाटील द. खु.

नो० नं० ३११

## नोटीस

पुंजी मर्द नारायणजी जात साळी रा० सुर्जी प्रगणे अंजनगांव तालुका दर्यापूर जि० उमरावती. यांसः—

खालीं सही करणार यांजकडून नोटीस देण्यांत येते कीं तुजला माझा साक्षात भाऊ नामे बाळकृष्ण लक्ष्मण दंडवते यांनीं तुला ठेविलें होते. तूं व माझा भाऊ असे सर्व आपण एका ठिकाणींच होतो परंतु कांहीं प्रकरणामुळें त्यांनीं ह्मणजे माझे भावानीं समाइकेतील इस्टेटी मधून घेतलेल्या घरामध्यें ते राहण्यास दोन तीन महिन्यापासून गेले व त्याच घरांत एका एकी कालऱ्यानें ता० १२-७-१६ रोजीं मरण पावले. त्यांचे जवळ असलेला जंगम माल दहा पुतळ्याची माळ, वज्रटीक, तांदुळपोत, नथ, मुदी वगैरे सोन्याचें सामान; तोड्याचा जोड वगैरे चांदीचा सामान; आणि ज्वारी, ह्मैस, टीन भांडीं कुंडी व कपडेलत्ते वगैरे कर्ज रोखे आणि सेठ रामुलाल याजकडून आणलेली हवाल्याची रक्कम; हा सर्व माल मी माझा त्या घरांतून आणीत असतांना तूं मला अडथळा केला आणि हल्लीं तूं आह्माला बुडविण्याचे इराद्यानें त्या मालाची अफरातफर करून राहिली आहेस व तूं जातीत ही गेली आहेस. सबब तुझा आमचा कांहीं संबंध राहिला नाहीं वरून तुला आमची स्थावर व जंगम विकण्याचा अधिकार नाहीं. गहाण, विक्री वगैरे केल्यास ती रद्द असे सबब आगाऊ नोटीस देऊन कळविले आहे. ता. १७-८-१९१६

ता० क०— सर्व सभ्य गृहस्थांस कळविण्यांत येते कीं जो नोटीसीमध्यें दाखविला आहे तो माल खरेदी अथवा गहाण घेतल्यास जबाबदार घेणारा राहील. सदरील मयत यानवर कोणाचेच देणें नव्हतें. हा साहू या नात्यानें होता.

सही

श्रीकृष्ण लक्ष्मण दंडवते राहणार सुर्जी प्रं० अंजनगांव द. खु.

नो. नं. ३१२

## नोटीस

सैयदचांद वा॥ सैयदहातम चुडीवाला रा. बेलखेडा ता० अकोट

यांसः—

खालीं सही करणार इजकडून नोटिस देण्यांत येते कीं, तुह्मी माझे लग्नाचे नवरे आहां. आज तीन वर्षापासून माझा कांहीं एक कसूर नसतां टाकून दिले. मजला घेऊन जाण्या कारितां मी दोन तीन निरोप पाठविले. तरी मजला घेऊन गेले नाहीं. तीन वर्षांत मजला खाण्याची कर्जदारी कपड्या सुद्धां ३०० तीनशें रुपये झाली. ते ही नोटिस पावल्यापासून आठ दिवसाचे आंत ३०० रुपये देऊन मजला घेऊन जाण्याचे करावे. मी नांदण्यास तयार आहे. या नोटिशीप्रमाणें तुह्मी करणार नाहीं. तर मी दुसरा नवरा करीन, मग तुमचा हक्क कोणतेच प्रकारचा मजवर राहणार नाहीं. ह्मणून या नोटिशीनें कळविले आहे. ता० १९-८-१६

सही

आमिनाबी वा॥ शेखरोषन चुडीवाला नि॥ हातची बांगडी रा. हिवरखेड रुपराव ता. आकोट द.-शेकमहेबूब

नो० नं० ३१३

## जाहीर नोटीस

या जाहीर नोटिशीनें विठू वा॥ यशवंता कुणबी राहणार मौजे थार ता. आकोट पोष्ट भांबेरी यांस व त्याच प्रमाणें सर्वत्र लोकांस खालीं सही करणार यांजकडून कळविण्यांत येते कीं, आह्मी तुमचेवर वि. स्मा. काज कोर्ट आकोला येथें दि. मु. नं. १९३१ सन १९१६ ची रुपये ३०२॥ रुपयाची केली आहे. त्या फिर्यादीचा हुकूमनामा होणें आहे. सदर्हू हुकूमनाम्याची आमलबारीं तुमचे स्थावर जंगम जिनगीवर होऊं नये, ह्मणून सदर्हू तुमची स्थावर जंगम जिनगीची अफरातफर करूं पहात आहां. या साठीं तुह्मास आगाऊ नोटिशीनें कळवितो कीं, तुह्मी आपल्या जिनगीची गैर विल्हेवाट करूं नये. केल्यास ती दगाबाजीनें आह्मास बुडविण्यासाठीं केली असें समजून त्या जिनगीवर कोणतेही तुह्मी करून दिलेला दस्तैवज खोटा समजून त्याचा बोजा आमचे हुकूमनाम्या शिवाय राहणार नाहीं. ही नोटिस दिली सही मु. आकोला ता ८-८-१९१६

सही

मारोती वा॥ हरी तर्फे मुखत्यार संपतराव जानराव देशमुख द. खुद

नो० नं० ३१४

वऱ्हाडसमाचार

मिति श्रावण वद्य ३० शके १८३८

## महाराष्ट्रीय ज्ञानकोश.

हा ज्ञानकोश प्रसिद्ध करण्याकरतां एक मंडळ स्थापन झालें आहे आणि ते १९१३ सालच्या इंडियन कंपनीच्या ऑक्टाखालीं तें नोंदले गेलें आहे. ही कंपनी स्थापना करण्याचें श्रेय आणि तिचें चालकत्व उमरावतीच्या डॉ. श्रीधर व्यंकटेश केतकर यांजकडे आहे. या कंपनीचें भांडवल ५०००० रुपये आहे आणि या भांडवलाचें १०० रुपयांचा एक हिस्सा याप्रमाणें ५०० हिस्से आहेत. या हिश्यांपैकीं १३० हिस्से खपले आहेत आणि उरलेले सर्व हिस्से वऱ्हाड व मध्यप्रांत येवढ्यांतच खपतील असा अंदाज आहे. डॉ० केतकर हे वऱ्हाडचेच असल्यामुळें आह्मां वऱ्हाडकरांस त्यांच्याबद्दल मोठा अभिमान वाटतो व यामुळें डॉ० केतकर यांचे सहाध्यायी व मित्र वऱ्हाडांतच पुष्कळ असल्यामुळें शेअर खपविण्यास फारसा त्रास पडेल असें वाटत नाहीं. ज्या थोडक्या लोकांस डॉ. केतकर यांच्या पूर्वचारित्राची ओळख आहे त्यांस डॉ० केतकर हे अंगीकृत कार्य नेटानें पार पाडतील याची बिलकूल शंका नाहीं. प्रस्तुत पत्राच्या संपादकास थोडक्याच दिवसांपूर्वीं नागपूर येथें जाऊन कार्यालयांतील अंतर्व्यवस्था पहाण्याचा सुयोग आला आणि ह्या मंडळाच्या संस्थापकांपैकीं या पत्राचे संपादक असल्यामुळें त्यांस मंडळाच्या हिशोबाच्या वह्या, कागदपत्र हीं सर्व पाहतां आलीं. शेअर होल्डर्सच्या यादीवरून व शेअर करतां पैसे भरून ज्यांनीं अर्ज केला आहे अशांची यादी पाहतां असे दिसते कीं या १३० शेअर्स पैकीं सुमारें १०० नागपुरांतच झाले आहेत. आणि अजून शेअर्स करतां वऱ्हाडमध्यें खटपट करण्यास सुरवात झाली नाहीं. आतां डॉ. केतकर वर्धा, आकोला, उमरावती, कदाचित खामगांव, यवतमाळ. इलिचपूर इत्यादि ठिकाणीं संचार करण्यास लवकरच निघणार आहेत असें कळतें. शेअरची किंमत १०० रुपये आहे हें सांगितलेंच आहे. आणि शेअर घेण्याची पद्धत ह्मटली ह्मणजे अर्जा बरोबर पांच रुपये पाठवून देणें. शेअर्स देतेवेळेस पंचवीस रुपये कंपनी मागेल पुढें एक वर्षभर पैसे द्यावे लागणार नाहींत असें आश्वासन कंपनीनें प्रसिद्ध केलेल्या विनंतिपत्रकांत दिलेलें आहे.

जो ग्रंथ करण्याकरतां कंपनी उभारली आहे त्या ग्रंथाचे वीस भाग होतील आणि प्रत्येक भागास सुपर रॉयल अष्टपत्री पांचशें पृष्ठें प्रमाणें सुमारें १०००० पृष्ठें होतील. चित्रें धरलीं तर पृष्ठें अधिक होतील.

ज्ञानकोशांत काय येईल याची माहिती थोडक्यांत सांगावयाची ह्मटली तरी अनेक पृष्ठें लिहून काढावीं लागतील. सध्यां संपादक एवढेंच सांगतात कीं चाऱ्ही वेद ब्राह्मणें, उपनिषदें, श्रौत सूत्रें, गृह्यसूत्रें रामायण, महाभारत, अठरा पुराणें, उपपुराणें, व्याकरण, ज्योतिष, षड्दर्शनें, तत्वज्ञानावरील अनेक ग्रंथ, अर्थशास्त्र, इतिहास, भूगोलविषयक माहिती, वैद्यक शास्त्र, शिल्पशास्त्रें, रसायण व इतर भौतिक शास्त्रें, प्राणिशास्त्र, वनस्पतिशास्त्र, भूशास्त्र, खानिजशास्त्र, शारीर शास्त्र, गणित, निरनिराळ्या देशांचे, निरनिराळ्या राष्ट्रांचे, संस्थांचे इतिहास, कायदा, परक्या भाषांतील ग्रंथ, निरनिराळे धर्म ग्रंथ इत्यादिकांची समग्र माहिती संक्षेपानें तथापि बरीचशी विस्तृत तऱ्हेनें या ग्रंथांतून दिली जाईल.

सर्व मंडळींनीं या कार्यास हातभार लावावा अशी आमची सूचना आहे.

## वर्तमानपत्रें.

वर्तमानपत्रांचें वाचन हें एक व्यसन आहे, तें एकदां लागलें ह्मणजे गहन किंवा गंभीर विषयावरील ग्रंथ वाचण्याकडे मनाची एकाग्रता होत नाहीं अशी तक्रार पुष्कळांच्या तोंडून ऐकूं येते, आणि ती कांहीं अंशीं खरी आहे. पण तिचा अर्थ वर्तमानपत्रें वाचूंच नयेत असा कोणी घेतला तर मात्र ती त्याची सर्वथा चूक आहे. हल्लींच्या काळांत वर्तमानपत्रांचें वाचन हें ज्ञानप्राप्तीचें एक अवश्य साधन होऊन बसलें आहे. पूर्वींच्या काळीं हिंदुस्थान बाकीच्या जगाहून तुटक राहिला, जगांत कोठें काय चाललें आहे याची त्यानें परवा केली नाहीं, त्याचा परिणाम असा झाला कीं आमचा देश सर्वांच्या मागें राहिला. वर्तमानपत्रें न वाचणें ह्मणजे हीच चूक पुढें चालविणें आहे वर्तमानपत्रें वाचण्यांत तुह्मी आपला सगळा फुरसतीचा काळ घालवूं नका; कांहीं निवडक ग्रंथांचें वाचन ही ठेवा हें ह्मणणें रास्त आहे. पण मुळींच वर्तमानपत्रांना हात लावूं नका असें ह्मणणें ह्मणजे तुह्मी या जगांतून चालते व्हा, किंवा वानप्रस्त होऊन रहा असें ह्मणण्या सारखेंच आहे. वर्तमानपत्राच्या द्वारें राजकारण, व्यापार, शेतकी, शास्त्र, न्यायपद्धति, सामाजिक सुधारणा, धर्म सुधारणा इ. भिन्न भिन्न विषयांवर लोकाग्रणींचीं मतें कळून त्यांच्या कोठें चुका होतात तें कळतें, व इतर देशांत या विषयांत कोठें कशी प्रगति होत आहे याची माहिती मिळते. ही माहिती संसारांत राहणारास अत्यंत उपयुक्त व महत्त्वाची नसते असें कोण ह्मणेल? वर्तमानपत्रें तर अवश्य वाचावीं. मात्र त्यांत ही आवडनिवड आहे. ज्या वर्तमानपत्रांतल्या लेखांनीं मनोवृत्तीला संयमनाचें व विचाराचें शिक्षण न मिळतां उलट विकार जागृति होते, तीं वर्तमानपत्रें त्याज्य समजावीं. ज्यांच्या योगानें विचारशक्ति जागृत होऊन देशोदेशच्या माहितीनें स्वतःच्या स्थितींतले गुणदोष कळूं लागतात तीं वर्तमानपत्रें सर्वथा ग्राह्य होत अशीं वर्तमानपत्रें ह्मणजे प्रचलित विषयांवर शिक्षण देणाऱ्या चालत्या बोलत्या युनिव्हार्सिट्या होत. दुर्दैवानें अशी

वर्तमानपत्रें फार थोडीं आहेत. सर्वज्ञत्वाचा आव घालून उठल्या सुटल्या दुसऱ्यावर भुंकण्याची वृत्ति स्वीकारणारीं वर्तमानपत्रेंच आमच्या देशांत ज्यास्त आहेत. वर्तमानपत्रांत मुख्य गोष्ट माहितीची रेलचेल ही पाहिजे. हिंदुस्थानांतल्या वर्तमानपत्रांत दोष असला तर हा मोठा दोष आहे. आमच्यांत कोणतीं वर्तमानपत्रें अधिक लोकप्रिय आहेत तें पहा ह्मणजे कळेल कीं नुसतें शब्दांचें अवडंबर घालून विषारी बाणांनीं ( प्रमाणांनीं व युक्तिवादानें नव्हे. प्रतिपक्षाला घायाळ करण्यांत ज्यांचा हातखंडा आहे तीं अधिक लोकप्रिय आहेत. यांनींच लोकांची अभिरुची बिघडविली आहे. पण ही स्थिति पाहून निराश होण्याचें कारण नाहीं. कोणती ही संस्था नवीनच प्रचारांत आली ह्मणजे अशा चुका व्हावयाच्याच. केवळ माहितीनें भरलेलें असें वर्तमानपत्र निघण्याचा काळ फारसा दूर नाहीं असें आह्मांस वाटतें.

## प्रोफेसराचा उपदेश.

पुण्याच्या इंजिनियरिंग कॉलेजचे अध्यापक प्रोफेसर ॲलन यांनीं आपल्या विद्यार्थ्यांस उद्देशून भाषण करतांना राजकीय विषयांसंबंधानें जसा सरळपणाचा व स्पष्ट उपदेश केला, तसा क्वचितच ऐकण्याला मिळतो. प्रेस आक्टाचा किंवा डिफेन्स ऑफ इंडिया आक्ट यांचा निषेध करणाऱ्या चळवळींत अंग ठेवणें हा विद्यार्थ्यांचा कर्तव्यभाग नाहीं त्यांनीं फक्त डोळे व कान उघडे ठेवावे असें सांगितल्यावर स्वराज्याच्या चळवळी बद्दल ते ह्मणाले कीं हिंदुस्थानांतल्या लोकांच्या मनांत स्वातंत्र्य व स्वराज्य यांच्या कल्पनांची प्रेरणा इंग्रज सरकारनेंच केली आहे व योग्य काळीं खुद्द इंग्लंडांतली स्वातंत्र्य प्रियतेची व लोकाधिकाराची राज्यपद्धति हिंदुस्थानांत सुरू करण्याचा इंग्लंडचा निश्चय आहे. पण येवढ्या अधिकाराला हिंदुस्थान अद्याप पात्र झालें नाहीं. त्या दिशेनें नेटाचे प्रयत्न सुरू आहेत व तुह्मी स्वराज्याला पात्र व्हाल असा काळ आतां फारसा दूर नाहीं. तो अधिकार तुह्माला शांतताप्रियतेच्या व कायद्यास अनुसरून असलेल्या मार्गानेंच मिळेल. आज तुमचें हें कर्तव्य आहे कीं तुह्मी आपल्या देशस्थितीचा निर्विकार मनानें पूर्ण अभ्यास करावा; आणि स्वराज्याचीं तत्त्वें ओळखून तीं आपल्या बंधुभगिनींना शिकवावीं. देशांत सुधारणा ( सर्व प्रकारची ) घडवून आणण्याच्या कार्याला तुमच्या पैकीं कांहींनीं तरी स्वतःला पाहून घ्यावें. हिंदुमुसलमानांतल्या सारखे तंटे नाहींसे करावे. बहिष्कृतसमाजाविषयींचे दुराग्रह मनांतून काढून टाकावे, व त्यांना हात देऊन उन्नतीचे मार्गाला लावावें. स्वराज्य मिळविण्याचा उद्योग करण्यापूर्वी हें मोठें कार्य तुह्मी केलें पाहिजे' योग्य उपदेश ! पुण्याच्या विद्यार्थ्यांनीं हा उपदेश कसा काय ग्रहण केला तें कळलें नाहीं.

## हिंदुस्थानांतल्या रेशीम कारखान्यांचें भविष्य

थोडे दिवसांपूर्वी पंजाबचे ले० गव्हर्नर चंगामंगा येथें मुक्तिफौजेनें काढलेला रेशीम कारखाना पाहण्यास गेले होते. तेव्हां त्यांनीं असे उद्गार काढल्याचें प्रसिद्ध झालें आहे कीं सरकार हिंदुस्थानांत शेतकीची सुधारणा करण्याकडेच आपला सगळा उत्साह व पैसा खर्च करीत आहे व त्यामुळें इतर उद्योगधंद्यांना त्यांचेकडून उत्तेजन मिळावें तसें मिळत नाहीं. दोषदृष्टि टीकाकार यावर असें ह्मणतील कीं सरकार हें सगळें विलायतेंतल्या गिरणीवाल्यासाठीं किंवा धान्याचा निर्गत व्यापार करणारांच्या फायद्यासाठीं करीत आहे. आमचें या टीकाकारांहून अगदीं भिन्न मत आहे हें आह्मी येथें सांगून ठेवतों. सरकारानें उद्योगधंद्यांच्या वाढीकडे पाहून अधिक लक्ष द्यावयास पाहिजे ही गोष्ट निर्विवाद आहे. पण हिंदुस्थान देश मुख्यतः शेतकीवर अवलंबून असणारा असल्यामुळें शेतकीकडेच त्यांनीं प्रथम लक्ष देणें साहजिक आहे. उद्योगधंद्यांच्या बाबतींत मुक्तिफौजेचे अधिकारी जें उदाहरण घालून देत आहेत त्याचें अनुकरण जर आमच्या देशांत त्या संस्था करतील तर सरकारच्या मदतीची विशेषशी अपेक्षा ही त्यांना करावी लागणार नाहीं. सरकारकडून विशेषशी मदत न घेतां स्वतःच्या हिंमतीवर चालवितां येण्या सारखे जे अनेक उद्योग आहेत त्यांत रेशीम तयार करणें हा एक असल्यामुळें याविषयीं आज थोडीशी माहिती येथें देत आहों.

हिंदुस्थानांत तीन जातींचे रेशमाचे किडे वाढूं शकतात. १ तसर २ मुगा व ३ एरी. पहिली जात हिमालयाच्या पायथ्याशीं सापडते. हे किडे सर्व झाडांचीं पानें खातात. दुसरी आसाम व पूर्वबंगालमध्यें आहे व तिसरी खासी डोंगरांत आढळते व ही एरंडाच्या पानावर राहूं शकते. दुसरीला मात्र तुतीचींच पानें लागतात. मुगा किड्यांचें रेशीम गुंडाळण्यास बिलकुल अडचण पडत नाहीं. एरीचें रेशीम मात्र गुंडाळण्यास फार जड जातें. हिंदुस्थानांत रेशमाच्या किड्यांची वाढ करण्याचे पुष्कळ प्रयत्न झाले. पण त्यांच्यांत पेब्रिन नांवाचा रोग फार नाश करणारा आहे.

काश्मीरांत इटलीहून यंत्रें आणवून रेशीम करण्याचा कारखाना यशस्वी झाला आहे. ह्मैसूर संस्थानांत मि. टाटा यांनीं जपानहून आणिलेल्या कारागिरांच्या देखरेखीखालीं कारखाना उभारला. तुतींच्या झाडांची वाढ व जोपासना कशी करावी व रेशीम कसें करावें हें जपानी गुरूकडून शिकविण्याकरितां ह्मैसूर संस्थानानें टाटाला वार्षिक ३००० रुपयांची ग्रांट दिली होती. मुक्तिफौजेचे प्रयत्न तर प्रसिद्धच आहेत. बंगाल सिल्क कमिटीनें फ्रेंच तज्ञ आणवून त्यांचे कडून किड्यांच्या मिश्र जाती निर्माण करण्याचे प्रयत्न करून पाहिले. १९१३ सालीं बंगालच्या शेतकी खात्यानें एक नवी योजना तयार केली. तिच्यायोगानें एक मध्यवर्ति संस्था स्थापून तिच्या हातीं लहान लहान कारखान्यांचीं सूत्रें देण्यांत आलीं. १९१० सालीं पुसा इनस्टिटयूटनें तुतीवर निर्वाह करणाऱ्या किड्यांची सुधारलेली जात कशी वाढवावी तें दाखविणारें एक पत्रक प्रसिद्ध केलें. त्याच संस्थेचे एक मदतनीस कामदार मि डे यांनीं तुतीच्या रेशमाचें रीलिंग करण्याची एक सुधारलेली पद्धति जाहिर केली. गतवर्षी ह्मणजे १९१४ सालीं हिंदुस्थान सरकारानें रेशमाचे निरनिराळे कारखाने पाहून तेथील किड्यांना होणारे रोगांसंबंधानें रिपोर्ट करण्याकारितां व सदर रोगांपासून बचाव करण्यासंबंधानें सल्ला देण्याकरितां एक शास्त्रज्ञ नेमिले. असा हिंदुस्थानांतल्या या उद्योगासंबंधानें आतांपर्यंत झालेल्या प्रयत्नांचा इतिहास आहे.

हें भूतकाळासंबंधानें झालें. सध्या स्थिति कशी आहे? या प्रश्नाचें उत्तर मुक्तिफौजेचे प्रयत्न किंवा बंगाल आसामकडे आणि ह्मैसूर व काश्मीर या ठिकाणीं होत असलेले प्रयत्न खेरीज करून बाकी सर्वत्र अनास्था आहे. इंदूरच्या महाराजांनीं पुष्कळ पैसा खर्चून प्रयोगासाठीं एक कारखाना ठेविला आहे व कोणी होतकरू विद्यार्थी मिळाल्यास तेथील कारखान्यावरचे अधिकारी त्याला मोफत काम शिकविण्यास तयार आहे. पण कोणी येईल सें दिसत नाहीं. तुतीचीं झाडें हिंदुस्थानांत पुष्कळ प्रांतांतून होऊं शकतील. एरंडाचीं झाडें तर सर्वत्र आहेत. किड्यांना पाळण्याचें काम थोड्या दिवसांच्या अभ्यासानें कोणालाही करतां येण्यासारखें आहे. कारखान्याला भांडवल ही फार लागत नाहीं, आणि मालाला मागणी विपुल आहे. अशा स्थितींत जर हा उद्योग यशस्वी न झाला तर त्याला कारण आमचा आळस किंवा अनास्था हेंच होय. ज्यांनीं जागोजाग हे कारखाने यशस्वी करून दाखविले आहेत मुक्तिफौजेचे मुख्य अधिकारी कमिशनर बूथ टकर ह्मणतात कीं तुतीचीं झाडें जाळणें हें ब्यांकच्या नोटा जाळण्याइतकें किंवा रेशमी वस्त्र पोतेऱ्याला घेण्याइतकें वेडेपणाचें आहे अशी लोकांची खात्री होईल तेव्हां हिंदुस्थानांत जागोजाग रेशमाचे कारखाने निघून ते चांगल्या रीतीनें चाललेले दिसूं लागतील. आमच्या लोकांचा आळस झडणार केव्हां आणि हा सुदिन उगवणार केंव्हां हें परमेश्वरास माहित !

## हिंदुयुनिव्हर्सिटी.

बनारसच्या हिंदु युनिव्हर्सिटी कोर्टाची पहिली सभा ता० १९ रोजीं सेंट्रल हिंदु कॉलेजाच्या दिवाणखान्यांत भरली होती. चान्सेलर श्री. शिंदे महाराज यांना येण्यास सवड न झाल्यामुळें बनारसचे महाराज यांनीं अध्यक्षस्थान स्वीकारलें होतें. व्हाइस चान्सेलर डा० सुंदरलाल यांनीं थोडक्यांत पुढील माहिती मांडली. युनिव्हर्सिटीला आतांपर्यंत ९६,९२,४९६ रुपयांच्या रकमेचीं अभिवचनें मिळालीं. पैकीं वार्षिक रकमांची योग्य किंमत धरून हल्लीं ६९,७४,३३७ रुपये युनिव्हर्सिटीला मिळाले. यांत ५०० रु. किंवा अधिक रकमा देणारे ५३६ आहेत बाकीच्यांत बहुतेक मध्यम किंवा गरीब स्थितींतले स्त्री पुरुष आहेत. मुसलमान, युरोपियन, व पारशी यांनीं ही वर्गण्या दिल्या आहेत. हिंदुस्थान सरकारची वार्षिक १ लक्ष रु. ची मदत आहे. या युनिव्हर्सिटीसंबंधाचा जो कायदा पास झाला आहे त्यानें नियम घालून दिलेले नाहींत. युनिव्हर्सिटीनें नेमलेल्या कमिटीनें नियम तयार करून सरकारकडे पाठविले. या कमिटींत ना. महाराजा सर रामेश्वरसिंग, महामहो० आदित्यराम भट्टाचार्य, बाबू भगवानदास, डा० गंगानाथ झा, व डा० सुंदरलाल आणि पंडित मालवीय हे असून डा० गुरुदास बॅनर्जी हे मसलतगार होते. सरकाराशीं कांहीं मतभेद होऊन नियमांची दुरुस्ती करावी लागली. त्या नियमांचा सरकार आतां विचार करीत आहे. ते आतां मंजूर होतील अशी आशा आहे. कायद्याप्रमाणें ५० लक्ष रु. ची रकम जमली. जमीन घेतली तिची किंमत देण्याला ही जवळ पैसे आहेत. पण जरूरीच्या इमारतीला ३० लक्ष रु. लागतील. यांपैकीं फार थोडी रकम हातांत आहे. अर्वाचीन युनिव्हर्सिटीचीं उपांगें ह्मणजे शास्त्रीय उपकरणें वगैरे साठीं पैसे लागतील ज्या उमेदीनें व उत्साहानें राजे लोकांनीं व इतरांनीं द्रव्यसाह्य केलें त्याच उत्साहानें पुढें मदत झाली पाहिजे. तरच हिंदुसमाजाला अभिमानास्पद अशी ही संस्था होईल. या प्रमाणें व्हाईसचान्सेलर यांचें भाषण झाल्यावर नेमणुका करणें वगैरे कामें होऊन सभेचें काम संपलें.

## कांग्रेसचे अध्यक्ष

वऱ्हाडप्रांतिक कांग्रेस कमिटीनें बाबू अंबिका चरण मुझुमदार यांस यंदाच्या कांग्रेसचे अध्यक्ष निवडावें अशी अखेरची सूचना केली आहे. ही निवड योग्य आहे यांत शंका नाहीं.

## महायुद्धाची प्रगति

मित्र राष्ट्रांना अनुकूळ असा रंग प्रस्तुत युद्धानें धारण केल्याला बरेच दिवस झाले. सुदैवानें तो अद्याप टिकला आहे इतकेंच नाहीं, तर ज्यास्त ज्यास्त गहरा होत चालला आहे. जूनपासून आतांपर्यंत सरासरी दोन महिन्यांत एकट्या रशियानें पांच लक्ष शत्रु कैद केले या एका गोष्टीवरूनच युद्धाच्या सध्याचा रंग लक्षांत येईल. रशियन लोक सेरेथ व झ्लोटा लिपाकडे नेटानें चालून जात आहेत. वाटेंत नद्यांना पूर आले आहेत तरी युद्धाच्या उत्साहाच्या संचारामुळें त्यांना पुराची भीती वाटत नाहीं.

## पश्चिम रणक्षेत्र.

या रणक्षेत्रांत रशिया इतके जरी ब्रिटीश अकुतोभय उर्फ निर्धास्त नसले तरी ब्रिटिशांचाच सरशी खास आहे. पोझिएरच्या वायव्येकडची कांहीं ठाणीं व खंदक शत्रूनीं घेतले होते ते इंग्रजांनीं परत घेतले. इतकेच नाहीं, तर कांहीं शत्रूंचे खंदक ही ग्रेनेड नांवाच्या अस्त्रांचा भडिमार करून घेतले. आपले शूर वीर प्राणावर उदार होऊन लढत आहेत हें पाहून बादशहा पंचमजॉर्ज यांना मनस्वी आनंद होत आहे.

त्यांनीं मुद्दाम रणक्षेत्रावर जाऊन खंदकांतल्या आपल्या सैनिकांना दर्शन दिलें. तेव्हांचा सैनिकांचा उत्साह अवर्णनीय होता. परत आल्यावर त्यांनीं आपल्या सैनिकांना एक संदेश पाठविला त्यांत ते ह्मणतात. 'माझ्या सैन्यांनीं केलेला जंगी स्वार्थत्याग व्यर्थ होणार नाहीं. त्यांचा पक्ष पूर्णपणें यशस्वी झाल्याखेरीज मित्रराष्ट्रें हत्यारें खालीं ठेवणार नाहींत.' बादशहा रणक्षेत्रांत अतिशय धोक्याच्या ठिकाणीं जाऊन स्वतः सगळी स्थिति अवलोकन करीत होते. कुलुपी गोळे सूं सूं करीत येत आहेत अशा ठिकाणीं सुद्धां त्यांची स्वारी गेली होती.

## इतर बातम्या.

इटालियन लोकांनीं शत्रूंचीं कित्येक ठिकाणें घेऊन ६०० लोक कैद केले, व प्रत्येक शत्रूचा हल्ला परत फिरविला.

मि. मँटेग्यु यांनीं कॉमन्स सभेंत सांगितलें कीं युद्धाचे आरंभाचे वेळीं आमच्या जवळ जितक्या जड तोफा होत्या त्याच्या दुप्पट तोफा हल्लीं दर महिन्यांत आह्मी तयार करीत आहों, व दारूगोळा तर ६० पटीनें अधिक तयार होत आहे !

लॉर्ड किचनर यांच्या स्मारक फंडाची रक्कम २२३६०० पौंड झाली आहे.

एका चिनी शिपायानें एका जपानी माणसावर हात टाकल्यावरून जपानी पोलीस चिनी बराकींत कान उघाडणी करण्यासाठीं गेला. त्याला चिनी शिपायानें गोळी घालून मारिलें. त्यावरून जपानी लष्करी तुकडी धावून आली व तिनें पुष्कळांना जखमी केलें यावरून चीन आणि जपान यांच्यामध्यें कलागत लागते काय पहावें.

प्रो० मॅक्स मूलर यांच्या पत्नी नुकत्याच मरण पावल्या.

वचनभंग करण्याची खोड जर्मनीच्या अगदीं अंगवळणीं पडलेली दिसते. गेल्या मे महिन्यांत जर्मनीनें अमेरिकेपाशीं कबूल केलें होतें कीं आगाऊ सूचना दिल्याशिवाय आपण जहाज बुडविणार नाहीं असें असून गेल्या तीन महिन्यांत चार ब्रिटिश व तीन मध्यस्थ राष्ट्रांचीं जहाजें जर्मनीनें अशा रीतीनें वचनभंग करून बुडविलीं असें लॉर्ड क्रू यांनीं लॉर्ड सभेंत सांगितलें.

## महायुद्धाची प्रगति.

गेल्या आठवड्यांत विशेष नमूद करण्यासारखी गोष्ट ह्मणजे जर्मन आरमारानें उत्तर समुद्रांत सहल करण्याचा पुनः एकदा केलेला निष्फळ यत्न हा होय. आपल्या देखत ब्रिटिश लोक जर्मन व्यापार समुद्राला वेढा घालून बंद पाडीत आहेत आणि त्यांचा हात धरण्याचें सामर्थ्य आपले अंगीं नसल्यामुळें मुकाट्यानें खालीं मान घालून तो प्रकार पाहणें प्राप्त आहे ही गोष्ट जर्मन आरमारावरील अधिकाऱ्यांना अपमानास्पद वाटणें साहजिक आहे. ह्मणून त्या प्रकाराला आळा घालतां न आला तरी मधून मधून बाहेर पडून संधी साधल्यास ब्रिटिश जहाजांचा नाश चोरटेपणानें करण्यातच ते समाधान मानून घेत असले पाहिजेत. मागील शनिवारीं जर्मन आरमार बाहेर पडलें व त्यानें लढाईला तोंड न देतां दोन ब्रिटिश क्रूझरांचा नाश करून परत पलायन केलें. क्रूझरांचा नाश शोचनीय तर खराच, पण सुदैवानें प्राणहानि फारच अल्प झाली. येवढ्या मोठ्या उत्तर समुद्रावर अहोरात्र टेहळणी करणाऱ्या ब्रिटिश आरमारी शक्तीला मधून मधून अशा चोरट्या शत्रूकडून थोडी बहुत हानि व त्रास सोसावा लागणें अपरिहार्य आहे. हे चोरटे तरी आपली कातडी शाबूत घेऊन पळाले असं मुळींच नाहीं. त्यांची एक पाणबुडी बोट ब्रिटिशांनीं नष्ट केली व दुसरीला ही पुष्कळ अपाय घडला आहे. जमिनीवरच्या लढायांत सर्वत्र जर्मनीला अपयशच येत असल्यामुळें जर्मनींत लोकांच्या मनांत उद्भवणारी क्षुब्धता कांहीं अंशानें तरी शांत करण्यास जर्मन आरमाराला मधून मधून असें चोरटेपणानें बाहेर पडल्याशिवाय व आपल्या क्षुद्र कर्तबगारीचें स्तोम माजविल्याशिवाय आतां गत्यंतरच नाहीं.

## स्थलयुद्ध.

स्थलयुद्धांत फ्रेंच व ब्रिटिश दोघे ही विजयी आहेत. फ्लूरीवरच्या निकराचा शत्रूचा हल्ला फ्रेंचांनीं परतविला. सॉमवर तोफांचा जंगी भडीमार सुरू आहे. या ठिकाणीं शत्रूचें १९ लक्ष सैन्य एकत्र झालें असावें असा टाइम्सचा अंदाज आहे. इतक्या निकराच्या लढाईंत ब्रिटिशांनीं आपली सरशी कायम ठेविली आहे. कायमचा निकाल लागेल असें युद्ध करण्याची जर्मन टाळाटाळ करीत आहेत व तहाविषयींच्या गप्पा वारंवार उठत आहेत, पण जर्मनीचा नक्षा पुरा उतरल्याशिवाय तहाला कबूल व्हावयाचें नाहीं असा आपला निश्चय मि. आस्क्किथ यांनीं पुनः पार्लमेंटांत जाहिर केला आहे यावरून जर्मनीची पूर्ण तारांबळ उडाल्याचें स्पष्ट दिसतें. रशियनांनीं जाबलो निझा सर केलें. मेसोपोटेमिया प्रकरणामुळें सर बी. डफ यांना हिंदुस्थानचे मुख्य सेनापतीचे काम न देतां तें सर चार्लस मनरो यांस देण्यांत आलें आहे. हल्लीं हें युद्धावर आहेत. रशिया आपणांवर स्वारी करील अशी भीती हंगेरीला पडली आहे व ते लोक जर्मनीला दोष देत आहेत.

## जलयुद्ध.

नवीन उद्योगांत आणलेल्या भयंकर व प्राणघातक हत्यार मुळें [illegible]ील शास्त्रीय ज्ञानाच्या प्रगतीमुळें, सांप्रतच्या समुद्रावरील युद्धामध्यें फार महत्वाचा फरक झालेला आहे. या युद्धापूर्वीं दोन विरुद्ध बाजूच्या आरमाराची दृष्टादृष्ट झाली कीं त्यास लढणें भागच पडे. समुद्रावर नद्या टेकड्या, जंगलें, खंदक अशा प्रकारचे अडथळे नसल्यामुळें लढणें लांबणीवर टाकतां येत नाहीं. अशी दृष्टादृष्ट झाली कीं ज्या आरमारामध्यें जास्त जहाजें व जास्त तोफा असतील त्या आरमाराचा हटकून जय व्हावयाचा व अशा बलाढ्य आरमारापासून पळून जाण्याचा मार्गही पूर्वी नव्हता. आतां ही दृष्टादृष्ट होणें हें पहाण्याच्या साधनावर अवलंबून असतें आज पर्यंत आपल्या विरुद्ध आलेलें आरमार किती बलाढ्य आहे हें समजल्यावर पळून जाणें शक्य नव्हतें कारण हे समजण्याकरतां चाल करून येणाऱ्या आरमारा जवळ गेल्यावरच त्यांचे बळ दिसत असे. आतां पहाण्याच्या साधनामध्यें मोठा फरक झाला आहे. आकाशयानें व झेपेलिन विमानें यांनीं दृष्टिपंथांत जास्त विस्तृत प्रदेश येतो व त्यामुळें चाल करून येणाऱ्या आरमाराचे बळ अगाऊच समजते तें जर कमी बलवान असेल तर त्याशीं झुंज करावयाची असें ठरवितात व ते जर फार बलाढ्य असेल तर त्या पासून बंदोबस्त केलेल्या बंदरामध्यें किंवा अन्य आश्रयाच्या ठिकाणीं पळून जातां येते ह्मणजे सध्या लढाईस तोंड देणें किंवा न देणें हें आरमाराधिकाऱ्यास स्वतः ठरवितां येते.

पूर्वी एकदां लढाई जुंपली कीं एका बाजूची पुरा मोड झाल्यावांचून संपत नसे परंतु आतां नवीन हत्यारामुळें पुरा मोड झाल्यावांचून लढाईचा निकाल न होता शत्रूच्या कचाट्यांतून सोडवून घेऊन पळून जाता येते. ही हत्यारें ह्मणजे विनाशक जहाजें जलान्तचारी जहाजें व पाणसुरुंग ही होत. दोन आरमारांची लढाई जुंपली व एकेबाजूस ही लढाई आपल्यास अनर्थकारक होईल असें वाटलें तर आपल्या समोर व आपल्या विरुद्ध आरमारामध्यें पाणसुरुंग पेरून देतात, व त्याच्या अलीकडे अत्यंत जलद चालणाऱ्या चपल व टार्पेडो नांवाच्या पाण्यांतून जाणाऱ्या शस्त्रांचा उपयोग करणाऱ्या विनाशक नामक जहाजाची विरुद्ध आरमाराची चाल करून येण्याकरतां रस्ता अडवण्याकरतां योजना करतात. या धामधुमीच्यावेळीं समुद्राच्या पृष्टावर फारसे लक्ष देतां येत नाहीं व त्यावर लक्ष देण्यास उपयोगीं पडणारी आकाशयानें उभा मारा करणाऱ्या तोफांच्या माऱ्यामुळें आपलें काम करूं शकत नाहींत अशावेळेस जलान्तचारी जहाजांचा चाल करून जाणाऱ्या आरमारास जबरदस्त परंतु लवकर न समजू येणारा अडथळा असतो. असे तीन प्रकारचे अडथळे तयार केले ह्मणते कमी बलवान किंवा हार खाणारे आरमार आपल्या आश्रया कडे मार्ग सुधारू शकते.

असा फरक झाल्यामुळें शत्रूच्या आरमाराचा पुरा मोड करणें दुर्घट झालें आहे. तरी पण चांगल्या तोफा, कार्यक्षम अधिकारी, व उत्तम नेमबाजी, आज पर्यंत वर्चस्व गाजविल्यामुळें अंगात आलेला विश्वास व धमक, व जहाजाच्या संख्येचे मनस्वी वर्चस्व, या सर्व गोष्टी आपल्या आरमारामध्ये एकवटल्यामुळें अन्तिम जयाची खात्री बाळगण्यास कांहींच हरकत नाहीं.

## वऱ्हाडवृत्त

**हवामानः—** सूर्यप्रकाशाच्या लाटांनीं मनुष्यें काय व वनस्पती काय आनंदानें डुलू लागून वाऱ्याच्या विंजे बरोबर आपल्या जीवनशक्ती फोंफावीत आहेत. प्रेगाची इडापीडा टळेल असा प्रस्तुतचा रंग दिसतो.

महाराष्ट्रीय 'ज्ञानकोष मंडळा' चे मुख्य प्रवर्तक डाक्टर श्री० व्यं० केतकर पी० एच. डी हे येथें साधनसामुग्री गोळा करण्याकरितां आले असून 'जातिभेदाचा इतिहास' या विषयावर त्यांचें व्याख्यान काल झालें.

**गर्दे लायब्ररीः—** बुलढाण्याचे सुप्रसिद्ध कै० वि० कृ० गर्दे वकील यांचें स्मारक ह्मणून एक सुंदर लायब्ररीचें विद्यामंदिर त्यांचे चिरंजीव रा० चिंतामणराव हे येत्या विजयादशमी पर्यंत बांधून देत आहेत. आणि मृताच्या सद्गुणांची सार्वजनिक आठवण ह्मणून त्या संस्थेला 'गर्दे लायब्ररी' ही सार्थ संज्ञा देण्यांत आली आहे. लायब्ररीचा उत्कर्ष ह्मणजे लोकांच्या उन्नत मनाची ध्वजाच होय.

खामगांवास श्री आकोटकर महाराजांचीं रसाळ किर्तनें, शलिनाथ कंपनीचीं बोधपर नाटकें व क्रिकेटच्या खेळाचे सामने यांनीं दंगल उडवून दिली आहे. नदीच्या पुरानें नुकसानी होऊं नये ह्मणून पूल बांधण्याचा विचार चालू आहे.

'ब्राह्मण पलटणी' च्या कल्पने विषयीं येथें भवति न भवति चालू असून ब्रिटिश साम्राज्याच्या शिखरवत् असणाऱ्या हिंदी राष्ट्राची नवी घटना हाच त्या कल्पनेचा खरा सोपान व विजय आहे असा त्या वादाचा ध्वनि निघतो.

रा. रा. नारायण रघुनाथ चांदोरकर बी. ए. बी. एल, एक्स्ट्रा असि. कमि. आकोला यांची बदली उमरावतीस झाली आहे. हे तरुण गृहस्थ कामांत दक्ष व बुद्धीनें तीव्र असून कामाचें वळणही चांगलें आहे.

महानुभाव धर्माच्या अनुनुकसानीबद्दल महात्मा जैतराज जालंदरी यांनीं ता० १९-४-१४ इसवी रोजी ५०० कलम प्रमाणें जी फिर्याद केली होती, तिचा निकाल ता० १७-८-१६ रोजीं होऊन आरोपी गोसावी लोकांस ३०० रुपये दंड झाला.

## जाहिर नोटीस

विद्यमान सब जज सा. कोर्ट खामगांव

सक्सेशन सर्टिफिकीट नं. ३ सन १९१६

सक्सेशन सर्टिफिकीट मिळणें बद्दल अर्ज

अर्जदार

गौराबाई जवजे बळीराम मारवाडी चांडक खामगांव

सर्वत्र लोकांस कळविण्यांत येते कीं, वरील अर्जदार इनें सक्सेशन सार्टिफिकीट मिळण्याचा अर्ज आमचे कोर्टांत ता. ९-८-१६ रोजीं केला आहे. त्याची चौकशीची ता. २१-१०-१९१६ नेमली आहे. तरी त्या तारखेस ज्याची कांहीं हरकत असेल त्यानीं सकाळीं १० वाजतां आमचे कोर्टांत हजर व्हावें. तसें न केल्यास पुढें कोणतीही तक्रार ऐकली जाणार नाहीं कळावें.

आज ता. २३ माहे ८ सन १९१६ इ. आमचे सहीनिशी व कोर्टाचे शिक्क्यानिशी दिलें.

R. N. Trivedi
Sub Judge
Khamgao

नो. नं. ३१७

# कौतुकरत्नाकर

**छिन्नमस्तानी धुमावती; मातंगी भैरव षोडश देवतांचे चित्रांसह**
**पृष्ठसंख्या ६००; विषय ६०० वर आवृत्ती ५ वी. प्र. २००००,**

बंगाल्यांतील कामरूपदेशी ही विद्या फार प्रबळ असून तिकडील जटेली. लंगोटि, छा छु करणारे अज्ञानवादी यांचेकडून खरी माहिती मिळवून सिद्धनागार्जुन मंत्रमहोदधि, महानिर्वाणतंत्र उड्डीश वगैरे ग्रंथाचे आधारें हा भानुमती ग्रंथ तयार केला आहे. ह्याच धर्तीवर प्रसिद्ध झालेल्या इंद्रजाल, जादुबाई इतरसंग्रह, कौतुकचिंतामणी, किमिया, गुप्त गारुडी विद्या वगैरे पुस्तकांचा ह्याचेपुढें हिशेब नाहीं. यात कोणते विषय आहेत याचा विस्तार कळविणें फार कठीण आहे. मंत्र तंत्र व यंत्र विधिपूर्वक करणें नियम ग्रहादिकांचें वर्णनें भानुमती यंत्र वशिकरणशास्त्र नानाप्रकारचे स्तंभन प्रयोग, उच्चाटन, जारण मारण प्रयोगविधि, औषधी हुन्नर, नानारंग कला, आत्मविद्यामेस्मेरिझम प्रयोग विधि वैगेरे अनेक विषय आहेत. किं. ट. व्ही. पी. सह १॥ रुपया.

# कोकशास्त्र अथवा जीवनसौख्य.

ज्यांना खरोखरीच सौख्य भोगणें आहे त्या प्रत्येकांनीं हें पुस्तक अवश्य संग्रही ठेवावें. या पुस्तकांत कोणते विषय आहेत हे पुस्तकाच्या नांवावरून सहज समजण्याजोगें असल्यामुळें त्याचें वर्णन करणें नको. किंमत १ रुपया ट. ख. २ आणे.

अपूर्व ग्रंथ ! **मराठी भाषेंत** अपूर्व ग्रंथ

आजपर्यंत मराठी भाषेंत प्रसिद्ध न झालेला अपूर्व ग्रंथ.

# वशीकरण विद्या.

अर्थात दत्तात्रय तंत्र हा ग्रंथ दत्तात्रय व शंकर यांचा संवादरूपी असून दत्तात्रयांनीं प्रश्न केल्यावरून शंकरानीं कलीयुगांत त्वरित सिद्धी देणारे प्रयोग सांगितले आहेत. ते मारण, मोहन, स्तंभन, विद्वेशण, वशीकरण, स्त्रीवशीकरण, आकर्षण इंद्रजाल, यक्षिणीसाधन, रसायन विद्या, कालज्ञान, अनाहार, आहार, निधी दर्शन, वंध्यापुत्रवती करण, वाजी करण, भूतग्रहनिवारण, सिंह व्याघ्र निवारण इत्यादी अनेक प्रयोग सांगितले आहेत. किं. ४८ आणे ट. ख. ३

पुस्तकें मागविण्याचा पत्ता.

ब्रँच आफीस — पत्ताः— गंगाधर आर. आणि कंपनी.
उंबरगांव जि ठाणें — हरिश्चंद्र बिल्डिंग मुंबई नं. ४

नो. नं. ७



श्रीमत्सद्गुरु श्रीसमर्थ रामदासस्वामिविरचित

# सटीप दासबोध.

**श्रीरामदासस्वामींच्या सुंदर चित्रासहित.**
**पोथी साईज, किंमत रुपये २, टपालखर्च ८ आणे.**

'प्रपंच साधुनि परमार्थाचा लाहो' करण्यास श्रीसमर्थ रामदासस्वामींच्या ह्या दासबोध ग्रंथाचें वाचन व मनन हें एक अत्युत्तम साधन आहे. असा हा उत्तमोत्तम प्रासादिक ग्रंथ आम्हीं पोथी-साईजमध्यें ठळक टाईपांत एका रामदासीयाकडून तपासवून व अर्थनिर्णायक टीपा देववून छापून प्रसिद्ध केला आहे.

२३, कोलभाट लेन, कालबादेवी रोड, मुंबई. — तुकाराम जावजी, निर्णयसागर छापखान्याचे मालक.


## जाहीर नोटीस

सर्वत्र लोकांस कळविण्यांत येते कीं, सुंदर जवजे भगवानदीन परदेशी ही माझी गंधर्वाची बायको आहे. ती वाईट चालीची असल्या मुळे मी तिजला च्यार महिन्याचे पूर्वी पासून सोडून दिली आहे. आतां तिचा माझा कोणतेही प्रकारचा संबंध नाहीं. तिने पासून कोणी कांहीं माल घेईल तो माझा जबाबदार राहील. हीं नोटीस दिली ता० १८-८-१९१६ इ दस्तुर रंगनाथ तुकाराम खेडेंकर रा. रिसोड

सही.
भगवानदीन भवानी याची स्वदस्तुर अक्षरें
नो. नं. ३१९

## नोटीस

नोटीस बेसमी सुंदर मर्द भगवानदीन परदेशी रा० मौजे हाराळ प्र. नर्शी ता. वाशीम जि. आकोला इजला खाली सही करणार रा. मौजे हाराळ प्र. नर्शी ता. वाशीम जि. आकोला यानकडून नोटीस देण्यांत येते कीं, तूं ता. १७-७-१६ इ॥ वऱ्हाड समाचार वर्तमान पत्रांतून जी नोटीस मजला केली आहे. ती अगदींच खोटी आहे. तूं माझी गंधर्वाची बायको आहेस. तूं वाईट चालीची असल्यामुळे च्यार महिन्या पूर्वी पासून सोडून दिलें आहे. त्यामुळें माझा व तुझा कोणतेही रितीचा संबंध राहिला नाहीं. ता. १८-८-१९१६ इ० दस्तुर रंगनाथ तुकाराम खेडेंकर रा. रिसोड

सही.
भगवानदिन भवानी यांची स्वदस्तुरी अक्षरें.
नो. नं. ३१९


## Oriental Government Security Life Assurance Co., Ltd.

ESTABLISHED 1874.

HEAD OFFICE, BOMBAY.

**FUNDS exceed 5 CRORES.**

INVESTED IN GOVERNMENT SECURITIES AND MUNICIPAL AND PORT TRUST BONDS.

*Claims paid* $4\frac{1}{2}$ CRORES

## A Novennial Record of Progress.

| Year. | No. of Policies in force. | Existing Assurance Rs. |
| --- | --- | --- |
| 1879 | 1.034 | 31,00,950 |
| 1888 | 8668 | 2,63,38,000 |
| 1897 | 26,522 | 6 37,26,354 |
| 1906 | 48,147 | 9,45,63,407 |
| 1915 | 64 ?38 | 12,23,63.755 |

| Year. | Total Income. Rs. | Total Assets. Rs. |
| --- | --- | --- |
| 1879 | 1,30,109 | 1,70,695 |
| 1888 | 11,48644 | 36,38,694 |
| 1897 | 28,85,976 | 1,3390.729 |
| 1906 | 4884 | ?,84,76155 |
| 1915 | 72,96,901 | 5.25,53900 |

EVERY MAN'S DUTY

is to provide for those dependent upon him and for his own old age. When a man's income is reduced owing to any cause there is all the more reason for his making provision for those dependent upon him and this can be effected in no way better than by a Life Assurance Policy with the "Oriental"

### *SPECIAL FEATURES.*

Absolute Security—Low Rates—Liberal Conditions.
Forty years continuously increasing prosperity.
Ninety per cent of the entire Profits, after providing for the Reserve Fund divided among the Policyholders every 3 years.
Indian Lives are accepted at the same rates as Europeans.
Loans granted to policyholders at reasonable rates.
Prompt Payment of Claims.

***Influential and active agents wanted Terms Liberal***

:0

Full particulars, prospectus and proposal forms on application to:—

R. Paterson Brown, Manager, Bombay. or A. C. Lal, Branch Secratary, C. P. Berar & Khandesh, Nagpur.

N. N. 22


हें पत्र आकोला येथें कैलासवासी खंडेराव बाळाजी फडके यांच्या वऱ्हाडसमाचार छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं सदाशिवाश्रमांत छापून प्रसिद्ध केलें.